वर्षः 6 अंकः 17

1-15 मार्च, 2026 (नि:शुल्क)

# न्यू इंडिया समाचार




## राष्ट्राची 'प्रगती' योजनांमध्ये गती

*विकसित भारत @ 2047, एक राष्ट्रीय संकल्प, एक कालबद्ध उद्दिष्ट आहे आणि राष्ट्रीय हितामध्ये या उद्दिष्ट प्राप्तीसाठी 'प्रगती' मंच एक मजबूत आधारस्तंभ बनला आहे...*

ई-कॉपीसाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल : 10 मार्च स्थापना दिवस

# कर्तव्याप्रती अढळ समर्पण

*गेल्या 57 वर्षांत केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाने (सी आय एस एफ) राष्ट्रीय सुरक्षेत सुवर्ण मानके सुनिश्चित केली आहेत. 'सुरक्षा कवच' म्हणून ओळखले जाणारे सीआयएसएफचे जवान देशातील महत्त्वाच्या आस्थापनांसह बंदरे, विमानतळ, मेट्रो यांसह अनेक ठिकाणी दररोज एक कोटीहून अधिक लोकांच्या हालचालींना कोणत्याही संकटापासून सुरक्षित ठेवतात...*



- देशाच्या औद्योगिक, शैक्षणिक विकास आणि सुरळीत संचालनामध्ये सीआयएसएफ जवानांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.
- देशाच्या नवीन संसद भवनाच्या सुरक्षेची जबाबदारीही सीआयएसएफ जवान सांभाळत आहेत.
- विनयशीलता आणि संयमासह कोणतीही चूक न करता सीआयएसएफ जवान दिल्ली मेट्रोमध्ये दररोज 70 लाखांहून अधिक प्रवाशांची सुरक्षित ये-जा सुनिश्चित करतात.

**250** बंदरांच्या सुरक्षिततेची जबाबदारीही संभाळतात

"केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या सर्व कर्मचाऱ्यांना स्थापना दिनाच्या हार्दिक शुभेच्छा. हे दल आपल्या व्यावसायिकतेसाठी, समर्पणासाठी आणि धैर्यासाठी ओळखले जाते. हे दल आवश्यक पायाभूत सुविधांचे रक्षण करत आणि दररोज असंख्य लोकांची सुरक्षा सुनिश्चित करून आपल्या सुरक्षा प्रणालीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे. कर्तव्याप्रती त्यांचे अढळ समर्पण खरोखरच कौतुकास्पद आहे.

**– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

न्यू इंडिया
**समाचार**

वर्षः 6, अंकः 17 । 1-15 मार्च, 2026

मुख्य संपादक
**धीरेंद्र ओझा**
मुख्य महासंचालक
पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

मुख्य सल्लागार संपादक
**संतोष कुमार**

वरिष्ठ सहाय्यक सल्लागार संपादक
**पवन कुमार**

सहाय्यक सल्लागार संपादक
**अखिलेश कुमार**
**चंदन कुमार चौधरी**

भाषा संपादन
**सुमित कुमार (इंग्रजी)**
**रजनिश मिश्रा (इंग्रजी)**
**नदीम अहमद (उर्दू)**

वरिष्ठ डिझायनर
**फूलचंद तिवारी**

डिझायनर
**अभय गुप्ता**
**सत्यम सिंह**




**13 भाषांमध्ये उपलब्ध न्यू इंडिया समाचार वाचण्यासाठी क्लिक करा.**

https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

**न्यू इंडिया समाचारचे जुने अंक वाचण्यासाठी क्लिक करा**

https://newindiasamachar.pib.gov.in/archive.aspx

न्यू इंडिया समाचारबद्दल ताजी माहिती जाणून घेण्यासाठी फॉलो करा : @NISPIBIndia

# आतील पानांवर...




## मुखपृष्ठ कथा

मार्च 2015 मध्ये स्थापन झालेल्या 'प्रगती' मंचाने गेल्या दशकभराच्या प्रवासात 50 बैठका घेऊन 85 लाख कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या 382 प्रकल्पांना गती दिली आहे. या अनोख्या उपक्रमामुळे देशातील विविध राज्यांमध्ये अडकलेले आणि रेंगाळलेले कोट्यवधी रुपयांचे प्रकल्प एकामागोमाग एक वेगाने पूर्ण होत आहेत. याने सुनिश्चित होत आहे 140 कोटी नागरिकांचा विकास ... | 12-31

**सेवा तीर्थ आणि कर्तव्य भवन**




सेवा तीर्थ आणि कर्तव्य भवन केवळ एक इमारत नाही, तर कार्य संस्कृतीत उमटलेल्या परिवर्तनाचे प्रतिक आहे. येथे स्वामित्वाची नव्हे, तर सेवेची भावना आहे. | 7-9




**राष्ट्र गीताचे सर्व सहा अंतऱ्यांचे गायन केले...**

**कालावधी - 3 मिनिटे 10 सेकंद**

राष्ट्र गीत वंदे मातरम प्रति गौरवार्थ केंद्र सरकारने जारी केले निर्देश | 10-11


**वृत्त सारांश** | 4-5

**व्यक्तिविशेष : रायफल मॅन संजय कुमार**
शत्रूच्याच शस्त्रांनी केला त्यांचा खात्मा | 6

**कनेक्टिव्हिटीला गती देण्यासाठी आणि शहरी आव्हान निधी सुरु करण्यासाठी मंजूरी**
केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आले अनेक महत्वपूर्ण निर्णय | 32-34

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मंत्र : शिक्षण आणि कला दोन्ही उपयुक्त**
परिक्षा पे चर्चा 2026' भाग-2 मध्ये पंतप्रधान मोदी यांनी विद्यार्थ्यांशी केली चर्चा | 35-37

**आता आघाडीवर राहून नेतृत्व करणार भारत**
राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावात पी एम मोदी यांचे उत्तर | 38-41

**ईटी नाऊ समिट 2026 : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे संबोधन**
...म्हणूनच संपूर्ण व्यवस्था बदलण्यासाठी केले काम | 42-43

**संरक्षण आणि विकासाचा नवीन अध्याय**
पंतप्रधान मोदी यांनी आसाम दौऱ्यात दिल्या विकासाच्या भेटी | 44-45

**इंडिया एआय इम्पॅक्ट समिट - एक्स्पो 2026**
नवीन कल्पना, नवोन्मेष आणि उद्दिष्टांचा शक्तिशाली संगम | 46-47

**...जेणेकरून अर्धी लोकसंख्या विकासाची प्रेरक शक्ती बनून नेतृत्व करेल**
आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त विशेष | 48-51

**मैत्रीपासून धोरणात्मक भागीदारी पर्यंत**
पंतप्रधान मोदी यांच्या दोन दिवसीय मलेशिया यात्रेदरम्यान झाले महत्वपूर्ण करार | 52-53

**भारत-अमेरिका व्यापार कराराने खुल्या झाल्या नवीन संधी**
जगातील दोन सर्वात मोठ्या लोकशाही आणि आर्थिक शक्तींदरम्यान झाला करार | 54-56



**प्रकाशकः कंचन प्रसाद, महासंचालक,** सीबीसी (केंद्रीय संचार ब्युरो) **पत्रव्यवहार आणि ईमेल साठी पत्ताः** कक्ष क्रमांक-1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली- 110003 **ईमेल-** response-nis@pib.gov.in आर. एन. आय. नंबर DELHIN/2020/78812

# संपादकांच्या लेखणीतून...

# 'प्रगती'
# विकासाच्या गतीचे परिवर्तनकारी व्यासपीठ

सादर प्रणाम,

जनशक्ती ही कोणत्याही सरकारच्या शक्तीपेक्षा जास्त महत्त्वाची असते. मात्र, अशा परिस्थितीत नागरिकांच्या सोयीसाठी सुरू केलेले कल्याणकारी प्रकल्प जर वेळेवर साकार झाले नाहीत, तर त्याचा थेट परिणाम राष्ट्राच्या प्रगतीवर होतो. एक काळ असा होता जेव्हा प्रकल्प सुरू व्हायचे पण पूर्ण होऊ शकत नव्हते. संबंधित विभाग आणि इतर भागधारकांमधील समन्वयाच्या अभावामुळे समस्या सुटत नव्हत्या आणि योग्य नियंत्रण देखील ठेवले जात नव्हते. यामुळे विकासाचा वेग मंदावत होता आणि प्रकल्पांचा खर्च वाढत रहायचा. अशा परिस्थितीत वर्तमान केंद्र सरकारने मार्च 2015 मध्ये तंत्रज्ञानावर आधारित एक असे बहुआयामी व्यासपीठ - 'प्रगती' प्रो ॲक्टीव्ह गव्हर्नन्स अँड टाईमली इम्प्लीमेंटेशन अर्थात स्वयंप्रेरित प्रशासन आणि कालबद्ध अंमलबजावणी हा उपक्रम सुरू केला, जो गेल्या दशकाच्या प्रवासात 'गेमचेंजर' ठरला आहे. प्रगती व्यासपीठावर येणाऱ्या सर्व प्रकल्पांचा आढावा स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी घेतात, ज्यात संबंधित विभाग, मंत्रालय, राज्याचे अधिकारी आणि सर्व हितसंबंधी सहभागी असतात. यात समस्यांचे उचित निवारण करित प्रकल्पाला वेग दिला जातो.

गेल्या दहा वर्षात या व्यासपीठाने सातत्यपूर्ण आढावा, कालबद्ध अंमलबजावणी तसंच सुस्पष्ट मार्गदर्शनाने देशाच्या विकासाला गती दिली आहे. नुकतीच प्रगतीची 50 वी बैठक पार पडली. आतापर्यंत, या मंचाने 85 लाख कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या राष्ट्रीय स्तरावरील 382 प्रकल्पांना नवीन गती आणि व्याप्ती दिली आहे. प्रगती मंच आज वेळेवर पूर्ण होणाऱ्या कामांसाठी योग्य पर्याय ठरला आहे. ऑक्सफर्डच्या सैद बिझनेस स्कूलनेही आपल्या अभ्यासात हा परिवर्तनशील उपक्रम असल्याचे म्हटले आहे. विकसित भारताच्या संकल्पाचे ध्येयाच्या दिशेने 'प्रगती'चे महत्व आणखी वाढले आहे. हीच यावेळच्या आमच्या अंकाची मुखपृष्ठ कथा बनली आहे.

याव्यतिरिक्त, व्यक्तिविशेष सदरात परमवीर चक्र पुरस्कार विजेते रायफल मॅन संजय कुमार, भारत - अमेरिका अंतरिम व्यापार कराराबाबत विशेष साहित्य, राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या उत्तराचा संपादित अंश, त्यांची मलेशिया यात्रा, परिक्षा पे चर्चा सह पंधरवड्याभरातील कार्यक्रमांचा यात समावेश करण्यात आला आहे.

याशिवाय, अंकाच्या आतील पानावर 10 मार्च रोजी केंद्रीय औद्योगिक स्थापना दिन आणि मलपृष्ठावर 15 मार्च रोजी असलेला जागतिक ग्राहक हक्क दिन याबाबत विशेष साहित्याचा समावेश आहे.

आपल्या सूचना आपण आम्हाला पाठवत रहा.

धीरेन्द्र

(धीरेंद्र ओझा)

हिंदी, इंग्रजी आणि इतर 11 भाषांमध्ये उपलब्ध असलेला अंक वाचा/ डाउनलोड करा
https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

# आपले मनोगत...






## अंकात समाविष्ट साहित्य खूपच प्रेरणादायी, वाचून आनंद झाला

न्यू इंडिया समाचारचा अंक वाचून खूप आनंद झाला. या मासिकात असलेली माहिती उत्कृष्ट आहे. यासोबतच भारतातील लोकांना आणखी निकट आणल्याबद्दल आपले आभार. यातील मजकूर देखील खूप प्रेरणादायी वाटला. न्यू इंडिया समाचार पत्रिकेतील बातम्या स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहे. मासिकाची रचना खूप चांगल्या प्रकारे केली आहे

**श्रीकृष्ण मंडल**

## देशाच्या विकासासाठी करण्यात येत असलेल्या उपक्रमांची अचूक माहिती

विशेष आणि मौल्यवान माहिती पुरवणारा अंक प्रकाशित केल्याबद्दल न्यू इंडिया समाचारच्या संपूर्ण टीमचे आभार मानतो. नागरिकांना दर्जेदार माहिती देण्याच्या तुमच्या प्रयत्नात तुम्हाला निरंतर यश मिळावे अशी माझी इच्छा आहे. हा अंक वाचल्याने तरुणांना सरकारी धोरणे आणि देशाच्या विकासासाठी आखण्यात येणाऱ्या उपक्रमांविषयी सखोल आणि योग्य समज मिळते.

**thirubjp2020@gmail.com**

## भारत सरकारच्या योजनांविषयी सविस्तर आणि विश्वासार्ह माहिती

न्यू इंडिया समाचार एक उत्कृष्ट अंक आहे जो भारत सरकारच्या विविध उपक्रम आणि योजनांविषयी सविस्तर आणि विश्वासार्ह माहिती देते. यातील सामग्री मला खूप माहितीपूर्ण आणि उपयुक्त वाटली. भारत देश अतिशय भाग्यवान आहे की त्यांना असे सशक्त आणि जबाबदार पंतप्रधान लाभले आहेत जे त्यांच्या सर्व जबाबदाऱ्या उत्तमरित्या निभावतात. ज्या बाबी खरोखरीच गौरवपूर्ण आहेत त्या नागरिकांसमोर स्पष्ट स्वरुपात मांडण्यात न्यू इंडिया समाचारचा अंक महत्वपूर्ण भूमिका निभावत आहे.

**चौहान मोहित**

**mohit.cm1326@gmail.com**

## लेख आणि अहवाल खूपच प्रेरणादायी आहे

मी हल्लीच न्यू इंडिया समाचारचा एक अंक वाचत होतो. यात मांडलेले लेख आणि अहवाल मला खूपच प्रेरणादायी वाटले. न्यू इंडिया समाचार कायमच खूप माहितीपूर्ण आणि मनोरंजक वाटते, हेच मला व्यक्त करायचे आहे.

**एच. शर्मा**

**hsonai@hotmailcom**

## परीक्षेच्या तयारीसाठी खूप उपयुक्त

मी नागरी सेवा परीक्षेची तयारी करत आहे. मी इंडिया समाचारचा नियमित वाचक आहे. हा अंक माझ्या परीक्षेच्या तयारीसाठी फारच उपयुक्त ठरत आहे. हा अंक विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी प्रेरित करतो. या अंकाच्या माध्यमातून उमेदवारांना भारताच्या विकास आणि प्रगतीबाबत माहिती मिळण्यास मदत होते. यात प्रकाशित लेख सोप्या भाषेत मांडलेले असतात.

**मोहित मौर्य**

**studentindia72@gmail.com**

पत्रव्यवहार आणि ईमेल साठी पत्ता:- कक्ष क्रमांक 1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली -110003, ईमेल- response-nis@pib.gov.in

*न्यू इंडिया समाचार आकाशवाणीच्या एफ एम गोल्ड वर प्रत्येक शनिवार-रविवारी दुपारी 3.10 ते 3.25 पर्यंत ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.*

वृत्त सारांश



# नवी दिल्लीत अखिल भारतीय आयुर्वेद संस्था येथे मिळू शकणार कॅशलेस उपचार

नवी दिल्ली स्थित अखिल भारतीय आयुर्वेद संस्था (एआयआयए) येथे आता 'जनरल इन्शुरन्स कौन्सिल'च्या अंतर्गत येणाऱ्या सर्व 32 सर्वसाधारण विमा कंपन्यांच्या वैद्यकीय विमा योजने अंतर्गत रुग्णांना कॅशलेस उपचारांची सुविधा मिळू शकणार आहे. संस्थेने फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरवड्यात यासाठी जनरल इन्शुरन्स कौन्सिलसोबत एक करार केला आहे.

एआयआयए चे संचालक प्रा (वैद्य) पी. के. प्रजापती यांनी सांगितले की, या उपक्रमामुळे आयुर्वेदिक आरोग्य सेवा लोकांपर्यंत अधिक सहजतेने आणि कमी खर्चात पोहोचतील. यामुळे रुग्णांचा विश्वास वाढेल आणि त्यांना उचित लाभ मिळतील. आयुष मंत्रालयाने पहिल्यांदाच, लाभार्थ्यांना विम्याशी संबंधित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी आणि आयुष विमा संरक्षणाबाबत (आयुष इन्शुरन्स कव्हरेज) जागरूकता वाढवण्यासाठी 'आयुष हेल्थ इन्शुरन्स हेल्पलाईन 1800-11-0008' सुरू केली आहे.



## सायबर गुन्हेगारांपासून 8,000 कोटी रुपयांहून अधिक रक्कम वाचवली



देशात डिजिटल सेवांची व्याप्ती वाढण्यासोबतच ऑनलाइन फसवणुकीचेही नवनवीन मार्ग धुंडाळले जात आहेत. याच कारणामुळे वाढत्या सायबर फसवणुकीपासून नागरिकांना वाचवण्यासाठी सरकारने अनेक स्तरांवर प्रयत्न केले आहेत. याच दिशेने भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र (आय 4सी) ची सुरुवात करण्यात आली आहे.

आय 4सी अंतर्गत सर्व प्रकारच्या सायबर गुन्ह्यांचे तपशीलवार अहवाल सादर करण्यासाठी 'राष्ट्रीय सायबर गुन्हे रिपोर्टिंग पोर्टल' ([**https://cybercrime.gov.in**]) सोबतच 'नागरिक वित्तीय सायबर फसवणूक रिपोर्टिंग आणि व्यवस्थापन प्रणाली' (सीएफसीएफआरएमएस) ची सुरुवात 2021 मध्ये करण्यात आली होती. यानुसार 31 डिसेंबर, 2025 पर्यंत देशात 23.61 लाखांहून अधिक तक्रारींमध्ये 8,189 कोटी रुपयांहून अधिक रक्कम वाचवण्यात आली आहे. ऑनलाइन सायबर तक्रारी नोंदवण्यात मदतीसाठी टोल-फ्री हेल्पलाईन क्रमांक '1930' देखील वापरण्यात येत आहे.

## भारत करणार 6-जी मध्ये जगाचे नेतृत्व




भारत आता तंत्रज्ञानाच्या बाबतीत केवळ अनुकरण करणारा नसून जागतिक स्तरावर नेतृत्व करणारा म्हणून उदयास येत आहे. भारताची दळणवळण क्रांती आता केवळ महानगरांपुरती मर्यादित नसून गावांपर्यंत पोहोचत आहे, ज्यामुळे नागरिकांचे जीवन, शिक्षण, आरोग्य आणि उपजीविकेच्या स्तरात बदल झाला आहे. दळणवळण आणि ईशान्य क्षेत्र विकास मंत्री ज्योतिरादित्य एम. सिंधिया यांनी संसदेत सांगितले की, भारताने 4-जी मध्ये जगाचे अनुकरण केले, 5-जी मध्ये जगाच्या बरोबरीने पाऊल टाकले आणि 6-जी मध्ये जगाचे नेतृत्व करेल.

भारताने जगात सर्वात वेगवान गतीने 5-जी सेवा सुरू केली आहे. अवघ्या 22 महिन्यांत देशातील 99.9 टक्के जिल्ह्यांमध्ये 5-जी सेवा सुरू झाली आहे. देशात सध्या 40 कोटी नागरिक 5-जी चा लाभ घेत आहेत, तर वर्ष 2030 पर्यंत 1 अब्ज नागरिकांना 5-जी कनेक्टिव्हिटीची सुविधा मिळेल.

# भारताच्या क्रिकेट प्रतिभांची चमक

भारताची क्रीडा परिसंस्था गेल्या दशकात खूप मजबूत झाली आहे. मग तो आयसीसी महिला विश्वचषक 2025 असो, नेत्रहीन महिला टी-20 विश्वचषक असो, आयसीसी अजिंक्यपद करंडक असो किंवा आशिया चषक 2025 चा विजय असो, आपले खेळाडू जागतिक स्तरावर आपले वर्चस्व गाजवत आहेत. नवा सन्मान 19 वर्षांखालील क्रिकेट संघाने दिला आहे, ज्याने विक्रमी सहाव्यांदा एकदिवसीय विश्वचषक जिंकला आहे. हा विजय झिम्बाब्वेच्या हरारेमध्ये मिळवला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संघाला विजयाबद्दल शुभेच्छा दिल्या आणि म्हटले आहे की, 'विश्वचषक घरी आणण्यासाठी आमच्या 19 वर्षांखालील संघाबद्दल अभिमान आहे. संघाने संपूर्ण स्पर्धेत खूप चांगला खेळ केला आणि असाधारण कौशल्य दाखवले. हा विजय अनेक युवा खेळाडूंना देखील प्रेरित करेल. खेळाडूंना आगामी प्रयत्नांसाठी शुभेच्छा.' उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांनी देखील युवा विजेत्यांचे अभिनंदन केले.




## भारतीय अंतराळ स्थानकाच्या दिशेने वाढती पाऊले...

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्रो) भारतीय अंतराळ स्थानकाच्या पाच मॉड्यूल्सनी युक्त समग्र संरचना तयार केली आहे. पुनरावलोकनानंतर याच्या पहिल्या मॉड्यूलला मंजुरी देण्यात आली आहे. वर्ष 2028 पर्यंत भारतीय अंतराळ स्थानकाच्या (बीएएस-01) पहिल्या मॉड्यूलच्या विकास आणि प्रक्षेपणाची तयारी सुरू आहे. इस्रोच्या विविध केंद्रांमध्ये 'बीएएस-01' ची संपूर्ण प्रणाली अभियांत्रिकी तसेच त्याच्या वेगवेगळ्या उप-प्रणालींच्या तांत्रिक विकासाचे कार्य प्रगतीपथावर आहे. भारतीय अंतराळ स्थानक प्रगत जीवन-रक्षक प्रणाली आणि आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असेल. हे निम्न पृथ्वी कक्षेत प्रदीर्घ काळापर्यंत मानवाचे संभाव्य वास्तव्य प्रत्यक्षात आणू शकेल. याच्या माध्यमातून प्रगत वैज्ञानिक संशोधन आणि नवीन तंत्रज्ञानाचे परीक्षण केले जाऊ शकेल, ज्याचा समाज आणि अर्थव्यवस्थेवर सकारात्मक प्रभाव पडू शकतो. सोबतच, हे निम्न पृथ्वी कक्षेच्या पुढच्या भारतीय मानवी अंतराळ मोहिमांना देखील सहकार्य देईल. सरकारने आधीच्या मोहिमा, 'बीएएस-01' चा विकास आणि प्रक्षेपण यांना 'गगनयान' कार्यक्रमाच्या सुधारित व्याप्तीमध्ये समाविष्ट करत याचे अंदाजपत्रक 20,193 कोटी रुपये केले आहे.




## 260 वंदे भारत स्लीपर ट्रेन संच तयार केले जातील टप्प्याटप्प्याने सेवेत दाखल होतील

भारतीय रेल्वे सातत्याने आधुनिक रूप धारण करित आहे. ती वार्षिक 720 कोटींहून अधिक प्रवाशांची ने-आण करते. वंदे भारत, नमो भारत आणि अमृत भारत रेल्वेगाड्यांच्या माध्यमातून सेवा सातत्याने जोडल्या जात आहेत. याच मालिकेत वंदे भारत स्लीपर ट्रेनची सुरुवात अलीकडेच करण्यात आली आहे. सरकार याचा विस्तार करण्याच्या योजनेवर काम करत आहे. केंद्रीय रेल्वे, माहिती आणि प्रसारण तसेच इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले आहे की, सरकार सुरक्षित, विश्वासार्ह आणि आरामदायी वंदे भारत स्लीपर ट्रेन संच तयार करत आहे. वंदे भारत स्लीपर ट्रेन निर्मिती कार्यक्रम बीईएमएल आणि एकात्मिक कोच कारखाना आणि तांत्रिक भागीदारांद्वारे नमुना विकास, चाचणी आणि साखळी उत्पादनाच्या माध्यमातून टप्प्याटप्प्याने लागू केला जात आहे. एकूण 260 रॅक निर्मितीची योजना आहे, जे मागणी आणि परिचालन तत्परतेच्या आधारावर टप्प्याटप्प्याने सेवेत दाखल केले जातील.



# शत्रुच्याच शस्त्राने शत्रूचा बिमोड



जन्म : 3 मार्च 1976

*अतुलनीय शौर्यासाठी परमवीर चक्राने सन्मानित रायफलमॅन संजय कुमार यांनी कारगिल युद्धादरम्यान अदम्य शौर्य दाखवले आणि शत्रुच्याच शस्त्राने शत्रूला धूळ चारली. रक्तबंबाळ अवस्थेतही, या शूर सैनिकाने युद्धभूमीवरून परतण्यास नकार दिला. पॉइंट फ्लॅट टॉप पूर्णपणे शत्रूपासून मुक्त होईपर्यंत ते शत्रूशी लढत राहिले...*

संजय कुमार यांचा जन्म 3 मार्च 1976 रोजी हिमाचल प्रदेशातील बिलासपूर जिल्ह्यातील कलोल-बकैन गावात झाला. तीन बहिणी आणि दोन भावांमध्ये ते सर्वात लहान. लहानपणापासूनच सैन्यात भर्ती होण्याचे स्वप्न त्यांनी उराशी बाळगले. 1965 च्या भारत-पाकिस्तान युद्धात सहभागी झालेल्या त्यांच्या काकांनी आणि सैन्यात भर्ती झालेल्या इतर गावकऱ्यांनी सांगितलेल्या धाडसी युद्धकथांनी त्यांना सैन्यात भर्ती होण्याची प्रेरणा मिळाली. दृढनिश्चयी संजय कुमार अखेर 1996 मध्ये यशस्वी झाले आणि जम्मू आणि काश्मीर रायफल्सच्या 13 व्या बटालियनमध्ये सैनिक म्हणून रुजू झाले.

4 जुलै 1999 रोजी, 13 व्या जम्मू आणि काश्मीर रायफल्सच्या एका कंपनीतील प्रमुख स्काउट रायफलमॅन संजय कुमार यांना जम्मू आणि काश्मीरमधील मुश्कोह खोरे शत्रूच्या ताब्यातून मुक्त करण्यासाठी पाठवण्यात आले. शिखरावर पोहोचल्यानंतर, शत्रूच्या बंकरमधून होणाऱ्या जोरदार गोळीबाराचा त्यांना सामना करावा लागला. त्यानंतर समोरासमोरच्या प्रत्यक्ष लढाईत त्यांनी तीन घुसखोरांना यमसदनी पाठवले आणि ते स्वतः गंभीर जखमी झाले. या कारवाईने शत्रू सैनिक पूर्णतः बिथरले आणि एक यूनिवर्सल मशीन गन तिथेच सोडून पलायन करू लागले. रायफलमॅन संजय कुमार यांनी ती यूनिवर्सल मशीन गन उचलली आणि पळून जाणाऱ्या सैनिकांवर गोळीबार केला, ज्यामध्ये अनेक शत्रू सैनिक मारले गेले. रक्तबंबाळ अवस्थेतही त्यांनी युद्धभूमी सोडण्यास नकार दिला. त्यांच्या धाडसी कृतीने प्रेरित झालेल्या त्यांच्या साथीदारांनी शत्रूवर आक्रमण करून फ्लॅट टॉप क्षेत्र ताब्यात घेतले.

उच्च कोटीचे शौर्य आणि उच्च दर्जाचे अदम्य धैर्य दाखवल्याबद्दल, रायफलमॅन संजय कुमार यांना युद्ध पश्चात परमवीर चक्राने सन्मानित करण्यात आले. नायब सुभेदार संजय कुमार यांना 2 जुलै 2014 रोजी भारतीय सैन्यात ज्युनियर कमिशन्ड ऑफिसर म्हणून नियुक्त करण्यात आले. इतकेच नाही तर राष्ट्रीय संरक्षण अकादमीतील प्रशिक्षक संजय कुमार यांना त्यांच्या सैन्याप्रती असलेल्या समर्पणासाठी फेब्रुवारी 2022 मध्ये सुभेदार मेजर पदावर बढती देण्यात आली. 2026 मध्ये, भारतीय सैन्याने त्यांना प्रजासत्ताक दिनी मानद कॅप्टन पद बहाल केले. ▪




# सेवा आणि कर्तव्याचे 'नवं तीर्थ'

*केंद्र सरकारने एका नवीन प्रशासकीय संस्कृती आणि सुशासनाच्या दिशेने विकसित केलेले सेवा तीर्थ आणि कर्तव्य भवन या केवळ इमारती नसून कार्य संस्कृतीतील बदलाचे प्रतीक आहेत. हे परिवर्तन केवळ संरचनेतील नव्हे तर विचारसरणी आणि कार्यशैलीतील बदलाचेही आहे, जिथे राजेशाहीची भावना नाही तर सेवेची भावना आहे. विजया एकादशीच्या शुभ मुहूर्तावर, 13 फेब्रुवारी रोजी, सेवा तीर्थ हा पंतप्रधान कार्यालयाचा नवीन पत्ता झाला. या प्रसंगी, कर्तव्य भवन-1 आणि 2 चे उद्घाटन देखील कॉमन सेंट्रल सेक्रेटरीएट म्हणून करण्यात आले, जे विकसित भारताच्या संकल्प यात्रेच्या नव्या नांदीचे साक्षीदार बनले आहे...*

नवीन भारत युग प्रवर्तनाच्या मार्गावर वाटचाल करत आहे. विक्रम संवत 2082, फाल्गुन कृष्ण पक्षाची विजया एकादशी, 24 माघ, शक संवत 1947, जी सध्याच्या कॅलेंडरनुसार 13 फेब्रुवारी 2026 आहे, ही तारीख भारताच्या विकास यात्रेच्या नव्या सुरवातीची साक्षी ठरली. खरं तर, विकसित भारताच्या संकल्पाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दिवशी सेवा तीर्थ आणि कर्तव्य भवनचे उद्घाटन केले. नॉर्थ ब्लॉक आणि साउथ ब्लॉक वसाहतवादी राजवटीच्या गरजा आणि मानसिकता लक्षात घेऊन बांधण्यात आले होते. त्यावेळी तत्कालीन व्हाईसरॉयनी सांगितले होते की या इमारती ब्रिटिश सम्राटाच्या इच्छेनुसार बांधल्या गेल्या आहेत. रायसीना हिल्सची निवड अशा प्रकारे करण्यात आली होती की या इमारती इतर सर्वांपेक्षा उंच असतील आणि त्यांच्याशी कोणी तुलना करू शकणार नाही. रायसीना हिल्सच्या तुलनेत, सेवा तीर्थ संकुल थेट जमिनीशी जोडलेले आहे. साऊथ आणि नॉर्थ ब्लॉक्सची बांधणी वसाहतवादी मानसिकता लागू करण्यासाठी करण्यात आली होती, तर आजचे सेवा तीर्थ आणि कर्तव्य भवन हे भारतातील लोकांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी बांधले गेले आहेत. या इमारतींमध्ये घेतलेले निर्णय 140 कोटी नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी पाया रचतील.

सेवा तीर्थ आणि कर्तव्य भवनांच्या उद्घाटन समारंभात पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, 21 व्या शतकाची पहिली तिमाही आता पूर्ण झाली आहे. विकसित भारताचा दृष्टिकोन केवळ धोरणे आणि योजनांमध्येच नव्हे तर कामाच्या ठिकाणी आणि भवनांमध्येही प्रतिबिंबित होणे आवश्यक आहे. देशाचे प्रशासन ज्या ठिकाणाहून केले जाते ते प्रभावी, प्रेरणादायी आणि



**सेवा तीर्थ :** आता पंतप्रधान कार्यालय, राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालय आणि कॅबिनेट सचिवालय येथे आहे. पूर्वी, वेगवेगळ्या ठिकाणांहून या सर्वांचे संचालन होत होते.

**कर्तव्य भवन-1 आणि 2 :** यात वित्त, संरक्षण, आरोग्य आणि कुटुंब कल्याण, कॉर्पोरेट व्यवहार, शिक्षण, संस्कृती, कायदा आणि न्याय, माहिती आणि प्रसारण, कृषी आणि शेतकरी कल्याण, रसायने आणि खते आणि आदिवासी व्यवहार मंत्रालयांचा समावेश आहे.

### आधुनिक सुविधांनी सुसज्ज भवने

दोन्ही इमारतींच्या संकुलांमध्ये डिजिटली एकात्मिक कार्यालये, सुव्यवस्थित सार्वजनिक इंटरफेस झोन आणि केंद्रीकृत स्वागत सुविधा उपलब्ध आहेत. या संकुलांमध्ये अक्षय ऊर्जा प्रणाली, जलसंवर्धन उपाय आणि कचरा व्यवस्थापन उपाय प्रणाली आहेत. या संकुलांमध्ये स्मार्ट प्रवेश नियंत्रण प्रणाली, देखरेख नेटवर्क आणि प्रगत आपत्कालीन प्रतिसाद पायाभूत सुविधा यासारख्या व्यापक संरक्षण पायाभूत सुविधांचा देखील समावेश आहे.

*"सेवा तीर्थ आणि कर्तव्य भवन... यांची उभारणी भारतातील लोकांच्या अपेक्षापूर्तीसाठी झाली आहे. येथे घेतलेले निर्णय कोणत्याही महाराजाच्या दूरदृष्टीवर आधारित नसून, देशातील 140 कोटी नागरिकांच्या आकांक्षांवर आधारित असतील.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

## कर्तव्याच्या पायावर होणार विकसित भारताची उभारणी

कोट्यवधी नागरिकांच्या स्वप्नांना साकार करण्याचा पाया म्हणजे कर्तव्य!
कर्तव्य ही सुरुवात आहे, कर्तव्य म्हणजे या चैतन्यशील राष्ट्राचा प्राणवायू होय.
संकल्पांची आशा आहे- कर्तव्य!
परिश्रमाची पराकाष्ठा आहे- कर्तव्य!
प्रत्येक समस्येचे निराकरण आहे- कर्तव्य; विकसित भारताचा विश्वास आहे- कर्तव्य!
कर्तव्य म्हणजे समानता, कर्तव्य म्हणजे ममत्व, कर्तव्य सार्वत्रिक आहे, कर्तव्य सर्वव्यापी आहे.
सबका साथ- सबका विकासच्या भावनेत गुंफलेला मंत्र म्हणजे कर्तव्य!
राष्ट्राप्रती समर्पणाची भावना म्हणजे कर्तव्य!
प्रत्येक जीवनात प्रकाश प्रज्वलित करण्याची इच्छाशक्ती आहे- कर्तव्य!
आत्मनिर्भर भारताचा उल्हास म्हणजे कर्तव्य!
भावी पिढ्यांसाठी उज्ज्वल भविष्याची हमी आहे- कर्तव्य!
भारतमातेच्या जीवन-ऊर्जेचा ध्वजवाहक आहे- कर्तव्य!
राष्ट्राप्रती भक्तीभावाने केलेले प्रत्येक कार्य म्हणजे कर्तव्य!
'नागरिक देवो भवः' या आचरणाचा जागृत मार्ग म्हणजे कर्तव्य!

प्रेरक असले पाहिजे. पंतप्रधान मोदी म्हणाले की, साउथ ब्लॉक आणि नॉर्थ ब्लॉकमध्ये जागेची कमतरता होती आणि सुविधा मर्यादित होत्या आणि जवळजवळ शंभर वर्षे जुन्या असल्याने, इमारती आतून जीर्ण होत चालल्या होत्या. स्वातंत्र्य पश्चात अनेक दशकानंतरही, भारत सरकारची विविध मंत्रालये दिल्लीत 50 हून अधिक वेगवेगळ्या ठिकाणांवरून काम करत होती.

दरवर्षी, या मंत्रालयांच्या इमारतींच्या भाड्यावर 1,500 कोटी रुपये खर्च होत होते, तसेच कार्यालयांमध्ये ये-जा करणाऱ्या 8,000 ते 10,000 कर्मचाऱ्यांना दररोजच्या वाहतूक खर्चाचाही बोजा उचलावा लागत होता. सेवा तीर्थ आणि कर्तव्य भवन यांच्या उभारणीमुळे हे खर्च कमी होतील आणि कर्मचाऱ्यांचा वेळ वाचेल.



# नूतन पंतप्रधान कार्यालय - सेवा तीर्थ

सेवेची भावना ही भारताचा आत्मा आहे, सेवेची भावनाच भारताची ओळख आहे.
प्रशासन म्हणजे सेवा, जबाबदारी म्हणजे समर्पण.
सेवा तीर्थ हे फक्त एक नाव नाही, तर एक संकल्प आहे.
सेवा तीर्थ म्हणजे- नागरिकांच्या सेवेद्वारे पवित्र झालेले स्थान!
असे स्थान जिथे सेवेचा संकल्प साकार होतो!
आज भारतासमोरही विकसित भारताचे लक्ष्य आहे,
आत्मनिर्भर भारताचे ध्येय आहे.
आपल्याला कोट्यवधी देशवासियांना दारिद्र्यमुक्त करायचे आहे.
आपल्याला देशाला गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्त करायचे आहे,
आणि हे कार्य सेवेच्या शक्तीद्वारेच साध्य होईल.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

पंतप्रधान मोदींनी जुन्या इमारती राष्ट्रासाठी संग्रहालय म्हणून समर्पित करण्याचा निर्णय जाहीर केला, ज्यामुळे ती युगानुयुगे भारतीय संग्रहालयाचा भाग बनतील. ही इमारत भावी पिढ्यांसाठी प्रेरणा केंद्र म्हणून काम करेल. वसाहतवादी मानसिकता यापुढे चालू राहणार नाही असा संकल्प देशाने 2014 मध्ये केला होता. ही मानसिकता बदलण्यासाठी एक मोहीम हाती घेण्यात आली, परिणामी शहीदांना सन्मानित करण्यासाठी राष्ट्रीय युद्ध स्मारक आणि पोलिसांच्या शौर्याला ओळख मिळवून देण्यासाठी पोलिस स्मारक उभारले गेले. रेसकोर्स रोडचे नाव बदलून लोक कल्याण मार्ग असे ठेवण्यात आले.

पंतप्रधान मोदींनी स्पष्ट केले की सेवा तीर्थ हे केवळ एक नाव नाही तर एक संकल्प आहे -नागरिकांच्या सेवेच्या माध्यमातून एक पवित्र स्थान आणि सेवेचे व्रत पूर्ण करण्याचे एक केंद्र. 'तीर्थ'या शब्दाचे स्पष्टीकरण देताना ते म्हणाले, 'तीर्थ म्हणजे ज्यात तारण्याची आणि उद्दिष्टपूर्तीची क्षमता असेल." गेल्या अकरा वर्षांत, प्रशासनाचे एक नवीन मॉडेल उदयास आले आहे, जिथे नागरिक निर्णय घेण्याच्या केंद्रस्थानी आहेत. 'नागरिक देवो भवः' हा केवळ एक वाक्प्रचार नसून, ती आपली कार्य संस्कृती आहे, जी सर्व अधिकाऱ्यांनी या नवीन इमारतींमध्ये प्रवेश करताना आत्मसात केली पाहिजे.

## कोट्यवधी नागरिकांचे जीवन होईल सुकर

सेवा तीर्थ येथे घेतलेला प्रत्येक निर्णय, प्रक्रिया केलेली प्रत्येक फाईल आणि येथे घालवलेला प्रत्येक क्षण 140 कोटी नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी समर्पित केला पाहिजे. पंतप्रधान मोदींनी प्रत्येक अधिकारी, कर्मचारी आणि कर्मयोगी यांना या भवनात पाऊल ठेवताना क्षणभर थांबून स्वतःला विचारण्याचे आवाहन केले कि त्या दिवशीचे त्यांचे काम कोट्यवधी नागरिकांचे जीवन सुसह्य करेल का?' हेच आत्मचिंतन या ठिकाणाचे सर्वात मोठे बलस्थान बनेल यावर त्यांनी भर दिला.

## नवीन इमारती 2047 च्या विकसित भारताची दिशा निश्चित करतील

सेवा तीर्थ आणि कर्तव्य भवनात घेतलेला प्रत्येक निर्णय केवळ एका फाईलची मंजुरी नसून, तो 2047 च्या विकसित भारताची दिशा निश्चित करेल. प्रत्येक संस्था, प्रत्येक अधिकारी, प्रत्येक कर्मचारी आणि प्रत्येक कर्मयोगीची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पंतप्रधान मोदींनी त्यांचे दृष्टिकोन मांडताना म्हटले की सेवा तीर्थ हे संवेदनशील प्रशासनाचे प्रतीक आणि नागरिक-केंद्रित प्रशासनासाठी एक आदर्श ठरले पाहिजे. ■



अधिकृत वंदे मातरम् आणि सविस्तर नियमावली

# राष्ट्रीय गीताची सर्व सहा कडवी गा...
# कालावधी - 3 मिनिटे 10 सेकंद

*देश 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताचा 150 वा वर्धापन दिन साजरा करत आहे. या उत्सवाचा एक भाग म्हणून, केंद्र सरकारने आता राष्ट्रीय गीताचा आदर आणि योग्य शिष्टाचार याचे पालन करण्याकरिता एक आदेश जारी केला आहे, ज्यामध्ये सामान्य माहिती आणि मार्गदर्शनासाठी निर्देश समाविष्ट आहे. जेव्हा जेव्हा राष्ट्रीय गीत आणि राष्ट्रगीत दोन्ही गायले जाते किंवा वाजवले जाते तेव्हा प्रथम राष्ट्रीय गीत गायले पाहिजे. राष्ट्रपतींचे आगमन, राष्ट्रध्वज फडकावणे आणि राज्यपालांचे भाषण यासारख्या महत्त्वाच्या राजकीय प्रसंगी अधिकृत राष्ट्रीय गीत अनिवार्य आहे....*

बंकिमचंद्र चटर्जी यांनी रचलेले 'वंदे मातरम्' हे राष्ट्रीय गीत गाण्यासाठी भारत सरकारने जारी केलेल्या अधिकृत नियमावलीतील मार्गदर्शक तत्वांमध्ये सरकारी समारंभात ते कसे आणि केव्हा सादर करावे हे स्पष्ट केले आहे. नागरिकांचे अपेक्षित वर्तन, राष्ट्रीय गीत कोणत्या पद्धतीने गायले किंवा वाजवले पाहिजे यासोबतच त्याचा कालावधी देखील दिला आहे.

**कालावधी :** राष्ट्रीय गीत गाण्यासाठी किंवा वाजवण्यासाठी अंदाजे 3 मिनिटे आणि 10 सेकंद वेळ आहे.

**प्रथम राष्ट्रीय गीत:** हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की जर कोणत्याही कार्यक्रमात राष्ट्रीय गीत आणि राष्ट्रगीत दोन्ही गायले किंवा वाजवले गेले तर प्रथम राष्ट्रीय गीत गायले किंवा वाजवले जाईल आणि त्यानंतर राष्ट्रगीत.

**सिनेमा हॉल आणि चित्रपट प्रदर्शनांसाठी विशेष सवलत**

राष्ट्रीय गीत जेव्हा गायले किंवा वाजवले जाईल तेव्हा श्रोतृवर्ग सावधान स्थितीत उभे राहतील. परंतु जर राष्ट्रीय गीत एखाद्या बातमी किंवा माहितीपटाचा भाग म्हणून वाजवले जात असेल तर प्रेक्षकांना उभे राहणे बंधनकारक नाही. कारण प्रेक्षक उभे राहिल्यास राष्ट्रीय गीताची शान वाढण्याऐवजी चित्रपट प्रदर्शनात अडथळा निर्माण होईल. त्यामुळे अशांतता किंवा गोंधळ निर्माण होईल.

**मार्गदर्शक तत्वांमधील शिफारस:** जेव्हा एखाद्या बँडद्वारे वंदे मातरम् सादर केले जाते, तेव्हा ढोलकीचा ताल किंवा बिगुलचा आवाज औपचारिकपणे गायन सुरू झाल्याचे संकेत देण्यासाठी वापरला पाहिजे.

**राष्ट्रीय गीत गाण्याची परवानगी (गाणे वाजवण्यापेक्षा वेगळे)** राष्ट्रीय गीत कोणत्या प्रसंगी गायले जाऊ शकते (गाणे वाजवण्यापेक्षा वेगळे) याची विस्तृत यादी देणे शक्य नाही. तथापि, राष्ट्रीय गीत जेव्हा मातृभूमीला वंदन म्हणून श्रद्धेने गायले जात असेल तेव्हा राष्ट्रीय गीताच्या सामूहिक गायनासोबत गायला कोणताही आक्षेप नाही. फक्त गाताना योग्य शिष्टाचार पाळला पाहिजे.




## 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताचे बोल खालीलप्रमाणे आहेत...

*वंदे मातरम्।
सुजलाम् सुफलाम् मलयजशीतलाम्,
शस्यश्यामलाम् मातरम्। वंदे मातरम्।*

*शुभ्रज्योत्स्ना पुलकितयामिनीम्,
फुल्लकुसुमित द्रुमदलशोभिनीम्,
सुहासिनीम् सुमधुरभाषिणीम्,
सुखदाम् वरदाम् मातरम्। वंदे मातरम्।*

*कोटि-कोटि कण्ठ कल-कल निनाद कराले,
कोटि-कोटि भुजैर्धृत खरकरवाले,
के बॉले मां तुमि अबले,
बहुबलधारिणीं नमामि तारिणीम्,
रिपुदलवारिणीं मातरम्। वंदे मातरम्।*

*तुमि विद्या तुमि धर्म, तुमि हृदि तुमि मर्म,
त्वम् हि प्राणाः शरीरे, बाहुते तुमि मां शक्ति,
हृदये तुमि मां भक्ति, तोमारेई प्रतिमा गडि मंदिरे-मंदिरे।
वंदे मातरम्।*

*त्वम् हि दुर्गा दशप्रहरणधारिणी,
कमला कमलदलविहारिणी,
वाणी विद्यादायिनी, नमामि त्वाम्,
नमामि कमलाम् अमलाम् अतुलाम्,
सुजलां सुफलां मातरम्। वन्दे मातरम्।*

*श्यामलाम् सरलाम् सुस्मिताम् भूषिताम्,
धरणीम् भरणीम् मातरम्। वंदे मातरम्।*

**विद्यालयांमध्ये समूह गायनः** सर्व विद्यालयांमध्ये दिवसाचे कार्य राष्ट्रीय गीताच्या समूह गायनाने सुरू व्हावे. विद्यालय व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय गीत आणि राष्ट्रगीत लोकप्रिय करण्यासाठी आणि राष्ट्रध्वजाबद्दल आदर निर्माण करण्यासाठी त्यांच्या उपक्रमात योग्य व्यवस्था करावी.

### राष्ट्रीय गीताचे वादन

**राष्ट्रीय गीताची अधिकृत आवृत्ती, खालील प्रसंगी वाजवली जाईल:**

- नागरी सन्मान समारंभाच्या वेळी.
- औपचारिक राजकीय समारंभ आणि सरकारद्वारे आयोजित केलेल्या इतर समारंभांमध्ये राष्ट्रपतींचे आगमन आणि अशा समारंभांमधून त्यांच्या प्रस्थानावेळी.
- आकाशवाणी आणि दूरदर्शनवरून राष्ट्राला उद्देशून राष्ट्रपतींचा संदेश प्रसारित करण्यापूर्वी आणि नंतर.
- राज्यपाल/ नायब राज्यपालांचे त्यांच्या राज्य/केंद्रशासित प्रदेशातील औपचारिक राजकीय समारंभांमध्ये आगमन आणि अशा समारंभांमधून त्यांच्या प्रस्थानावेळी.
- संचलनात राष्ट्रध्वज आणताना.
- भारत सरकारने विशेष आदेश जारी केलेल्या इतर कोणत्याही प्रसंगी राष्ट्रीय गीत वाजवले जाईल. ▪

## प्रगती @ 50

# कालबद्ध विकासाची अद्भुत यात्रा...

*भारत 2014 मध्ये विकासाच्या नव्या दिशेने वाटचाल करत होता तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना हे जाणवले की मोठ्या प्रकल्पांचे आणि योजनांचे यश केवळ मंजुरीनेच नव्हे तर वेळेवर, समन्वित आणि प्रतिसादात्मक अंमलबजावणीने सुनिश्चित केले जाते. या दृष्टिकोनासह, मार्च 2015 मध्ये स्थापन झालेल्या 'प्रगती' मंचाने गेल्या दशकभराच्या वाटचालीत 50 बैठका घेतल्या आहेत, ज्यामुळे 85 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या 382 प्रकल्पांना गती मिळाली आहे. हा अनोखा उपक्रम देशभरातील विविध राज्यांमध्ये कोट्यवधी रुपयांचे रखडलेले आणि प्रलंबित प्रकल्प एकामागून एक वेगाने पूर्ण करत आहे. यामुळे 140 कोटी नागरिकांचा विकास सुनिश्चित होत आहे...*





- उत्तर प्रदेशातील सरयू नहर प्रकल्पाला मंजुरी मिळाली 1978 मध्ये, मात्र चार दशकांच्या विलंबानंतर 2021 मध्ये तो पूर्ण झाला.
- केरळमधील कोल्लम वळणरस्ता (बायपास) प्रकल्पाला मंजुरी मिळाली होती 1972 मध्ये आणि पाच दशकांच्या विलंबानंतर 2019 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याचे लोकार्पण केले.
- बिहारमधील कोसी रेल्वे महासेतू प्रकल्पाला मंजुरी मिळाली 2003-2004 मध्ये आणि दोन दशकांच्या विलंबानंतर 2020 मध्ये तो पूर्ण झाला.
- आसाममधील बोगीबील सेतू प्रकल्पाला मंजुरी मिळाली होती 1997 मध्ये,आणि दोन दशकांच्या विलंबानंतर 2018 मध्ये तो पूर्ण झाला.
- अटल बोगदा प्रकल्पाला मंजुरी मिळाली 2000 मध्ये आणि दोन दशकांच्या विलंबानंतर 2020 मध्ये तो पूर्णत्वास आला.
- ईस्टर्न वेस्टर्न पेरीफेरल (पूर्व आणि पश्चिम वळणमार्ग) प्रकल्पाला मंजुरी मिळाली 2006 मध्ये आणि एका दशकाच्या विलंबानंतर 2016 आणि 2018 मध्ये तो पूर्ण झाला.
- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाला मंजुरी मिळाली 2007 मध्ये आणि सुमारे दोन दशकांच्या विलंबानंतर डिसेंबर 2025 मध्ये तो पूर्ण झाला.
- जम्मू-उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे जोड प्रकल्पाला मंजुरी मिळाली 1994 मध्ये आणि जवळपास तीन दशकांच्या प्रतीक्षेनंतर जून 2025 मध्ये तो पूर्ण झाला.



**आता जरा विचार करा, कोणत्याही प्रकल्पाला होणारा इतका मोठा विलंब कधी राष्ट्रहिताचा ठरू शकतो का? अखेर पूर्वीची कार्यपद्धती अशी का होती की, एखादे काम एकदा अडकले की अनेक वर्षे तिथेच रेंगाळत राहायचे? ना कुणाची जबाबदारी होती, ना कुणी विचारणारे होते. फाईलींमध्ये योजना बनत राहिल्या, राजकीय फायद्यासाठी घोषणा होत राहिल्या, दीपप्रज्ज्वलन आणि शिलान्यासही झाले, पण फलश्रुती काय तर अनेक प्रकल्प दशकानुदशके केवळ कागदावरच खितपत पडले.**

अशा परिस्थितीत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मार्च 2015 मध्ये एक तंत्रज्ञान आधारित मंच तयार केला- 'प्रगति' (PRAGATI) म्हणजेच प्रो-ॲक्टिव्ह गव्हर्नन्स अँड टाइमली इम्प्लीमेंटेशन (सक्रिय प्रशासन आणि वेळेत

## 'प्रगति': एक दृष्टिक्षेप

- 'प्रगति' विकासाची नवी वाटः एक काळ असा होता की विकास प्रकल्पांच्या घोषणा झाल्यानंतर; प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या टप्प्यावर येताच मात्र ते प्रकल्प वास्तवातील अडचणींमुळे रखडायचे. मग तोकेरळमधील कोल्लम येथील साडे तेरा किलोमीटरचा वळणमार्ग (बायपास) तयार होण्यासाठी लागलेला 5 दशकांहून अधिकचा काळ असो, किंवा ओदिशामधील खुर्दा बलांगीर रेल्वे मार्ग तयार होण्यासाठी लागलेला 25 वर्षांहून अधिकचा वेळ.
- 'प्रगति' हे माहिती, संवाद आणि तंत्रज्ञानावर (आयसीटी) आधारित एक 'मल्टी मॉडेल' असे बहुविध व्यासपीठ आहे आणि त्याचा उद्देश प्रकल्पांचा आढावा घेणे आणि त्यातील अडथळे दूर करणे हा आहे.
- 'प्रगति' बैठकांच्या 50 व्या आवृत्तीपर्यंत (31 डिसेंबर 2025), एकूण 85 लाख कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या 382 प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला आहे.



हिवाळ्यात होणाऱ्या बर्फवृष्टीमुळे रोहतांग खिंडीनजीकचा मनाली-लेह महामार्ग पाच-सहा महिन्यांसाठी बंद पडायचा आणि या परिसराचा देशाच्या इतर भागांपासून संपर्क पूर्णपणे तुटलेला असायचा. परंतु, आता हा रस्ता संपूर्ण वर्षभर खुला झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 3 ऑक्टोबर 2020 रोजी 'अटल टनल' हा बोगदा, राष्ट्राला समर्पित केला.

> *उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत आणि पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत, दशकानुदशके रेंगाळलेल्या, भरकटलेल्या आणि रखडलेल्या योजना कालमर्यादेत पूर्ण होताना, लोकांनी पाहिल्या आहेत.*
>
> **- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



अंमलबजावणी). हे आता एक असे तंत्रज्ञान आधारित व्यासपीठ बनले आहे, ज्याची नुकतीच झालेली 50 वी बैठक विकासाच्या प्रवासातील मैलाचा दगड ठरली आहे. आतापर्यंत.'प्रगति' मंचावर 85 लाख कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या 382 प्रकल्पांना गती देण्यात आली आहे. या बैठकांमध्ये प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेतला जातो. यामध्ये कोणत्या मंत्रालयाला किंवा कोणत्या राज्याला काय अडचण येते, हे पाहिले जाते. कोणता कायदा आड आल्यामुळे समस्या निर्माण होत आहे, याचाही विचार होतो. सर्व पैलूंचे बारकाईने निरीक्षण केल्यानंतर त्यावर तोडगा काढला जातो. 'प्रगति'च्या या अंमलबजावणीमुळे रेल्वे, रस्ते, सिंचन किंवा ग्रामीण व्यवस्था अशा सर्वच क्षेत्रांतील समस्यांचे एकाच ठिकाणी निराकरण करण्यात आले. नुकताच जम्मू उधमपूर-श्रीनगर बारामुल्ला रेल्वे मार्ग प्रकल्प पूर्ण झाला असून, बर्फवृष्टीच्या हंगामातील त्याची एक ध्वनीचित्रफीत अत्यंत लोकप्रिय झाली आहे. चहूबाजूला पसरलेल्या बर्फाच्या चादरींमधून 'वंदे भारत' रेल्वेगाडी धावत आहे आणि लोक म्हणत आहेत की, "गैरसमज करून घेऊ नका, हे परदेशातले दृश्य नसून आपला हिंदुस्थान आहे." पण याची वस्तुस्थितीही जाणून घ्यायला हवी की, हा प्रकल्प तीन दशकांपासून रेंगाळला होता सध्याच्या केंद्र सरकारने तो प्रत्यक्षात साकार करून दाखवला. त्याचप्रमाणे आसाममधील बोगीबील ब्रिज; हा पूल अरुणाचल प्रदेश आणि आसामला जोडणारा अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे. कित्येक वर्षे हा प्रकल्प रखडला होता, 'प्रगति'च्या माध्यमातून याचा आढावा घेण्यात आला आणि आता आसामसह संपूर्ण ईशान्य भारताला मोठी सुविधा पुरवणारे हे काम पूर्ण झाले आहे.

खरे तर, कोणत्याही योजनेचे कृतीत रूपांतर होणे म्हणजेच नेमकी अंमलबजावणी काय असते, याची हजारो उदाहरणे आज देशासमोर

आहेत. पण प्रश्न असा आहे की, दशकानुदशके प्रलंबित राहिलेले प्रकल्प पूर्ण करण्याची जबाबदारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच का उचलली? खऱ्या अर्थाने ही नीती (धोरण), नीयत (प्रामाणिक हेतू) आणि निर्णयाची त्रिवेणी आहे जी कोणत्याही योजनेचा आधार असते आणि आज 'प्रगति' हा मंच त्यासाठीचाच पर्याय बनला आहे. हे केवळ जुन्या प्रकल्पांपुरते मर्यादित नाही; पंतप्रधान मोदींनी ज्या नवीन प्रकल्पांची सुरुवात केली, त्यावरही 'प्रगति' चे सतत लक्ष असते.

### 'स्वागत' ते 'प्रगति' विकासाची नवी यात्रा

'प्रगति' प्लॅटफॉर्मचे उदाहरण पहा. हिमाचल प्रदेशातील ऊनासाठी एका रेल्वे गाडीची घोषणा दशकांपूर्वी संसदेत झाली होती. परंतु, पंतप्रधान मोदी सत्तेत येईपर्यंत कागदावर त्याचे रेखाचित्रही तयार झाले नव्हते. हा विषय जेव्हा पंतप्रधान मोदींच्या अध्यक्षतेखालील 'प्रगति' मंचावर आला, तेव्हा त्याचे निराकरण झाले आणि आज ती गाडी डोंगराळ भागातील स्वप्नांना साकार करत आहे. असे अनेक विषय 'प्रगति' मंचावर आले, ज्यामध्ये प्रकल्प का रखडले आहेत, खर्चात किती तफावत निर्माण झाली आहे, कोणत्या विभागामुळे उशीर होत आहे आणि कोणी चुकीच्या पद्धतीने यात विलंब केला आहे, हे तपासले गेले. जी योजना 900 कोटी रुपयांत होणार होती, तिचा खर्च 90 हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचला होता. त्याचप्रमाणे, 2015 मध्ये 'प्रगति'च्या बैठकीत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विषय आला, तेव्हा पंतप्रधान मोदी चकित झाले. आर्थिक-औद्योगिक राजधानी मुंबईतील दुसऱ्या विमानतळाबाबत नोव्हेंबर 1997 मध्ये पहिल्यांदा समिती स्थापन झाली होती. तेव्हापासून सुमारे 20 वर्षे केवळ फाईल्स इकडे-तिकडे फिरत होत्या. या दरम्यान किती सरकारे आली आणि गेली, पण नवी मुंबई विमानतळाची फाईल पुढे सरकू शकली नाही. 'प्रगति'च्या बैठकीत

## 'प्रगति'चा वेग

### आणि महत्त्व अशा प्रकारे समजून घेता येईल

**'प्रगति' मंचाची सुरुवात 25 मार्च 2015 रोजी झाली**

आतापर्यंत 'प्रगति'च्या **50** बैठका पार पडल्या आहेत

**382** प्रमुख राष्ट्रीय प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला.

**85** लाख कोटी रुपयां पेक्षा अधिक खर्चाच्या प्रकल्पांना गती देण्यात आली.

61 कल्याणकारक योजनांचा यात समावेश आहे ज्यामध्ये प्रामुख्याने 'वन नेशन वन रेशन कार्ड'(एक देश एक शिधापत्रिका) 'पीएम जन आरोग्य योजना', 'पीएम आवास योजना', 'पीएम स्वनिधि' आणि 'स्वच्छ भारत मिशन' समाविष्ट आहेत.

**36** प्रमुख क्षेत्रांतील तक्रारींचे निवारण करण्यात आले, ज्यामध्ये कोरोना, रेरा (आर इ आर ए), बँकिंग, विमा, मातृ वंदना आणि जन धन योजना यांचा समावेश आहे.

**7,735** मुद्दे येथे उपस्थित करण्यात आले ज्यापैकी → **7,156** मुद्द्यांचे यशस्वीरित्या निराकरण करण्यात आले.

**भांडवली खर्च**

**आर्थिक वर्ष 2014-15 मध्ये 4.26 लाख कोटी रुपयांवरून आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये साडेतीन पट वाढून हा खर्च अंदाजे 15.53 लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे.**



# समस्या निवारण यंत्रणा




पंतप्रधान मोदींनी सर्व अधिकारी आणि सर्व विभागांना समोरासमोर आणून या प्रकल्पातील सर्व अडथळे दूर केले आणि नवी मुंबई विमानतळाचे स्वप्न साकार झाले आहे. त्याचप्रमाणे 2017 मध्ये दिल्लीतील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर या आंतरराष्ट्रीय केंद्राचे स्वप्न सत्यात उतरले. हे केंद्र उभारण्याचा निर्णय 1992 मध्ये झाला होता, परंतु 23 वर्षे काहीच हालचाल झाली नाही. 2014 मध्ये पंतप्रधान मोदींच्या कार्यकाळातच याचा शिलान्यास आणि लोकार्पण झाले.

ही तर केवळ एका प्रकल्पाची कथा आहे; असे 382 प्रकल्प आज एकतर पूर्ण झाले आहेत किंवा पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. हे कार्यसंस्कृतीमध्ये झालेल्या बदलाचे जिवंत उदाहरण आहे. अशा प्रकल्पांची यादी खूप मोठी आहे. पंतप्रधान झाल्यानंतर नरेंद्र मोदी यांनी वेळीच घेतलेल्या पुढाकारामुळे देशातील विविध राज्यांमध्ये हजारो कोटी रुपयांचे 'अडकलेले, भटकलेले आणि रेंगाळलेले' प्रकल्प एकामागून एक वेगाने पूर्ण होत आहेत. हे प्रकल्प, फाईल्समधून बाहेर काढून वास्तवात निश्चित वेळेत उतरवण्यात आले आहेत. हा क्रांतिकारक बदल 'प्रगति' प्लॅटफॉर्मच्या मदतीने शक्य झाला आहे. यामुळे केवळ भ्रष्टाचारच संपला नाही, तर खर्च आणि वेळेतही मोठी बचत झाली आहे. या चौफेर विकासाचा लाभ दुर्गम भागातील शेतकरी, आदिवासी, गरीब आणि महिलांपर्यंत थेट पोहोचत आहे.पंतप्रधान मोदींच्या मार्गदर्शनाखाली भारत सरकारच्या विविध विभागांमध्ये आणि राज्य सरकारांमध्ये समन्वय प्रस्थापित झाला असून अनेक प्रलंबित प्रकल्प पूर्ण होऊ शकले. या मंचावर विकास प्रकल्पांची देखरेख पंतप्रधान मोदी स्वतः करतात. 25 मार्च 2015 पासून ते, दरमहा अशाच प्रकारे बैठका घेत आहेत. या मंचाद्वारे हुडकलेल्या सुमारे 96 % समस्यांचे निराकरण करण्यात आले, ज्यामुळे विलंब, वाढीव खर्च आणि समन्वयातील त्रुटींमध्ये मोठी घट झाली. या मंचावर प्रत्येक विभागाशी केवळ चर्चाच होत नाही, तर जागेवरच तातडीने तोडगा काढला जातो.या प्लॅटफॉर्मच्या मुळाशी पंतप्रधान मोदींचा गुजरातचा अनुभव आहे. गुजरातचे मुख्यमंत्री असताना त्यांनी 'स्वागत' (SWAGAT) हा मंच सुरू केला होता. हे एक असे तांत्रिक माध्यम होते, ज्याद्वारे जनतेच्या तक्रारी थेट मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचत आणि त्यांचे वेळेत निराकरण होत असे. 'स्वागत'ने पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाचा पाया रचला. हाच अनुभव घेऊन पंतप्रधान मोदींनी त्याचा राष्ट्रीय स्तरावर विस्तार केला आणि 'प्रगति'च्या रूपाने एक एकात्मिक, बहु-संस्थात्मक मंच तयार केला, जो संघराज्य पद्धतीचे उत्तम उदाहरण ठरला. यानंतर मोठ्या आणि प्रमुख प्रकल्पांशी संबंधित तक्रारी दूर करण्यासोबतच त्यात विलंब होऊ नये यासाठी सर्वांना एकाच छताखाली आणण्यात आले. येथे मंत्रालय आणि विभाग स्वतंत्रपणे काम करण्याच्या पलीकडे जाऊन समस्यांवर एकत्रित मार्ग शोधतात.

पंतप्रधान मोदी स्वतः म्हणतात की, 2014 पासून सरकारने 'कार्यपूर्ती' आणि 'जबाबदारी' या गोष्टींना संस्थात्मक स्वरूप देण्यासाठी काम केले आहे. यासाठी एक अशी प्रणाली विकसित करण्यात आली आहे, ज्यात कामाचा सतत पाठपुरावा करून ते पुढे नेले जाते. कोणतीही योजना ठराविक वेळेत आणि

# 'प्रगती' परिसंस्थेमध्ये समस्यांचे निराकरण

7,735 मुद्दे मांडले गेले | 7,156 मुद्द्यांचे निराकरण करण्यात आले







निश्चित खर्चामध्येच पूर्ण केली जाते. पंतप्रधान मोदींचे म्हणणे आहे की, पूर्वी सुरू झालेले जे प्रकल्प अर्धवट राहिले होते किंवा ज्यांच्याकडे दुर्लक्ष झाले होते, ते राष्ट्रीय हितासाठी पुनरुज्जीवित करून पूर्ण करण्यात आले आहेत. दशकानुदशके रखडलेले अनेक प्रकल्प 'प्रगती' मंचाच्या कक्षेत आल्यानंतर यशस्वीरित्या पूर्ण झाले आहेत.

## 'एक संघ म्हणून भारता'चे भव्य उदाहरण

पंतप्रधान मोदींच्या मते, प्रकल्प केवळ इच्छशक्तीच्या अभावामुळेच अपयशी ठरत नाहीत, तर अनेकदा प्रकल्पांच्या अपयशाचे कारण म्हणजे समन्वयाचा अभाव आणि विखुरलेल्या पद्धतीने काम करण्याची पद्धत हे असते. 'प्रगती' मंचाने यावर उपाय म्हणून सर्व संबंधित घटकांना एकाच व्यासपीठावर आणले आहे, जे सामायिक उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. आज 'प्रगती' हे 'सहयोगी संघराज्य प्रणालीचे' एक प्रभावी रुप बनले आहे, जिथे केंद्र आणि राज्ये एका संघाच्या रूपात काम करतात. 50 व्या बैठकीत पंतप्रधानांनी नमूद केले की, या उपक्रमाच्या सुरुवातीपासून आतापर्यंत भारत सरकारचे सुमारे 500 सचिव आणि राज्यांचे मुख्य सचिव 'प्रगती' बैठकीत सहभागी झाले आहेत. या व्यासपीठामुळे राष्ट्रीय प्राधान्यक्रमाच्या कामांसाठी पुरेसा निधी सुनिश्चित झाला असून विविध क्षेत्रांत सातत्याने गुंतवणूक होत आहे. 'रिफॉर्म, परफॉर्म, ट्रान्सफॉर्म' (सुधारणा, कामगिरी, परिवर्तन) या मंत्राला पुढे नेत पंतप्रधान मोदींनी आता 'प्रगती'च्या माध्यमातून पुढील टप्प्यासाठी नवीन मंत्र दिला आहे— "सुलभीकरणासाठी सुधारणा करा, पूर्णत्वासाठी काम करा आणि छाप पाडण्यासाठी परिवर्तन घडवा."

## तंत्रज्ञानातून 'प्रगती'चा नवा मार्ग

"जेव्हा योजनांना गती मिळते, तेव्हाच देशात प्रगती होते." धाडसी सुधारणांचे प्रणेते बनलेल्या पंतप्रधान मोदींची हीच विचारसरणी एका नव्या विश्वासाचे प्रतीक ठरली आहे. एकेकाळी अशक्य किंवा किरकोळ मानून नशिबावर सोडून दिलेल्या आशा आता प्रत्यक्षात उतरत आहेत. प्रस्थापित चौकटीबाहेर जाऊन सुरू केलेली ही 'प्रगती' मोहीम नव्या भारताच्या बदलाची गाथा लिहीत आहे, जेणेकरून 2047 मध्ये देश जेव्हा आपल्या स्वातंत्र्याचे शताब्दी वर्ष साजरे करेल, तेव्हा याच संकल्पांची पूर्तता भारताला जगातील शक्तिशाली देशांच्या पंक्तीत उभं करू शकेल. लोकांच्या गरजा आणि आकांक्षा ओळखून वेगवान काम केल्यानेच नव्या भारताचे ध्येय गाठता येईल. याच दिशेने केंद्र स्तरावर 'प्रगती' नावाच्या व्यवस्थेची निर्मिती हा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे. देशाच्या विविध योजनांमधील पायाभूत सुविधा प्रकल्पांना वेग देण्यात या 'प्रगती' प्लॅटफॉर्मची,खूप मोठी भूमिका आहे. सर्व संबंधित घटकांशी थेट संवाद साधून अनेक दशकांपासून रखडलेल्या प्रकल्पांवर तोडगा काढला जावा, हे 'प्रगती'

# ऑक्सफर्डच्या सॅद बिझनेस स्कूलचा अभ्यास

**सर्वोच्च नेतृत्वाकडून दिशाः** PRAGATI ('प्रगती') आज ज्या स्वरूपात आहे, ते निर्णायक आणि सक्रिय नेतृत्वाचे.. विशेषतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचे फळ आहे. सर्वोच्च स्तरावर नियमित मासिक आढावा आणि थेट सहभागामुळे केवळ स्पष्ट दिशाच मिळाली नाही, तर समस्यांच्या जलद निराकरणालाही वेग आला. यामुळे सर्व घटकांमध्ये संघभावनेची (टीमवर्क) सामूहिक भावना बळकट झाली.

'प्रगती'चा प्रभाव केवळ आर्थिक विकासापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर याने सामाजिक प्रगती आणि पर्यावरणीय स्थैर्यालाही चालना दिली आहे. रस्ते, रेल्वे, पाणी आणि वीज यांसारख्या अत्यावश्यक सेवा देणाऱ्या प्रकल्पांना गती देऊन 'प्रगती'ने कोट्यवधी भारतीयांच्या जीवनमानात सुधारणा केली आहे. या मंचाने आपल्या कार्यप्रणालीत स्थैर्य-शाश्वतता  हा मूलभूत घटक म्हणून समाविष्ट केला आहे. यामुळे पर्यावरणीय मंजुरी मिळवण्यास मदत झाली असून हरित तंत्रज्ञानाच्या वापराला प्रोत्साहन मिळाले आहे. हा व्यापक दृष्टिकोन भारताचा विकास सर्वसमावेशक असण्यासोबतच निरंतर-शाश्वत असेल याची ग्वाही देतो.

भारतीय रिझर्व्ह बँक आणि 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक फायनान्स अँड पॉलिसी' (एन आय पी एफ पी) या राष्ट्रीय सार्वजनिक वित्त आणि  धोरण संस्थेच्या अभ्यासाचा दाखला देत या उदाहरणाधारित अभ्यासा (केस स्टडी) मध्ये म्हटले आहे की, पायाभूत सुविधांवर खर्च केलेल्या प्रत्येक 1 रुपयाच्या बदल्यात देशाला सकल राष्ट्रीय उत्पादनात (जीडीपी) सुमारे 2.5 ते 3.5 रुपयांचा लाभ मिळतो.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेली ही पायाभूत सुविधा क्रांती 'विकसित भारत 2047' उपक्रमाचा एक महत्त्वाचा स्तंभ आहे. स्वातंत्र्याच्या 100 व्या वर्धापनदिनापर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचे उद्दिष्ट असलेला हा एक महत्त्वाकांक्षी कृती आराखडा (रोडमॅप) आहे. या उपक्रमात पायाभूत सुविधांचा विकास, आर्थिक वृद्धी, सामाजिक प्रगती, तांत्रिक उन्नती आणि शाश्वत विकास यासह राष्ट्रीय विकासाच्या व्यापक उद्दिष्टांचा समावेश आहे. या अंतर्गत 2047 पर्यंत 30 ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवण्याचे लक्ष्य आहे. तसेच 100 टक्के साक्षरता, आरोग्य सेवांच्या सार्वत्रिक उपलब्धतेची हमी आणि भारताला संशोधन तसेच नवोन्मेषाचे जागतिक केंद्र बनवणे अशी प्रमुख उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.




च्या बैठकांमध्ये निश्चित केले जाते. वर्षानुवर्षे अडकलेल्या आणि रखडलेल्या योजनांना गती मिळाल्यामुळे राष्ट्राच्या विकासाला वेग येतो. आज लघु उद्योगांना, विशेषतः सूक्ष्म-लघू- मध्यम उद्योग (एम एस एम ई) क्षेत्राला एक असा आत्मविश्वास मिळाला आहे की, ते जगातील मोठ्या बाजारपेठांशी स्पर्धा करू शकतात. आज त्यांच्याकडे बड्या देशांप्रमाणेच पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत.

तंत्रज्ञानाची सांगड घालणे आणि त्याला उत्तम राज्यकारभाराचे एक महत्त्वाचे साधन बनवण्याची कला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अवगत आहे, यात काही शंका नाही. जमिनी स्तरावर त्यांचा लोकांशी दांडगा वैयक्तिक संपर्क तर आहेच, शिवाय समाज माध्यमावरही त्यांचे अस्तित्व प्रभावी आहे. भारताचे सर्वात तंत्रज्ञान स्नेही ('टेक-सॅव्ही') नेते म्हणूनही त्यांची ओळख आहे. लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि त्यांच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी ते समाज माध्यमाचा उपयोग करतात. तंत्रज्ञानाच्या समन्वयातून त्यांनी 'प्रगती'चा असा मंच तयार केला आहे, ज्यामुळे दीर्घकाळापासून रखडलेल्या प्रकल्पांना नवी दिशा मिळत आहे.

### ऑक्सफर्डच्या अभ्यासात शिक्कामोर्तब: गेमचेंजर

डिसेंबर 2024 मध्ये ऑक्सफर्डच्या एका अभ्यासाने भारताच्या प्रमुख प्रकल्पांना गती देण्यात 'प्रगती'च्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित केले आहे. गेट्स फाऊंडेशन पुरस्कृत ऑक्सफर्डच्या 'सॅद बिझनेस स्कूल'द्वारे (Sad Business School) एक अभूतपूर्व उदाहरणाधारित अभ्यास (केस स्टडी) करण्यात आला. 'From Gridlock to Growth: How Leadership Enables India's PRAGATI Eco-system to Power Progress' ("कोंडीमधून प्रगतीकडेः कशी नेतृत्वामुळे भारताची 'प्रगती' (PRAGATI) परिसंस्था विकासाला गती देते")असे या अभ्यासाचे शीर्षक आहे. यामध्ये 'प्रगती'ला भारताच्या डिजिटल प्रशासन क्षेत्रातील कलाटणी देणारे ('गेम चेंजर') म्हणून गौरवण्यात आले आहे. आज 'प्रगती' मंच, हा तंत्रज्ञान आणि प्रशासनाचे एक अद्भुत मिश्रण आहे, जे अडथळे दूर करून प्रकल्प वेळेत पूर्ण होतील याची खात्री देते.

### नव्या परंपरांच्या उदयामुळे मिळाली गती

अमृत महोत्सव आणि 2047 पर्यंत भारताला 'विकसित' बनवण्याचा संकल्प हा एका नव्या भारताच्या पायाभरणीचा प्रारंभ होता. 25 वर्षांच्या अमृत काळ प्रवासाची सुरुवात असो, किंवा लाल किल्ल्यावरून स्वच्छता आणि सॅनिटरी पॅडचा उल्लेख करून केलेली जनजागृती असो  अर्थसंकल्पाला नवी दिशा देणे

# पंतप्रधानांनी 'प्रगती' प्लॅटफॉर्मवर या क्षेत्रांतील प्रकल्पांचा आढावा घेतला




> *21 व्या शतकातील भारत... मोठे निर्णय घेतो. वेगाने निर्णय घेतो. मोठ्या ध्येयासह पुढे जातो. एका निश्चित कालमर्यादेत परिणती साध्य करुनच श्वास घेतो.*
>
> **- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

असो किंवा 'प्रगती' सारख्या मंचावरून दशकांपासून प्रलंबित असलेल्या प्रकल्पांना गती देणे असो. युवा-विद्यार्थी-खेळाडू आणि लाभार्थ्यांशी थेट संवाद, 'ईज ऑफ डुइंग बिझनेस' अर्थात व्यवसाय सुलभते पासून 'ईज ऑफ लिव्हिंग' म्हणजे सुकर जीवनपद्धती बद्दल बोलणे असो किंवा उपेक्षित राहिलेल्या महापुरुषांना योग्य सन्मान मिळवून देणे असो. प्रशासकीय यंत्रणेला अधिक कार्यक्षम करून शेवटच्या टोकापर्यंत वेळेत सेवा पोहोचवणे सुनिश्चित करणे असो किंवा प्रशासकीय सुधारणांसाठी 'मिशन कर्मयोगी' आणि मंत्रालये-विभागांमधील उत्तम समन्वयाचा पुढाकार असो. दशकांपासून असलेली वेगवेगळी करप्रणाली दूर सारत 'एक देश-एक कर' (जीएसटी- वस्तू सेवा कर) च्या रूपाने केलेली आर्थिक क्रांती असो किंवा जम्मू-काश्मीर साठीचे कलम 370 हटवणे असो..कधी काळी जे अशक्य किंवा किरकोळ मानून नशिबाच्या हवाली सोडून दिले होते, त्या आशा आता प्रत्यक्षात साकार होत आहेत. प्रस्थापित चौकटीबाहेर जाऊन सुरू केलेले हे उपक्रम नव्या भारताच्या बदलाची पटकथा तयार करत आहेत, जेणेकरून 2047 मध्ये जेव्हा देश आपल्या स्वातंत्र्याचे शताब्दी वर्ष साजरे करेल, तेव्हा याच संकल्पांची पूर्तता त्याला जगातील सामर्थ्यवान देशांच्या पंक्तीत उभे करू शकेल.

निश्चितपणे, विकसित भारत @ 2047 हा केवळ एक राष्ट्रीय संकल्प नाही तर ते एक वेळेचे बंधन असलेले लक्ष्य देखील आहे आणि राष्ट्रीय हितार्थ, 'प्रगती' हा उपक्रम, ते साध्य करण्यासाठी एक मजबूत आधारस्तंभ म्हणून काम करत आहे. 'प्रगती' च्या बैठकांमुळे सामान्य नागरिकांना आपला आवाज पोहोचवण्याचा, निर्णयप्रक्रियेत सहभागी होण्याचा आणि शासनाकडून थेट माहिती मिळवण्याचा अधिकार मिळतो आहे.. हा अधिकार कायद्यात लिहिलेला नाही, परंतु सरकारी योजना वेळेवर पूर्ण व्हाव्यात हा नागरिकांचा हक्क आहे. पूर्वी तीन-तीन, चार-चार दशकांपासून अनेक योजना रखडलेल्या होत्या. त्या पूर्ण करण्याचा विडा सध्याच्या केंद्र सरकारने उचलला. 'प्रगती' मंचामुळे पारदर्शकता वाढली आहे आणि कार्यसंस्कृतीत बदल झाला आहे. निश्चित वेळेत आणि निश्चित ध्येयानुसार पूर्ण होत असलेल्या योजना, 'नेक्स्ट जनरेशन इन्फ्रास्ट्रक्चर' (आधुनिक पायाभूत सुविधा) निर्माण करण्याचा वेग आणि त्यांची व्याप्ती, हे सर्व तेव्हाच शक्य झाले आहे, जेव्हा जमिनी स्तरावर जाऊन प्रक्रियांमध्ये सुधारणा केल्या गेल्या आहेत आणि पारदर्शकता सुनिश्चित केली गेली आहे. या अवाढव्य प्रयत्नांच्या मागे 21 व्या शतकातील युवा भारताच्या अगणित आकांक्षा आहेत. अशा आकांक्षा ज्या पायाभूत सुविधा आणि सुरक्षेच्या अभावामुळे पूर्ण होणे कठीण होते. 'प्रगती' सारख्या प्रभावी व्यासपीठामुळे नवा भारत त्या अडचणी दूर करत आहे, तरुणांच्या स्वप्नांना सामर्थ्य देत आहे आणि संकल्प सिद्ध करण्याच्या दृढ इच्छाशक्तीने सज्ज आहे. यामुळे 2047 पर्यंत भारताला विकसित बनवण्याचे स्वप्न साकार होईल आणि 140 कोटी नागरिकांच्या आकांक्षा आणि अपेक्षा पूर्ण होतील.

*चला तर मग, आता 'प्रगती'च्या निकषावर घासून-पुसून घेतलेल्या अशाच काही प्रकल्पांबद्दल जाणून घेऊया ज्यांनी विकसित भारताची पायाभरणी केली आहे...*

प्रकल्प

# ब्रह्मपुत्रा नदीवर बोगीबिल रेल्वेसह रस्ता सेतू

प्रकल्पाची मंजुरी
**मार्च 1997**

‘प्रगती’ प्लॅटफॉर्म आढावा
**27 मे 2015**

गुंतवणूक
**5,920**
कोटी रुपये

उद्घाटन
पंतप्रधान नरेंद्र मोदी
**25 डिसेंबर 2018**

तथ्य
**आसाममधील दिब्रुगढ आणि धेमाजी जिल्ह्यांदरम्यान ब्रह्मपुत्रा नदीवर बांधलेला हा पूल देशासाठी आर्थिक आणि सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे.**

*हा केवळ एक सेतू नाही तर या प्रदेशातील लाखो लोकांचे जीवन जोडणारी जीवनरेखा आहे. यामुळे आसाम आणि अरुणाचल प्रदेशमधील अंतर कमी झाले आहे तसेच लोकांना अनेक अडचणींपासून मुक्तता मिळाली आहे.*

**– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

## बोगीबिल सेतू

### आसाम-अरुणाचलची नवीन जीवनरेखा

*आसाममधील बोगीबिल सेतू प्रकल्पाला 1997 मध्ये मंजुरी देण्यात आली आणि दोन दशकांच्या विलंबानंतर 2018 मध्ये तो पूर्ण झाला.*

- हा देशातील पहिला पूर्णतः पोलादाचा पूल आहे. पाण्यापासून 30 मीटरपेक्षा जास्त उंचीवर बांधलेला हा पूल म्हणजे अभियांत्रिकी आणि तांत्रिक सामर्थ्याचे उदाहरण आहे.
- 4.94 किलोमीटर लांबीच्या बोगीबिल पुलामुळे धेमाजी ते दिब्रुगड हे अंतर फक्त 100 किलोमीटरवर आले आहे. पूर्वी हे अंतर 500 किलोमीटर होते, जे कापण्यासाठी 24 तास लागत असत.
- हा देशातील सर्वात लांब रेल्वे-कम-रोड पूल आहे, ज्याच्या वरच्या बाजूला रस्ता आणि खालच्या बाजूला रेल्वेमार्ग आहे. बोगीबिल पुलाचे बांधकाम 1965 मध्ये सुरू झाले. यात 30 लाख सिमेंटच्या गोणी आणि 125 मीटर लांबीचे 39 गर्डर वापरले आहेत.





प्रकल्प

# शरयू कालवा राष्ट्रीय प्रकल्प चार दशकांनंतर झाला पूर्ण

प्रकल्पाला मंजुरी
**वर्ष1978**

प्रकल्पाची लांबी 318 किमी आणि जोडणी 6,590 किलोमीटर

सिंचन लक्ष्य
14 लाख हेक्टर जमीन

उद्घाटन
पंतप्रधान नरेंद्र मोदी
**11 डिसेंबर 2021**

बाधा
आंतरविभागीय समन्वय आणि योग्य देखरेखीचा अभाव यामुळे प्रकल्पाला विलंब झाला.

> *जर हे सरकारी पैसे असतील तर मी का काळजी करावी?" ही मानसिकता देशाच्या संतुलित आणि सर्वांगीण विकासातील सर्वात मोठा अडथळा बनली. या मानसिकतेमुळे शरयू कालवा प्रकल्पही रखडला. पाच दशकांमध्ये पूर्ण झालेल्या कामांपेक्षा आम्ही पाच वर्षांत शरयू कालवा प्रकल्पावर जास्त काम केले आहे. प्रकल्प वेळेवर पूर्ण करणे याला आमचे प्राधान्य आहे.*
>
> **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



- प्रकल्पाच्या सुरुवातीपासून त्यावरील खर्चाच्या रकमेत सहा वेळा सुधारणा करण्यात आली. कामातील विलंबामुळे बांधकाम साहित्य, कामगार आणि जमीन अधिग्रहणाचा खर्च वाढला आहे.
- प्रकल्प पूर्ण करण्याचे लक्ष्य 1982 मध्ये 1988-89 साठी निश्चित करण्यात आले होते.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने 2014 मध्ये काम सुरू केले तेव्हा एका आढावा अहवालात असे दिसून आले की देशातील 99 मोठे सिंचन प्रकल्प दशकांपासून प्रलंबित होते. त्यामध्येच शरयू कालवा राष्ट्रीय प्रकल्प होता.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील प्रगती प्लॅटफॉर्मवर दशकांपासून सुरू असलेल्या प्रकल्पांचा आढावा घेतल्यानंतर शरयू कालवा प्रकल्पासमोरील अडथळे वेळोवेळी दूर करण्यात आले.
- शरयू कालवा राष्ट्रीय प्रकल्पाचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 11 डिसेंबर 2021 रोजी उत्तर प्रदेशातील बलरामपूर येथून केले.
- या प्रकल्पाचा फायदा पूर्व उत्तर प्रदेशातील बहराइच, श्रावस्ती, बलरामपूर, गोंडा, सिद्धार्थनगर, बस्ती, संत कबीर नगर, गोरखपूर आणि महाराजगंज या नऊ जिल्ह्यांमधील 29 लाखांहून अधिक शेतकऱ्यांना होत आहे.
- या प्रकल्पासाठी सुरुवातीला 100 कोटींपेक्षा कमी खर्चाची योजना होती. प्रकल्प पूर्ण होईपर्यंत खर्चाची रक्कम वाढत 10 हजार कोटींपेक्षा जास्त झाली.



प्रकल्प

# पाटणा : गंगा रेल-सह-रोड ब्रिज

प्रकल्प मंजुरी
**5 नोव्हेंबर 2001**

प्रगतीची तारीख
**25 मार्च 2015**

गुंतवणूक
**₹ 3,774 कोटी**

उद्घाटन
**3 मार्च, 2022**

बाधा
**भूसंपादन, भरपाई आणि पुनर्वसन आणि प्रकल्पाची संपूर्ण अंमलबजावणी.**

## पंतप्रधानांचे निर्देश

- प्रकल्पाच्या विलंबामुळे खर्च पाचपट वाढला. रेल्वे मार्गाच्या दोन्ही बाजूंना असलेल्या मार्गांसाठी आवश्यक असलेली जमीन रेल्वेकडे सोपवावी. बाधित रहिवाशांना तातडीने भरपाई देण्यात यावी. त्यांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करावी.
- या निर्देशानुसार, उत्तर आणि दक्षिण या दोन्ही रेल्वे मार्गांवरील प्रवेशासंबंधित सर्व मार्गांच्या समस्या मे 2015 पर्यंत सोडवण्यात आल्या.



## प्रकल्पाचे लाभ

- पाटणा-गंगा रेल्वे-सह-रस्ता सेतूला (नवी लाईन) जेपी सेतू असेही म्हणतात. या प्रकल्पामुळे दक्षिण बिहार आणि उत्तर बिहार दरम्यान रेल्वे आणि रस्ते यांचा अखंड आणि उच्च-क्षमतेचा संचार मार्ग उपलब्ध झाला.
- या अंदाजे 4.55 किलोमीटर लांबीच्या एकत्रित रेल्वे-रस्ता सेतूच्या बांधकामामुळे जुन्या पुलांवरील वर्षानुवर्षे असलेला ताण कमी झाला आहे. रस्त्याने प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे प्रवासाचे अंतर अंदाजे 20-25 किलोमीटरने कमी झाले आहे.
- पाटणा शहरातील वाहतूक कोंडी देखील कमी झाली आहे. रेल्वे क्षेत्रातही नवीन पुलामुळे जुन्या पुलांवरील भार कमी झाला असून अधिक प्रवासी आणि मालवाहतूक गाड्या चालविण्यास मदत झाली. यामुळे दरवर्षी अंदाजे 2.78 कोटी टन मालवाहतूक होण्यास मदत झाली.
- पूर्व, उत्तर आणि ईशान्य भारताला जोडणाऱ्या प्रमुख रेल्वे मार्गांवर गाड्यांची वेळेवर धावण्याची पद्धत सुधारली आहे. शिवाय, गंगेच्या दोन्ही किनाऱ्यांच्या थेट संपर्कामुळे रोजगार केंद्रे, शैक्षणिक संस्था, रुग्णालये आणि बाजारपेठांपर्यंत पोहोचण्याची सुविधा सुधारली आहे.
- नव्या पुलामुळे कार्बन उत्सर्जन अंदाजे 149 कोटी किलोने कमी झाले आहे, जे अंदाजे 6 कोटी झाडे लावण्याच्या पर्यावरणीय फायद्याएवढे आहे.

> *विकसित भारत... म्हणजेच जिथे वेगही असेल, प्रगती असेल, जिथे जनहित सर्वोपरि आहे... जिथे सरकारी योजना देशवासीयांचे जीवन सोपे करतात.*
>
> **- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



प्रकल्प

# कोसी महासेतू

| | |
|---|---|
| प्रकल्प मंजुरी<br>वर्ष 2003-04 | प्रकल्पाची लांबी<br>1.9 किलोमीटर |
| खर्च<br>516 कोटी रुपये | शुभारंभ<br>18 सप्टेंबर 2020 |

लाभ

- या प्रदेशातील लोकांचे 86 वर्षांचे स्वप्न पूर्ण झाले आहे. 1887 मध्ये निर्गली आणि भापतियाही (सरायगढ) दरम्यान मीटर-गेज लाईन टाकण्यात आल्यामुळे दीर्घकाळाची प्रतीक्षा संपली. तथापि, 1934 च्या विनाशकारी पुरामुळे तसेच भारत-नेपाळमधील भूकंपामुळे ही लाईन नष्ट झाली.
- 2003 मध्ये नितीश कुमार केंद्रीय रेल्वेमंत्री आणि अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना या प्रकल्पाची कल्पना करण्यात आली होती. त्यानंतर व्यवस्था बदलली आणि प्रगती मंदावली.
- बांधकाम पूर्ण झाल्यानंतर हे अंतर फक्त 22 किमीवर आले आहे. हा प्रवास आता आठ तासांऐवजी अर्ध्या तासात पूर्ण होतो.
- हा मार्ग उत्तर बिहारमधील अनेक जिल्ह्यांतील लोकांसाठी अत्यंत फायदेशीर ठरला आहे. यामुळे या भागातील लोकांना कोलकाता, दिल्ली आणि मुंबईसारख्या लांब पल्ल्याच्या ठिकाणी येणे - जाणे सोपे झाले आहे.





प्रकल्प

# ईस्टर्न-वेस्टर्न पेरिफेरल एक्सप्रेसवे प्रकल्प

*ईस्टर्न-वेस्टर्न पेरिफेरल प्रकल्पाला 2006 मध्ये मंजुरी देण्यात आली. दशकभराच्या विलंबानंतर हा प्रकल्प 2016 आणि 2018 मध्ये पूर्ण झाला.*

ईस्टर्न पेरिफेरल एक्सप्रेसवे

| | |
|---|---|
| भूमिपूजन<br>5 नोव्हेंबर 2015 | उद्घाटन<br>27 मे 2018 |

**खर्च : 11,000 कोटी रुपये**

## प्रगती प्लॅटफॉर्म

प्रकल्पाच्या पुनरावलोकनात अनेक समस्या आढळून आल्या. सतत पाठपुरावा केल्याने काम वेगाने पुढे गेले आणि वर्षानुवर्षांची प्रतीक्षा संपली.

**प्रकल्पाची एकूण लांबी: 270 किलोमीटर**

- कुंडली-मानेसर-पलवल (केएमपी) वेस्टर्न पेरिफेरल एक्सप्रेसवेच्या कुंडली-मानेसर विभागाचे उद्घाटन 19 नोव्हेंबर 2018 रोजी करण्यात आले.
- पायाभरणीनंतर या प्रकल्पाचे काम 910 दिवसांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट होते, जे केवळ 500 दिवसांत पूर्ण करण्यात आले.
- ईस्टर्न पेरिफेरल एक्सप्रेसवेसाठी सुमारे 5,900 कोटी रुपये खर्चाने एकूण 1,700 हेक्टर जमिनीचे अधिग्रहण
- ईस्टर्न पेरिफेरल एक्सप्रेसवे भारताचा पहिला एक्सप्रेसवे आहे ज्याच्या संपूर्ण 135 किमी कॉरिडोरवर सौर ऊर्जेचा उपयोग केला आहे.
- दिल्लीभोवतीचा पेरिफेरल एक्सप्रेसवे प्रकल्पाचे उद्दिष्ट दिल्लीला बायपास करून गर्दी कमी करणे आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील प्रदूषणाची पातळी कमी करणे हे आहे.

प्रकल्प

# अटल टनेल-सामरिक आर्थिक मजबुतीचे प्रतीक

*मनाली-लेह महामार्गावर रोहतांग इथला एक दशकाहून अधिक काळ प्रलंबित असलेला बोगदा, सध्याच्या केंद्र सरकारच्या उच्च प्राधान्यामुळे अवघ्या सहा वर्षांत पूर्ण झाला. हा बोगदा भारताच्या आत्मनिर्भर होण्याच्या संकल्पाचे एक ज्वलंत उदाहरण बनला आहे...*

**या प्रकल्पाची पायाभरणी**

**26 मे 2002**

रोजी माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी एका अप्रोच रोडच्या स्वरूपात केली होती.

**2002 मधील पायाभरणी समारंभापासून 2013-14 पर्यंत फक्त 1,300 मीटर बोगद्याचे काम पूर्ण झाले होते. जर काम याच गतीने सुरू राहिले असते तर ते 2040 मध्ये पूर्ण झाले असते.**

**याचा खर्च ₹ 950 कोटी होता, परंतु विलंबामुळे तो 3,200 कोटींपर्यंत वाढला.**

उद्घाटन

**पंतप्रधान नरेंद्र मोदी**

**3 ऑक्टोबर 2020**

अडथळा

**अटल बोगद्याचे बांधकाम सोपे नव्हते. 587 मीटर लांबीच्या नाल्याने एक मोठे आव्हान उभे केले होते. प्रति मिनिट 8,000 लिटर या वेगाने वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहामुळे बांधकामात अडथळा निर्माण झाला. हे स्वतःच एक आव्हान होते. प्रकल्प वेळेवर पूर्ण करण्यासाठी 3 हजार कामगार आणि 650 बीआरओ कर्मचाऱ्यांनी तीन पाळ्यांमध्ये एकत्र काम केले.**

## का खास आहे अटल बोगदा

- अटल बोगद्याच्या बांधकामामुळे लडाखमध्ये तैनात असलेल्या भारतीय सैन्याला मोठी मदत झाली आहे. आता हिवाळ्यातही शस्त्रे आणि रसद सहजपणे पुरवली जाते.
- अटल बोगदा 10,171 फूट उंचीवर बांधलेला असून तो रोहतांग खिंडीला जोडतो. हा जगातील सर्वात उंच आणि सर्वात लांब महामार्ग बोगदा रस्ता आहे.
- घोड्याच्या नालाच्या आकाराच्या सिंगल ट्यूब आणि डबल लेन बोगद्याची डोक्यावरची सुरक्षित उंची 5.525 मीटर आहे.
- हा बोगदा सेमी ट्रान्सव्हर्स सिस्टम, स्काडा नियंत्रित अग्निशमन, प्रकाशयोजना आणि देखरेख प्रणालींसह अत्याधुनिक इलेक्ट्रो-मेकॅनिकल प्रणालींनी सुसज्ज आहे.



प्रकल्प

# मुंबई ट्रान्स हार्बर लिंक अटल सेतू

| | |
|---|---|
| पायाभरणी | 24 डिसेंबर 2016 |
| प्रकल्प पूर्ण होण्याची तारीख | 31 डिसेंबर 2023 |
| खर्च ₹ 20,550 कोटी | उद्घाटन 12 जानेवारी 2024 |

- हा भारतातील सर्वात लांब सागरी पूल प्रकल्प 'प्रगती' प्रणालीतील देखरेखीमुळे शिस्तबद्ध आणि समयबद्ध रीतीने पूर्ण झाला.
- हा पूल 21.8 किमी लांब आणि 6-मार्गिकायुक्त असून त्यापैकी 16.5 किमी लांब समुद्रावर आणि सुमारे 5.5 किमी जमिनीवर आहे.
- याने मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला जलद जोडणी उपलब्ध करून दिली आहे. शिवाय मुंबई ते पुणे, गोवा आणि दक्षिण भारताच्या प्रवासाला लागणारा वेळ देखील कमी केला आहे.
- यामुळे मुंबई बंदर आणि जवाहरलाल नेहरू बंदर यांच्यातील संचारसंपर्कदेखील सुधारला आहे.
- अटल सेतूच्या बांधकामादरम्यान सुमारे 17 हजार कामगार बंधू-भगिनींना आणि 1500 अभियंत्यांना थेट रोजगार मिळाला.
- अटल सेतूमध्ये जितक्या तारा वापरल्या आहेत त्या संपूर्ण पृथ्वीला दोनदा लपेटू शकतात. या प्रकल्पात जितके लोखंड आणि पोलाद वापरले गेले आहे, त्याने 4 हावडा ब्रिज आणि 6 स्टॅच्यू ऑफ लिबर्टी बांधता येतील.





*2014 नंतर आणखी एक महत्त्वाचा बदल झाला आहे, तो म्हणजे वर्षानुवर्षे अडकलेले-रखडलेले-लटकलेले प्रकल्प शोधून काढून मिशन मोडवर पूर्ण केले जात आहेत. अर्धवट पूर्ण झालेले प्रकल्प केवळ आपल्या देशातील प्रामाणिक करदात्यांच्या पैशांचा अपव्ययच करत नाहीत तर खर्च वाढवतात आणि त्यांना मिळायला हवे असलेले फायदे नाकारतात. हा आपल्या करदात्यांवर होणारा मोठा अन्याय आहे.*

**- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

प्रकल्प

# कोल्लम बायपास

मंजुरी
1972

केंद्र सरकारची अंतिम मंजुरी
जानेवारी, 2015

प्रकल्पाची लांबी
एनएच-66 वर 13 किमी



उद्घाटन
15 जानेवारी 2019

खर्च
352 कोटी रुपये

**प्रगती प्लॅटफॉर्म**

जवळजवळ चार दशकांपासून प्रलंबित असलेल्या या प्रकल्पातील परवानग्या आणि आर्थिक समस्यांसह सर्व अडथळे प्रगती प्लॅटफॉर्मने योग्य वेळी दूर केले.

लाभ

दुहेरी मार्गिकेच्या या बायपास प्रकल्पामुळे अलप्पुझा आणि तिरुवनंतपुरम दरम्यानचा प्रवास वेळ कमी झाला आहे. कोल्लम शहरातील वाहतूक कोंडी देखील कमी झाली आहे.

प्रकल्प

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ

प्रकल्पाला मंजुरी
6 जुलै 2007

खर्च
₹ 19,646 कोटी

प्रगतीवर आढावा
25 मार्च 2015,
29 सप्टेंबर 2021

काम पूर्ण
25 डिसेंबर 2025

लाभ

महाराष्ट्रातील शेतकरी मध्य पूर्वेच्या सुपर मार्केटशी जोडले गेले





प्रकल्प

# जम्मू-उधमपूर-श्रीनगर बारामुल्ला रेल लिंक

उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल लिंक (यूएसबी आरएल) हा प्रकल्प स्वतंत्र भारतातील सर्वात महत्त्वाकांक्षी रेल्वे प्रकल्पांपैकी एक आहे. हिमालयीन पर्वतरांगांमध्ये 272 किलोमीटर लांब पसरलेल्या या प्रकल्पात 119 किलोमीटर लांबीचे 38 बोगदे आहेत. याशिवाय दऱ्या आणि पर्वतीय खिंडींना जोडणाऱ्या 943 पुलांचा समावेश आहे. या रेल्वेजाळ्याने जम्मू आणि काश्मीरसाठी गतिशीलता, व्यापार आणि पर्यटनातील नवीन अध्याय उघडला आहे.

प्रकल्पाला मंजुरी
31 मार्च 1994

खर्च
₹ 43,780 कोटी

रेल्वेमार्गाची लांबी
272 कि.मी.

शुभारंभ
6 जून 2025

वैशिष्ट्य

38 बोगदे (लांबी 119 किमी), 943 पूल

प्रगतीवर आढावा
24 जून 2015, 6 नोव्हेंबर 2019 आणि 30 डिसेंबर 2020

- जगातील सर्वात उंच रेल्वे आर्च ब्रिज, 359 मीटर उंचीचा, चिनाब पुलावर बांधण्यात आला.
- काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत रेल्वे जोडणी



प्रकल्प

## खुर्दा-बलांगीर नवीन ब्रॉड गेज रेल्वे लिंक

**मंजुरी**
31 मार्च 1994

**कामाची सुरुवात**
8 मार्च 2001

**लांबी**
301 कि.मी.

**प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा**
30 सप्टेंबर 2015, 22 जानेवारी 2020

**पूर्णत्वाला नेण्याचे उद्दिष्ट**
31 डिसेंबर 2026

**खर्च**
₹ 5,089 कोटी

**लाभ** स्थानिक व्यापार, तसेच भुवनेश्वर ते बलांगीर दरम्यानचे अंतर कमी होणार

**अडथळे:** वन विभागाची मंजुरी / भूसंपादन

या रेल्वे मार्गावरील सर्व 7 बोगद्यांचे बांधकाम पूर्ण

प्रकल्प

## आगरतळा - सब्रूम नवीन रेल्वे मार्ग

**पायाभरणी**
ऑक्टोबर 2008

**प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा**
24 जून 2015

**खर्च :** ₹ 5,138.51 कोटी

**अडथळे:** वने, वन्यजीव, पर्यावरण

**काम सुरू झाल्याची तारीख**
29 जुलै 2009

**उद्घाटन**
ऑक्टोबर 2019

**लाभ** अन्नधान्य आणि इंधनासारख्या जीवनावश्यक वस्तूंच्या वाहतूकीचा खर्च कमी झाला. यामुळे त्रिपुराच्या बाजारपेठांमध्ये होणारा पुरवठा विना अडथळे सुरू राहिला, तसेच वस्तूमलाच्या किमतींमध्ये स्थैर्य आहे.

प्रकल्प

## सीवूड - बेलापूर-उरण मार्ग

**मंजुरी**
11 जुलै 1997

**प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा**
22 फेब्रुवारी 2017

**खर्च**
₹ 2,980.41 कोटी

**काम पूर्ण झाल्याची तारीख**
11 मार्च 2023

**लाभ** बेलापूर-उरण रेल्वे मार्ग हा धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचा उपनगरीय रेल्वे पायाभूत सुविधा प्रकल्प आहे, जो नवी मुंबईच्या सुनियोजित विकासाला प्रोत्साहन देण्याकरिता तयार करण्यात आला.

**अडथळे:** वन, वन्य जीव, पर्यावरण

प्रकल्प

## हरिदासपूर - पारादीप नवीन रेल्वे मार्ग

**मंजुरी**
1 जानेवारी 1997

**प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा**
29 ऑगस्ट 2018

**अडथळे:** भूसंपादन आणि इतर काही अन्य बाबी

**खर्च**
₹ 11,186 कोटी

**काम पूर्ण झाल्याची तारीख**
31 जुलै 2020

**लाभ** पारादीप बंदरापासून रेल्वे चे अंतर 40 कि.मी.ने कमी झाले. मालवाहतुक हाताळणीची क्षमता 25 ते 30% ने वाढली. दररोज 20 ते 25 अतिरिक्त मालवाहतूक गाड्यांची सुविधा उपलब्ध झाली.



प्रकल्प

## हैद्राबाद मेट्रो रेल्वे (72 किमी)



**मंजुरी**
2012

**प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा**
31 डिसेंबर 2015

**खर्च**
₹ 18,975 कोटी

**काम पूर्ण झाल्याची तारीख**
07 फेब्रुवारी 2020

**अडथळे**
वीज दरासह इतर आर्थिक अडचणी.

**लाभ**
पीपीपी तत्वाअंतर्गत राबवला गेलेला हा जगातील सर्वात मोठा मेट्रो रेल्वे प्रकल्प आहे. या प्रकल्पाअंतर्गत मल्टीमॉडेल ट्रान्सपोर्ट चे एकात्मिकीकरण तसेच मोठ्या प्रमाणावर ट्रांजिट-ओरिएंटेड विकासकामांचा समावेश आहे. यामुळे शहरी वाहतूक तसेच आर्थिक विकासावर सकारात्मक परिणाम घडून आला आहे.

प्रकल्प

## अहमदाबाद मेट्रो रेल्वे (टप्पा-1)

**मंजुरी**
17 नोव्हेंबर 2014

**खर्च**
₹ 12,924.5 कोटी

**प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा**
25 एप्रिल 2018, 30 डिसेंबर 2020

**काम पूर्ण झाल्याची तारीख**
जानेवारी 2026

**अडथळे:** आर्थिक समस्या, भूसंपादन

**लाभ**
प्रवासाच्या वेळेत बचत झाली, त्यासोबतच इंधनाच्या वापरातही घट झाली. हवेच्या गुणवत्तेत सुधारणा झाली, तसेच वाहतूकीच्या सुरक्षेसोबतच रस्त्यांवरील गर्दीचे प्रमाण कमी झाले.

प्रकल्प

## दिल्ली एमआरटीएस टप्पा-3

**मंजुरी**
26 डिसेंबर 2011

**प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा**
27 मे 2015

**खर्च**
₹ 38,585 कोटी

**काम पूर्ण झाल्याची तारीख**
6 ऑगस्ट 2022

**लाभ**
मेट्रोचे दळणवळीय जाळे अधिक बळकट झाले, दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातल्या नागरिकांचा प्रवासात सुलभता आली.

**अडथळे:** भूसंपादन, खर्चातील हिस्सा आणि बांधकामाशी संबंधित बाबी



प्रकल्प

## गाडरवारा सुपर थर्मल पॉवर

मंजुरी
2008

पायाभरणी
2014

प्रकल्पामध्ये 800 मेगावॅट क्षमतेचे दोन केंद्र

राष्ट्राला समर्पित
ऑक्टोबर 2025

**विलंबाचे कारण**
जमीन, इंधन पुरवठा जोडणीशी संबंधित बाबी आणि कार्यान्वयाशी संबंधित अडचणी

लाभ: मध्य प्रदेशसह इतर पाश्चिमेकडील राज्यांना विना अडथळा वीजपुरवठ्याची सुनिश्चिती झाली.

- प्रगती या व्यासपीठाअंतर्गतच्या आढाव्यानंतर प्रकल्पाच्या कामाला गती मिळाली.
- एनपीसीच्या अखत्यारितील हा प्रकल्प मध्य प्रदेशातील नरसिंगपूर जिल्ह्यात आहे.



प्रकल्प

## कुडगी -1 सुपर थर्मल पॉवर प्रकल्प, 3X800 मेगावॅट, एनटीपीसी

मंजुरी
1 मार्च 2012

प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा
24 जून 2015

खर्च
₹ 18,382 कोटी

काम पूर्ण झाल्याची तारीख
3 डिसेंबर 2018

लाभ: दक्षिण भारतातील औद्योगिक क्षेत्रांना वीजपुरवठा, तसेच दक्षिणेकडील वीज पुरवठा व्यवस्थेत स्थैर्य.

अडथळेः भूसंपादन, वापराचे हक्क.

प्रकल्प

## सोलापूर सुपर थर्मल पॉवर स्टेशन

मंजुरी
1 मार्च 2012

प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा
30 डिसेंबर 2015

खर्च
₹ 11,406 कोटी

काम पूर्ण झाल्याची तारीख
29 मार्च 2019

लाभ: सोलापूर सुपर औष्णिक विद्युत स्टेशनमुळे विश्वासार्ह वीजपुरवठ्याची सुनिश्चिती झाली, यामुळे ऊर्जा सुरक्षेलाही बळकट मिळाली, तसेच स्थानिक पातळीवर आर्थिक विकासाला पाठबळ मिळाले. यातून या क्षेत्रात सामाजिक-आर्थिक मूल्यात वृद्धी घडून आली.

अडथळेः वापराचे हक्क / रस्त्याचे हक्क, वीज, इंधन आणि भूसंपादन.



प्रकल्प

## कामेंग जलविद्युत प्रकल्प

मंजुरी
नोव्हेंबर 2004

प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा
24 जून 2015

**अडथळे:** भूसंपादन, वने, वन्यजीव आणि पर्यावरण.

खर्च
₹ 8,458.95 कोटी

काम पूर्ण झाल्याची तारीख
10 फेब्रुवारी 2021

लाभ

कामेंग जलविद्युत प्रकल्पामुळे अरुणाचल प्रदेश हे देशातले अतिरिक्त विद्युत निर्मिती करणारे राज्य बनले आहे. इतकेच नाही तर अरुणाचल प्रदेश हे प्रादेशिक तसेच राष्ट्रीय वीजपुरवठा व्यवस्थेला देखील अतिरिक्त वीज पुरवठा करू लागले.



प्रकल्प

## पारे जल विद्युत प्रकल्प (110 मेगावॅट), नीपको लिमिटेड

मंजुरी
26 नोव्हेंबर 2008

प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा
27 डिसेंबर 2015

**बाधा:** वने, वन्यजीव, पर्यावरण आणि राईट ऑफ वे शी संबंधित अडचणी

खर्च
₹ 1656.74 कोटी

काम पूर्ण झाल्याची तारीख
24 मे 2018

लाभ

ईशान्य भारतातील सेव्हन सिस्टर्स राज्यांच्या जलविद्युत क्षमतेत मोठे परिवर्तन घडून आले. स्वच्छ ऊर्जेच्या माध्यमातून भारताचे मोठे उद्दिष्ट पूर्ण करण्यात मदत होऊ लागली आहे.

प्रकल्प

## जयपूर - सीकर - चुरू गेज कनव्हर्जन

मंजुरी
2008-09

प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा
28 सप्टेंबर 2016

**अडथळे:** वन, वन्य जीव, पर्यावरण

खर्च
₹ 1,222 कोटी

वने, वन्यजीव, पर्यावरण
25 एप्रिल 2019

लाभ

या प्रकल्पामुळे 1,500 मीटर लांबीच्या गाड्या चालवणे शक्य झाले आहे. मालवाहतूक क्षमतेमध्ये 5,000 मेट्रिक टन प्रति गाडीवरून सुमारे 13,000 मेट्रिक टन वाढ झाली.

## जबलपूर - गोंदिया 285 कि.मी. गेज परिवर्तन

मंजुरी
17 जानेवारी 2003

प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा
23 मार्च 2016

**अडथळे:** भूसंपादन, वने, वन्यजीव आणि पर्यावरणीय मंजुरीशी संबंधित अडचणी.

खर्च
₹ 1,990.98 कोटी

काम पूर्ण झाल्याची तारीख
21 मार्च 2021

लाभ

या प्रकल्पामुळे जबलपूरहून मोठ्या मेट्रो शहरांमध्ये होणारी मालवाहतूक तसेच प्रवासी वाहतूक आता वाहतूकीचे साधन न बदलता करता येऊ लागली आहे. यामुळे प्रवाशाच्या वेळेत तसेच व्यावसायिक वाहतूकीच्या खर्चातही घट साध्य झाली आहे. या प्रकल्पामुळे मध्य प्रदेशाच्या पूर्वेकडील भागांमधील आदिवासी आणि वन क्षेत्रांमधील लोकांना बाजारपेठा, आरोग्य, शिक्षण आणि जिल्हा केंद्रांपर्यंत पोहोचण्यासाठीची सुलभ व्यवस्था उपलब्ध झाली आहे.





प्रकल्प

## 2.5 एमएमटी पादुर धोरणात्मक कच्चे तेल साठवणूक

**मंजुरी**
7 जानेवारी 2004

**प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा**
22 एप्रिल 2015 आणि 23 मार्च, 2016

**अडथळे:** राईट टू यूज आणि राईट ऑफ वे शी संबंधित अडचणी

**खर्च**
₹ 7,581 कोटी

**काम पूर्ण झाल्याची तारीख**
31 डिसेंबर 2018

**लाभ**
पादुर एसपीआर प्रकल्प कार्यान्वित झाल्यामुळे सामाजिक - आर्थिक लाभ मिळू लागले. यासोबतच हा प्रकल्प धोरणात्मकदृष्ट्याही तितकाच महत्त्वाचा ठरला आहे. या प्रकल्पामुळे कच्च्या तेलाच्या पुरवठ्यात व्यत्यय आला तर त्यातून, तसेच आप्तकालीन परिस्थितीतून मार्ग काढण्याची भारताची क्षमता वाढली आहे.

प्रकल्प

## कुडनकुलम - एपीपी पारेषण प्रणाली

**मंजुरी**
12 मे 2005

**प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा**
04 नोव्हेंबर 2015

**अडथळे:** राइट ऑफ वे तसेच राईट ऑफ यूज शी संबंधित इतर अडचणी

**खर्च**
₹ 2,577.23 कोटी

**काम पूर्ण झाल्याची तारीख**
31 डिसेंबर 2019

**लाभ**
या प्रकल्पामुळे स्वच्छ अणुऊर्जेला चालना मिळाली, या माध्यमातून वीज पुरवठा व्यवस्थेची विश्वासार्हता तसेच ऊर्जा सुरक्षेत सुधारणा घडून आली. महागडी वीज खरेदी करावी लागण्याचे प्रमाण कमी झाले. कार्बन उत्सर्जनात घट साध्य करण्याच्या भारताच्या ध्येय-उद्दिष्टांनाही पाठबळ मिळाले. यासोबतच स्थानिक पातळीवर आर्थिक विकासाला चालना मिळाली आणि त्यामुळे समुदायांमधील विश्वासार्हताही वाढली.

प्रकल्प

## बेंबळा सिंचन

**मंजुरी**
2 एप्रिल 2007

**प्रगती या व्यासपीठाअंतर्गतचा आढावा**
25 ऑक्टोबर 2023

**अडथळे:** भूसंपादन आणि आर्थिक अडचणी

**खर्च**
₹ 2,685.41 कोटी

**काम पूर्ण झाल्याची तारीख**
30 जून 2025

**लाभ**
या प्रकल्पामुळे दुष्काळग्रस्त भागांमधील शेती संबंधिची अनिश्चितता संपुष्टात आली. पिक क्षेत्राचे प्रमाण विस्तारले आणि पावसावरील अवलंबित्वही कमी झाले.






# शहरी संपर्क जोडणीला नवी गती आणि शहरी आव्हान निधी स्थापन करण्याला मंजुरी

*केंद्र सरकार रेल्वे, रस्ते आणि मेट्रो रेल्वे अशा प्रत्येक क्षेत्रातील दळणवळणीय जोडणीला गती देत, विकसित भारतचा भक्कम पाया रचत आहे. याच मालिकेअंतर्गत दिल्ली, हरियाणा, महाराष्ट्र आणि कर्नाटक मधील रेल्वे मार्गांचा विस्तार, गुजरातमधील एनएच-56, महाराष्ट्रातील एनएच-160ए आणि तेलंगणातील एनएच-167 या मार्गांच्या रुंदीकरणासोबतच, नोएडातील सेक्टर-142 ते बॉटनिकल गार्डनपर्यंतच्या मेट्रो रेल्वे विस्ताराच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. यासोबतच स्टार्टअप निधी, 1 लाख कोटी रुपयांचा शहरी आव्हान निधी आणि ब्रम्हपुत्रा नदीखालून जाणारा बोगदा यांसह अनेक महत्वाच्या प्रस्तावांनाही मंजुरी प्रदान...*

**निर्णय :** आसाममध्ये ब्रम्हपुत्रा नदीखालून दोन पदरी ट्विन ट्यूब टीबीएम रस्ता आणि एका ट्यूबमधून रेल्वेसंबंधी पायाभूत सुविधांविषयक तरतुदीसह, नदीखालून जाणाऱ्या एका बोगद्याच्या बांधकामाला मंजुरी दिली. या मार्गाची एकूण लांबी 33.7 किलोमीटर असणार आहे.

**परिणाम :** हा भारतातील पहिला आणि जगातील दुसरा पाण्याखालून जाणारा रस्ते-रेल्वे बोगदा असणार आहे. या प्रकल्पामुळे आसाम, अरुणाचल प्रदेश, नागालँड आणि इतर ईशान्य भारतातील राज्यांना महत्त्वाचे लाभ होतील. यामुळे मालवाहतूकीची कार्यक्षमता वाढेल आणि मालवाहतूकीवर होणाऱ्या खर्चाची बचत होईल. या प्रदेशातील सामाजिक आर्थिक विकासाला गती मिळेल. प्रकल्प पूर्ण झाल्यावर तो धोरणात्मक दृष्टिकोनातूनही महत्त्वाचा ठरणार आहे. यासोबतच या प्रकल्पामुळे प्रादेशिक स्तरावरील आर्थिक विकास, प्रमुख आर्थिक केंद्रांमधील परस्पर संपर्क तसेच व्यापार आणि औद्योगिक विकासाच्यादृष्टीने नवी दारे खुली होतील. या प्रकल्पामार्फत थेट आणि अप्रत्यक्ष स्वरूपात सुमारे 80 लाख मनुष्य-दिवसांच्या रोजगारनिर्मितीची संधी उपलब्ध होणार आहे.

**निर्णय :** दिल्ली, हरियाणा, महाराष्ट्र आणि कर्नाटक या चार राज्यांमधील 12 जिल्ह्यांमध्ये अतिरिक्त रेल्वे मार्गिका टाकण्यासंबंधिच्या तीन प्रकल्पांना मंजुरी.

**परिणाम :** भारतीय रेल्वेचे विद्यमान जाळे सुमारे 389 किलोमीटरने विस्तारणार आहे. या प्रकल्पाचा अंदाजित खर्च सुमारे 18,509 कोटी रुपये इतका असून, या प्रकल्पाचे काम 2030-31 पर्यंत पूर्ण होणार आहे. प्रकल्पाचे काम सुरु असतानाच्या कालावधी दरम्यान सुमारे 2.65 कोटी मानवी दिवसांचा रोजगारही निर्माण होईल. या प्रकल्पामुळे सुलभ प्रवासाची सोय उपलब्ध होईल, तसेच व्यावसायिक वाहतुकीच्या खर्चातही बचत होईल. तेलाची आयात आणि कार्बन उत्सर्जनतही यामुळे घट साध्य करता येईल, याचबरोबरीने रेल्वेच्या सक्षम कार्यान्वयनालाही मदत मिळू शकणार आहे.

**निर्णय :** बाजारावर आधारित शहरी परिवर्तनाला गती देण्यासाठी एक



**निर्णय :** भारताच्या वाढत्या स्टार्टअप परिसंस्थेला मोठी चालना देण्याच्या उद्देशाने स्टार्टअप इंडिया फंड ऑफ फंड्स 2.0 (स्टार्टअप इंडिया एफओएफ 2.0) च्या स्थापनेला मंजुरी.

**परिणाम :** यासाठी एकूण 10,000 कोटी रुपये इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. देशातील स्टार्टअप परिसंस्थेसाठी जोखीम भांडवल (व्हेंचर कॅपिटल) उभारणे हा या निधीचा उद्देश आहे. तर दीर्घकालीन देशांतर्गत भांडवल उभारून, जोखीम भांडवल विषयक परिसंस्थेला बळकटी देणे हा ही योजना आखण्यामागचा उद्देश आहे. याचबरोबरीने देशभरात नवोन्मेषाधारीत उद्योजकतेला पाठबळ देऊन, स्टार्टअप क्षेत्रातल्या भारताच्या वाटचालीच्या पुढच्या टप्प्याला गती देणे हे यामागचे उद्दिष्ट आहे. स्टार्टअप इंडिया एफओएफ 2.0 या निधीचा प्रारंभ स्टार्टअप इंडिया उपक्रमांतर्गत सुरू केला गेला होता. ही योजना म्हणजे भारताला जागतिक पातळीवर स्टार्टअप क्षेत्रात आघाडीवर असलेल्या देशांमध्ये भारताला स्थान मिळवून देण्यासाठी सुमारे दशकभरापासून सुरू असलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित आहे.

लाख कोटी रुपयांच्या शहरी आव्हान निधीला मंजुरी.

**परिणाम :** हा शहरी आव्हान निधीच्या माध्यमातून उच्च दर्जाच्या शहरी पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी बाजारांमधून होणारा वित्त पुरठा, खाजगी क्षेत्रासोबतची भागीदारी तसेच नागरिक केंद्रीत सुधारणांच्या पर्यायांचा उपयोग करून घेतला जाईल. लवचिक, उत्पादक, सर्वसमावेशक आणि हवामान बदलाला अनुकूल शहरांची उभारणी करणे हा या निधीचा उद्देश आहे. यामुळे ही शहरे देशाच्या आर्थिक विकासाच्या पुढील टप्प्याचे प्रमुख कारक घटक बनू शकणार आहेत. हा निधी आर्थिक वर्ष 2025-26 ते 2030-31 पर्यंत कार्यान्वित राहणार असून, या निधीच्या कार्यान्वयनाला आर्थिक वर्ष 2033-34 पर्यंत मूदतवाढ दिली जाण्याची शक्यता आहे.

> *मंत्रिमंडळाने गोहपूर आणि नुमालीगढ दरम्यान एका 4 पदरी एक्सेस-कंट्रोल्ड ग्रीनफील्ड कॉरिडॉरला देखील मंजुरी दिली आहे. याअंतर्गत ब्रम्हपुत्रा नदीखालून भारतातील पहिल्या अंडरवाटर रोड-रेल्वे बोगद्याचा समावेश आहे. या परिवर्तनकारी प्रकल्पामुळे आसाम आणि संपूर्ण ईशान्य भागातील संपर्क जोडणीचा विस्तार होईल, व्यावसायिक वाहतूकीवरचा खर्च कमी होईल आणि विकासाला गती मिळेल.*
>
> **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

**निर्णय :** नॉर्थ ब्लॉक आणि साऊथ ब्लॉक मधून 'सेवा तीर्थ' आणि 'कर्तव्य भवन' येथे स्थलांतर करण्याच्या प्रस्तावाला मान्यता. 'युगे युगीन भारत' या राष्ट्रीय संग्रहालयासाठीचा मार्गही झाला प्रशस्त.

**परिणाम :** 13 फेब्रुवारी 2026 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवीन पंतप्रधान कार्यालय राष्ट्राला समर्पित केले. हे नवे कार्यालय आता 'सेवा तीर्थ' या नावाने ओळखले जाईल. साऊथ ब्लॉकमधील त्या दालनात 13 फेब्रुवारी रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाची अखेरची बैठक झाली. तो क्षण केवळ ठिकाण बदलण्याचा क्षण नव्हता तर तो, इतिहास आणि भविष्याचा संगम घडवून आणणारा क्षणही ठरला. यासोबतच नॉर्थ आणि साऊथ ब्लॉकला आपल्या हजारो वर्षे जुन्या नागरी संस्कृतीच्या भावी पिढ्यांना प्रेरणा देत राहिल अशा 'युगे युगीन भारत राष्ट्रीय संग्रहालय'चा भाग बनवण्याचा संकल्पही केंद्रीय मंत्रिमंडळाने

**निर्णय : महाराष्ट्रातील राष्ट्रीय महामार्ग 160 अ वर घोटी-त्र्यंबक (मोखाडा) -जव्हार -मनोर -पालघर भागाचा पुनर्विकास आणि सुधारणांना मंजुरी. पक्क्या उप-रस्त्यासह हा दुपदरी/चारपदरी मार्ग बांधला जाईल.**

**परिणाम: याची एकूण लांबी 154.635 किमी आहे आणि एकूण भांडवली खर्च 3,320.38 कोटी रूपये इतका असेल. हा प्रकल्प अभियांत्रिकी, खरेदी आणि बांधकाम पद्धतीने पूर्ण केला जाईल. पूर्ण झाल्यावर, या रस्त्यामुळे सुरळीत आणि सुरक्षित वाहतुकीची हमी मिळेल आणि प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल. तसेच या प्रकल्पाच्या अंमलबजावणीमुळे आदिवासी भागातील पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होईल. या प्रकल्पामुळे सुमारे 19.98 लाख मनुष्यदिवस प्रत्यक्ष रोजगार आणि 24.86 लाख मनुष्यदिवस अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील, असा अंदाज आहे.**

मंत्रिमंडळ निर्णयांवरील पत्रकार परिषद पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

केला. हे संग्रहालय, आपल्या कालातीत आणि शाश्वत सांस्कृतिक वारशाच्या उत्सवाचे प्रतीक असेल आणि आपल्या गौरवशाली भूतकाळाला समृद्ध भविष्यासोबत जोडेल.

**निर्णय :** नोएडा सेक्टर 142 पासून बोटॅनिकल गार्डन (नोएडा) पर्यंत 11.56 किमी लांबीच्या तसेच 8 स्थानकांच्या विस्तारित कॉरिडॉरला मान्यता.

**परिणाम:** यात 8 उन्नत स्थानके असतील. एकदा कार्यान्वित झाल्यानंतर, या कॉरिडॉरमुळे नोएडा आणि ग्रेटर नोएडा दरम्यान 61.62 किलोमीटरचे सक्रिय मेट्रो रेल्वे जाळे प्रस्थापित होईल. त्याचबरोबर हा कॉरिडॉर बोटॅनिकल गार्डन (ब्लू लाइन) आणि मॅजेन्टा मार्गावर इंटरचेंजसह उच्च-मागणी असलेल्या कॉरिडॉर दरम्यान थेट जोडणी करेल.

**निर्णय :** गुजरातमधील राष्ट्रीय महामार्ग-56 च्या धमासिया-बिटाडा/मोवी आणि नासरपूर-मालोथा भागाच्या चौपदरीकरणाला मान्यता.

**परिणाम :** या प्रकल्पाची एकूण लांबी 107.67 किमी आहे आणि एकूण भांडवली खर्च 4583.64 कोटी रूपये इतका असेल. हा प्रकल्प राष्ट्रीय महामार्ग (NH)-56 चा एक भाग आहे. ताशी 100 किमी वेगासाठी याची रचना अनुकुल असून सरासरी वेग ताशी 70 किमी असेल. यामुळे प्रवासाचा वेळ 40 टक्के कमी होऊन 2.5 तासांवरून 1.5 तासावर येईल. यामुळे सुमारे 19.38 लाख मनुष्यदिवस प्रत्यक्ष रोजगार आणि 22.82 लाख मनुष्यदिवस अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील.

**निर्णय :** तेलंगणातील हैदराबाद-पणजी आर्थिक कॉरिडॉरवरील गुडेबेलूर ते महबूबनगर पर्यंत राष्ट्रीय महामार्ग-167 च्या चौपदरीकरणाला मान्यता.

**परिणाम :** या प्रकल्पाची एकूण लांबी 80.01 किलोमीटर आहे. त्याचा एकूण भांडवली खर्च 3175.08 कोटी रूपये आहे. हा प्रकल्प राष्ट्रीय महामार्ग (इतर) योजनेअंतर्गत हायब्रिड ॲन्युइटी पद्धतीने राबविला जाईल. पूर्ण झाल्यानंतर राष्ट्रीय महामार्ग-167 प्रादेशिक आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल. त्याच्यामुळे महत्वाच्या धार्मिक आणि आर्थिक केंद्रांमधील संपर्क मजबूत होईल. त्यातून व्यापार आणि औद्योगिक विकासासाठी नवीन संधी निर्माण होतील. ■





'परीक्षा पे चर्चा 2026' कार्यक्रमाचा दुसरा भाग

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मंत्र शिक्षण आणि कला दोन्ही उपयुक्त

*या वर्षी, परीक्षा पे चर्चा 2026 हा कार्यक्रम वेगळा आणि खास होता. देशाच्या वेगवेगळ्या भागात परीक्षांवरील चर्चा व्हाव्यात, असा सल्ला अनेक विद्यार्थ्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना दिला होता. त्यामुळे यावेळी त्यांनी देशाच्या वेगवेगळ्या भागातील विद्यार्थ्यांशी चर्चा केली. 9 फेब्रुवारी रोजी परीक्षा पे चर्चाच्या दुसऱ्या विशेष भागात त्यांनी कोइम्बतूर, रायपूर, देवमोगरा आणि गुवाहाटी येथील विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि यशप्राप्तीसाठी दिला मंत्र...*

### कधीही सुरू करू शकता स्टार्टअप

स्टार्टअप सुरू करण्यासाठी वयाची 25 वर्षे पूर्ण करणे आवश्यक नाही. तुम्ही कधीही स्टार्टअप सुरू करू शकता. लहान स्टार्टअपपासून तुम्ही काम सुरू करू शकता.

### पंतप्रधान मोदींचा अभ्यास मंत्र

अभ्यास आणि छंद दोन्ही उपयुक्त आहेत. ते एकमेकांना पूरक आहेत. कला आणि सर्जनशीलता या दोन्ही गोष्टी शिकायला मदत करतात आणि थकवा कमी करतात. शिक्षणाला प्राधान्य देताना, वैयक्तिक आवडींसाठी वेळ काढणेही महत्त्वाचे आहे.

### विकसित भारतात युवा वर्गाचे योगदान

कुठेही कचरा फेकून चालत नाही. सिग्नलवर लाल दिवा दिसला तर स्कूटर थांबवली पाहिजे. जेवल्यानंतर ताटात अन्न टाकणार नाही असा संकल्प आपण कुटुंब म्हणून करू. व्होकल फॉर लोकल अंतर्गत, आपण आपली स्वतःची स्थानिक उत्पादने खरेदी करू. सर्व नागरिकांनी अशा लहान-मोठ्या गोष्टी केल्या तर विकसित भारताच्या उभारणीत आपण आपली जबाबदारी निश्चितच पार पाडू शकतो.

### प्रेरणा आणि शिस्त

जीवनात प्रेरणा आणि शिस्त दोन्ही बाबी महत्त्वाच्या आहेत. शिस्त नसेल आणि कितीही प्रेरणा मिळाली तरी ती उपयोगी ठरणार नाही. जीवनात शिस्त आवश्यक आहे; ती प्रेरणेला बळ देते.

## तंत्रज्ञान समजून घ्या

आपण तंत्रज्ञानाचे गुलाम होणार नाही, यासाठी प्रयत्न केला पाहिजे. प्रत्येक तंत्रज्ञानाचा आपण अधिकाधिक वापर करू शकतो. आपण स्वतःचा विस्तार केला पाहिजे, त्याच्याशी तंत्रज्ञानाची ताकद जोडून घेतली पाहिजे आणि त्याद्वारे आपल्या कामात मूल्यवर्धन केले पाहिजे. असे करता आले तर तंत्रज्ञान कितीही अत्याधुनिक असले तरी आपल्याला त्याची भीती बाळगण्याची गरज नाही.

## प्रवास करताना भारताच्या विविधतेतून शिका

आपण कुठेही गेलो तरी विद्यार्थी म्हणून गेलो तरच पर्यटन अधिक आनंददायी होते. तुम्ही ट्रेनने प्रवास करा आणि मुख्य म्हणजे तुमचे जेवण बरोबर घेऊन जा. आणि बघा तुमचा प्रवास किती मजेदार होईल. ट्रेनमध्ये कशी गर्दी असते, लोक कसा प्रवास करतात, कशा गप्पा मारतात, या सगळ्यामध्ये एक वेगळीच गंमत असते. त्यातून वेगवेगळ्या गोष्टी शिकायला मिळतात. भारतात इतकी विविधता आहे की ती बघण्या- अनुभवण्यासाठी एक आयुष्य कमी पडेल.

## जे वाचले ते वाया जात नाही

तुम्ही जे काही ऐकले आणि वाचले ते वाया जात नाही. ते नक्कीच कुठेतरी साठवले गेले आहे. शांत मनाने बसा, काळजी करू नका. पेपर समोर येईल, तो शांतपणे सोडवा. दुसरे म्हणजे तुम्ही चांगले विद्यार्थी असाल तर त्या विषयावर तुमचे प्रभुत्व असेलच.

# पंतप्रधान मोदींच्या जीवनात शिक्षकाची भूमिका

तुमच्या आयुष्यात शिक्षकांची भूमिका काय आहे, याबद्दल एका विद्यार्थ्याने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देताना पंतप्रधान मोदी म्हणाले की शिक्षकांनी त्यांच्या आयुष्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या शिक्षकांनी त्यांना दररोज ग्रंथालयात जाण्यास, द टाईम्स ऑफ इंडियामधील संपादकीय वाचण्यास, ते लिहून ठेवण्यास आणि दुसऱ्या दिवशी त्यावर चर्चा करण्यास कसे प्रोत्साहित केले, या आठवणीला पंतप्रधानांनी उजाळा दिला. या शिकवणीमुळे त्यांच्यात शिस्त आणि कुतूहलाची भावना निर्माण झाली. त्यांनी त्यांच्या प्राथमिक शाळेतील परमार सरांच्या आठवणी सांगितल्या, ज्यांनी शारीरिक तंदुरुस्तीवर खूप भर दिला होता, आणि त्यांना योग आणि मल्लखांब शिकवले. ते व्यावसायिक खेळाडू झाले नसले तरी त्यांना आरोग्याचे महत्त्व समजण्यास मदत झाली. पंतप्रधान म्हणाले की प्रत्येक महान व्यक्तिमत्त्वाच्या जीवनात दोन व्यक्तींचा प्रभाव नेहमीच कायम राहतोः एक म्हणजे त्यांची आई आणि दुसरे म्हणजे त्यांचे शिक्षक.

# प्रत्येक विद्यार्थ्याचे ऐकणे, समजून घेणे आणि काही ना काही शिकणे

परीक्षेबद्दलच्या चर्चेबरोबरच, स्थानिक संगीत आणि आसामी चहा हे सुद्धा 'परीक्षा पे चर्चा' चा अविस्मरणीय भाग ठरले. या भागात सर्व चर्चा वेगवेगळ्या ठिकाणी झाल्या. प्रत्येक ठिकाणी विद्यार्थी वेगळे होते आणि त्यांचे अनुभवही वेगळे होते. प्रत्येक चर्चेचे उद्दिष्ट मात्र एकच होतेः प्रत्येक विद्यार्थ्याचे ऐकणे, समजून घेणे आणि एकत्र काहीतरी शिकणे.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.



## अभ्यास आणि खेळ यांच्यात संतुलन राखा

शिक्षण हे जीवन आणि समाज दोन्हीसाठी आवश्यक आहे. त्याला कमी लेखू नये. 'मी खेळात खूप चांगला आहे, म्हणून मला अभ्यास करण्याची गरज नाही' असा विचार करण्याची चूक कधीही करू नका. पण फक्त शिक्षण घेतले म्हणजे सगळे काही आले, असेही नाही आहे. तुमच्याकडे प्रतिभा आहे आणि तुम्ही ती विकसित केली पाहिजे. खेळाडू बनण्यासाठी खेळणे ही एक गोष्ट आहे, परंतु तुमच्या आयुष्यात खेळ असणे देखील महत्त्वाचे आहे.



## पर्यावरण रक्षण हा आपला स्वभाव असावा

नैसर्गिक स्रोतांचे रक्षण करणे हे आपल्या जीवनात रुजले पाहिजे आणि हळूहळू आपण लोकांना त्यात सहभागी करून घेतले पाहिजे. आपण मानवतेने वागलो तर सकारात्मक बदलाला सुरूवात होते.



## नेतृत्वाच्या भूमिकेसाठी सज्ज असा

आपल्याला आयुष्यात काय काम करायचे आहे ते तुमचे तुम्ही ठरवा.  इतर कोणी ते केले किंवा केले नाही तरी मी ते करेन, असे ठरवा.  मी स्वतःपासून सुरुवात करेन असे म्हणाल आणि तसे कराल तेव्हा तुम्हाला दिसेल की तुमच्यामध्ये नेतृत्व स्वाभाविकपणे विकसित होते आहे. आपण नेहमीच नेतृत्व करण्यासाठी स्वतःला तयार केले पाहिजे. नेता असणे म्हणजे केवळ निवडणुका लढवणे, राजकीय पक्ष स्थापन करणे, पक्षाच्या कामात सहभागी होणे आणि मोठमोठी भाषणे देणे असा नाही. नेता असणे म्हणजे आपला मुद्दा दहा लोकांना पटवून देण्याचे आवश्यक गुण असणे.

## गुजरातच्या आदिवासी भागांचा विकास

गुजरातमधील पाल-चितरीया भागातील आदिवासी समुदायाने स्वातंत्र्यासाठी मोठा लढा दिला होता. एकदा एका भयंकर दुष्काळाच्या वेळी मी त्या भागात बराच काळ राहिलो आणि काम केले. त्यावेळी मला वाटले की तिथे शिक्षणाकडे लक्ष दिले गेले पाहिजे. त्यानंतर जेव्हा मला संधी मिळाली आणि मी मुख्यमंत्री झालो, तेव्हा मी तिथे लक्ष देऊ लागलो. तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की एक काळ असा होता जेव्हा उमरगावपासून अंबाजीपर्यंत एकही विज्ञान शाळा नव्हती. आता तिथे दोन विद्यापीठे, विज्ञान शाळा आणि एक आयटीआय आहे. खूप बदल झाले आहेत. त्याचा खूप फायदा होत आहे.

## पालकांनी तुलना करणे टाळावे

आईवडिलांनी तुलना करणे टाळले पाहिजे. मी प्रत्येक पालकाला विनंती करतो की त्यांनी इतरांसमोर आपल्या मुलांची प्रशंसा करू नये, कारण यामुळे त्यांना वाईट सवय लागू शकते. तुमच्या एकाच मुलाची इतकी प्रशंसा करू नका की दुसऱ्या मुलाला असे वाटेल की आपले आईवडील जगाला नेहमीच त्याच्याबद्दल सांगतात, माझ्याबद्दल कधीही सांगत नाहीत.

## तुम्ही सर्व काही करू शकता

तुम्ही स्वतःवर विश्वास ठेवलात तर कोणत्याही गोष्टीवर मात करू शकता. स्वतःवर विश्वास ठेवणारी व्यक्ती काय करते? संपूर्ण परिस्थितीचा मनातल्या मनात अभ्यास करते. तुम्हीही आपण ज्या परिस्थितीत आहात, तिचे निरीक्षण करा. परिस्थितीचा अंदाज घेतला पाहिजे की काय घडले आहे. असे केलेत, तर तुम्हाला नक्की वाटेल की हो, ठीक आहे, मला हे जमू शकेल. आत्मविश्वास हा शब्द जीवनात खऱ्या अर्थाने समजून घेतला पाहिजे. ही आत्म म्हणजे स्वतःची गोष्ट आहे. इतर कोणीही ती दुरुस्त करू शकत नाही; आपल्याला स्वतःलाच ते करावे लागेल. ■



राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर आभार प्रस्ताव, पंतप्रधान मोदींचे उत्तर

# आता आघाडीवर राहून नेतृत्व करेल भारत

> *आज माझा देश आपली पूर्ण क्षमता दाखवत आहे. तुमच्याकडे आर्थिक ताकद असते, तुमच्या नागरिकांच्या मनात देशाबद्दल उत्साहाची भावना असते आणि विशेषतः उत्पादनासाठी एक मजबूत परिसंस्था असते, तेव्हाच अवघे जग तुमच्यासोबत व्यवहार करण्यासाठी पुढे येते.*
>
> **–नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

*राज्यसभेत पाच फेब्रुवारी रोजी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावाला उत्तर देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अर्थव्यवस्था आणि व्यापार करारांसह विविध मुद्द्यांवर चर्चा केली. सुमारे दीड तासाच्या भाषणात, पंतप्रधान मोदींनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आणि सांगितले की भारत आता मागे राहणार नाही; तो आघाडीवर राहून नेतृत्व करेल. सादर आहेत, भाषणातील संपादित भाग...*

## मागच्या एका वर्षात जलद प्रगती

मागच्या एका वर्षात विकसित राष्ट्र होण्याच्या दिशेने भारताची वेगाने प्रगती झाली आहे, प्रत्येक क्षेत्रात आणि समाजाच्या सर्व घटकांमध्ये दिसून येण्याजोगे बदल झाले आहेत. देश योग्य दिशेने वेगाने प्रगती करत आहे. राष्ट्रपतींनी हे मुद्दे संवेदनशीलतेने आणि स्पष्टपणे मांडले. त्यांनी संसदेत भारताच्या प्रगतीची व्यापक गाथा सादर केली, ज्यामध्ये मध्यमवर्ग, निम्न मध्यमवर्ग, गरीब, गावे, शेतकरी, महिला, विज्ञान, तंत्रज्ञान आणि शेती या सर्व विषयांचा समावेश आहे. त्यांनी देशातील युवा वर्ग भारताच्या क्षमतेला कशा प्रकारे वाढवत आहेत यावरही सविस्तर चर्चा केली.

## वेगाने पुढे जायचे आहे, आपली ध्येये साध्य करायची आहेत

एकविसाव्या शतकाचा एक चतुर्थांश भाग संपला आहे. मागच्या शतकातील दुसरा एक चतुर्थांश काळ भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात निर्णायक होता, त्याचप्रमाणे हा दुसरा एक चतुर्थांश काळ सुद्धा विकसित भारताच्या उभारणीत तितकाच शक्तिशाली आणि वेगवान असेल. प्रत्येक नागरिकाला जाणवते आहे की देश एका महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचला आहे, जिथे थांबण्याचा किंवा मागे वळण्याचा प्रश्नच उद्भवत नाही; आपण फक्त वेगाने पुढे जायला हवे. आपण आपली ध्येये साध्य केली पाहिजेत आणि ती साध्य केल्यानंतरच आपण निवांत होऊ शकतो, आणि देश त्या दिशेने आगेकूच करतो आहे.



## युवा लोकसंख्या असलेला देश

आपण वर्तमान स्थिती लक्षात घेतली तर भारताला एकाच वेळी अनेक चांगल्या संधी मिळाल्या आहेत. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे जगातील सर्वात समृद्ध देश वृद्ध होत आहेत, त्यांची लोकसंख्या वृद्ध म्हणता येईल, अशा वयापर्यंत पोहोचली आहे. आपला देश विकासाची नवीन शिखरे गाठत आहे आणि त्याच वेळी, आपला देश दिवसेंदिवस तरुण होत आहे. ही खरोखर एक चांगली संधी आहे. जगाचे भारताप्रति आकर्षण वाढले आहे. त्याचबरोबर जगाला भारताच्या प्रतिभेचे महत्व जाणवते आहे. आजघडीला आपल्याकडे एक अतिशय महत्त्वाचा प्रतिभा समूह आहे, युवा वर्गाचा प्रतिभा समूह, ज्यामध्ये स्वप्ने, दृढनिश्चय आणि क्षमता आहेत.

## आत्मविश्वासाने परिपूर्ण आहे भारत

कोणतेही क्षेत्र पहा, मग ते विज्ञान असो, अवकाश असो किंवा क्रीडा असो; भारत प्रत्येक क्षेत्रात आत्मविश्वासाने परिपूर्ण आहे. जागतिक मित्र म्हणून, भारत अनेक देशांचा विश्वासू भागीदार बनला आहे आणि आपण जागतिक कल्याणाच्या दिशेने आपली योग्य भूमिका बजावण्यासाठी खांद्याला खांदा लावून काम करत आहोत.

## सुधारणा, कामगिरी, परिवर्तनाचा मंत्र

आपण सुधारणा, कामगिरी, परिवर्तन या मंत्रासह आगेकूच करत गेलो आणि आज देश वेगाने सुधारणा राबवत आहे. आपण संरचनात्मक, प्रक्रियांशी संबंधित आणि धोरणात्मक सुधारणा अंमलात आणल्या आहेत. आपले उत्पादन क्षेत्र आणि उद्योजक सक्षम व्हावेत. प्रत्येक वस्तूचे मूल्यवर्धन व्हावे यासाठी आपण प्रयत्न केले आहेत. मी आत्मविश्वासाने सांगू शकतो की आज भारत जगाशी स्पर्धा करण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहे.

## तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने भारताची वाटचाल

जागतिक स्तरावर उद्भवणाऱ्या आव्हानांवर उपाय देणारा भारत हा आज आशेचा किरण ठरला आहे. देशातील लोकांनी आम्हाला सेवा करण्याची संधी दिली तेव्हा देश 'नाजूक पाच' अर्थव्यवस्थांपैकी एक म्हणून ओळखला जात असे. स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा आपण जगातील सहाव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होतो, परंतु परिस्थिती अशा प्रकारे बिघडत गेली आणि भारत अकराव्या स्थानावर फेकला गेला. आज मात्र आपण तिसऱ्या स्थानावर पोहोचण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहोत.



# लहान शेतकऱ्यांच्या खात्यात 4 लाख कोटी रुपये हस्तांतरित

आम्हाला लहान शेतकऱ्यांबद्दल सखोल सहानुभूती होती. त्यांच्या वास्तव परिस्थितीची आम्हाला जाणीव होती. म्हणूनच आम्ही पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजना सुरू केली. इतक्या कमी वेळात, आम्ही छोट्या शेतकऱ्यांच्या खात्यात 4 लाख कोटी रुपये जमा केले. यामुळे लहान शेतकऱ्यांना नवीन शक्ती मिळाली. त्यांना नवीन स्वप्ने पाहण्याची क्षमता मिळाली. आपले शेतकरी भारताच्या आशा आणि अपेक्षांनुसार काम करतील, असा विश्वास मला वाटतो.




## एमएसएमई नेटवर्कवरील जगाचा वाढता विश्वास

एमएसएमईचे नेटवर्क जितके शक्तिशाली असेल तितके ते अर्थव्यवस्थेला बळकटी देते, यावर आम्ही लक्ष केंद्रित केले आहे आणि अनेक सुधारणा लागू केल्या आहेत. आज, आपल्या एमएसएमई नेटवर्कवरील जगाचा विश्वास वाढतो आहे. आपण विमाने बनवत नसलो तरी अशी अनेक विमाने आहेत ज्यांचे बरेच भाग आपल्या देशातील लहान एमएसएमई तयार करतात.

## बँकांचे आरोग्य सुधारले

बँकांचे आरोग्य सुधारले आहे आणि ते आणखी वेगाने सुधारते आहे. मुद्रा योजनेद्वारे आम्ही देशातील युवा वर्गाला तीस लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज दिले. आम्ही केवळ महिला बचत गटांचा विस्तार केला नाही तर दहा कोटी भगिनींना थेट आर्थिक मदतीची व्यवस्थाही केली. आज एनपीए एक टक्क्यांपेक्षा कमी आहे, ही बँकांच्या आरोग्यासाठी एक उत्तम बाब आहे. इतकेच नाही तर आज बँकांचा नफा विक्रमी उच्चांकावर आहे. यामुळे देशाची अर्थव्यवस्था मजबूत होते. बँकिंग व्यवस्था मजबूत असेल तर उर्वरित अर्थव्यवस्थाही मजबूत होते. हे साध्य झाले आहे. सार्वजनिक उपक्रमांच्या बाबतीतही सुधारणा करण्यात आल्या आहेत. आज आपल्या सार्वजनिक उपक्रमांना देशांतर्गत आणि देशाबाहेरूनही मोठ्या प्रमाणात ऑर्डर्स मिळत आहेत.

## आमच्याकडे 140 कोटी उपाय आहेत

आपले 140 कोटी नागरिक समोर येणाऱ्या आव्हानांवर उपाय देण्यास सक्षम आहेत, असा विश्वास आम्हाला वाटतो. आपल्या नागरिकांवर, त्यांच्या क्षमतेवर आमचा विश्वास आहे आणि हीच लोकशाहीची खरी ताकद आहे. आमच्यासाठी, प्रत्येक नागरिक हा भारताच्या उज्ज्वल भविष्याचा नियंता आहे, निर्माता आहे आणि शिल्पकार आहे.

> *आपल्या देशाच्या युवा वर्गाचा आपल्याला अभिमान असला पाहिजे; संपूर्ण जागतिक बाजारपेठ आता त्यांच्यासाठी खुली झाली आहे. त्यांच्यासाठी आता संधींचा वर्षाव होतो आहे. मी त्यांना सांगतो, "चला मित्रहो, मी तुमच्याबरोबर खांद्याला खांदा लावून उभा आहे. धाडस करा आणि पुढे चला; देश तुमच्याबरोबर उभा आहे.*
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

## 2047 सालापर्यंत विकसित करायचा आहे भारत

विकसित भारताचे स्वप्न घेऊन आपण निघालो आहोत आणि आज, देशातील लोकांच्या उर्जेमुळे, ते स्वप्न एका संकल्पात रूपांतरित झाले आहे. आज कुठेही जा, प्रत्येकजण म्हणतो की आपल्याला 2047 पर्यंत विकसित भारत हे उद्दिष्ट साध्य करायचे आहे. विरोधकांच्या काळात "भारताने संधी हुकवली!" असे नेहमीच म्हटले जात होते. ही गोष्ट भारताच्या हातून ज्या संधी हुकल्या, त्यांच्याविषयी असे. आज, भारत अशी कोणतीही संधी सोडत नाही. इतकेच नाही तर, पुढे पावले टाकून देश नेतृत्व करेल.





# ‘भारत’ जागतिक मंचावर ‘ग्लोबल साऊथ’चा जोरदार आवाज

संपूर्ण जगामध्ये ग्लोबल साऊथची चर्चा सुरू आहे; आणि त्या चर्चेचा सूत्रधार म्हणून भारत वैश्विक मंचावर या ग्लोबल साऊथचा जोरदार आवाज बनला आहे. अनेक देशांबरोबर भारत ‘फ्युचर रेडी ट्रेड डील्स’ करीत आहे. मागील काही दिवसांमध्ये संपूर्ण जगामधील महत्वपूर्ण 9 मोठ्या देशांबरोबर आपण व्यापार करार केले आहेत आणि त्यामध्ये ‘मदर ऑफ ऑल डील्स’ म्हणजे एकाचवेळी 27 देशांबरोबर, युरोपीय संघाबरोबर केला आहे मुक्त व्यापार करार...

## माझा देश अजरामर राहणार!

देशाचे भविष्य उज्ज्वल बनवायचे आहे. वर्तमानकाळही उज्ज्वल बनविण्यासाठी निरंतर कार्य करावे लागते. आपण विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी ‘हवाई प्रवासी’ बनलो आहे. यासाठी पंचवार्षिक योजना आणि प्रत्येक वर्षाचे अंदाजपत्रक बनवले जाते. आपण दिशा निश्चित करून मार्गक्रमण करीत आहोत. कारण आपला देश अजरामर राहणार आहे. आपण देशातील युवा पिढीच्या हाती समृद्ध भारत देण्याचे स्वप्न पहातच पुढे जात आहोत. घरामध्ये जी लहान मुले आहेत, त्यांना पाहून विचार मनात येतो की, या मुलांच्या हातामध्ये आपण असा हिंदुस्तान सोपवताना मनामध्ये आनंदाची भावना निर्माण झाली पाहिजे, असे काम केले पाहिजे.

## यशाच्या पाय-या चढत देश जात आहे पुढे

आज ज्याप्रकारे आपण नवनवीन उपक्रम सुरू केले आहेत, मग ते अंतराळविषयक असो, विज्ञानातील असो, तंत्रज्ञानातील असो, सागराच्या खोल तळाशी जाण्याविषयीचे असो, जल-थल-नभ, अशा प्रत्येक क्षेत्रामध्ये नवीन संकल्प केले आहेत, नव्या ऊर्जेने, नव्याने दमदार पावले टाकत यशाच्या नवीन पाय-या चढत, देश आज पुढे जात आहे. आपण हरित हायड्रोजन क्षेत्रात काम करीत आहोत, आगामी काळ नेमका कसा असेल, हे जाणून आपण काम करीत आहोत. आपण क्वांटम कंप्यूटिंग क्षेत्राविषयी चर्चा करतो, आपण एआय अर्थात कृत्रिम प्रज्ञा क्षेत्रामध्ये एका मिशनप्रमाणे कार्यरत आहोत. आज जगामध्ये दुर्मिळ खनिजे, दुर्लभ पृथ्वी एक राजकीय हत्यार बनले आहे. आम्ही त्यावर लक्ष केंद्रीत करीत आहोत.

## आगामी काळात भारतासाठी भरपूर संधी होणार उपलब्ध

आगामी काळ हा भारत आणि देशातील नवयुवकांसाठी अनेक प्रकारच्या मोठ्या प्रमाणावर संधी घेवून येणारा असणार आहे. आपल्याला हे चांगले लक्षात आले असून, या भविष्याचा विचार करून त्याप्रमाणे नीती धोरणे तयार करीत आम्ही पुढची वाटचाल करीत आहोत. देशवासीयांना माझा आग्रह आहे, की तुम्ही सर्वांनी गुणवत्तेच्याबाबतीत मला सहकार्य करावे. गुणवत्तेमध्ये कोणत्याही प्रकारे तडजोड केली जावू नये. आगामी काळात तुमच्या लक्षात येईल की, संपूर्ण जगामध्ये फक्त आणि फक्त ‘मेड इन इंडिया, मेड इन भारत’ याचे कौतुक करणारे गीत सर्वजण गायला लागतील. ■

राज्यसभेमध्ये राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या उत्तराचे पूर्ण भाषण पाहण्यासाठी बाजूचा क्यूआर कोड स्कॅन करावा.



## सुधारणा एक्सप्रेसमधील प्रवासी भारत

# ... म्हणूनच संपूर्ण व्यवस्था बदलण्यावर झाले काम

*भारतासाठी हे दशक अभूतपूर्व विकास, उत्तम कामकाज आणि लोकशाही मजबूत करणारे होते. या सर्व गोष्टी काही अचानक, एकदम झाल्या नाहीत. भारताने 2015 मध्येच नीती आयोगाच्या दस्तावेजांमध्ये स्पष्ट केले होते की, देश कोणत्याही प्रकारे परदेशी विकास मॉडेल स्वीकारणार नाही. त्याऐवजी आपल्या देशाच्या गरजा ओळखून आणि आत्तापर्यंतच्या अनुभवानुसार आपला मार्ग तयार करेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 13 फेब्रुवारी रोजी 'ईटी नाऊ ग्लोबल बिजनेस शिखर परिषद 2026' मध्ये सांगितले की, अगदी नाईलाजाने केलेल्या सुधारणांचे कधीच परिणाम दिसून येत नाहीत. म्हणूनच सरकारने संपूर्ण व्यवस्थेमध्ये परिवर्तन करण्यासाठी केले काम....*

नवीन भारत ज्या विकासाच्या दृष्टिकोनातून पुढे जात आहे, त्या नीतीमुळे देशाला आपल्या गरजा आणि हित यांच्यानुसार निर्णय घेण्याचा आत्मविश्वास दिला आहे. याच कारणामुळे प्रचंड उलथा-पालथ अनुभवलेल्या या दशकानेही भारताच्या अर्थव्यवस्थेला कमकुवत बनवले नाही, तर उलट सातत्याने बळकटी दिली. 'ईटी नाऊ ग्लोबल शिखर परिषद 2026' मध्ये 'व्यवधानों का दशक, परिवर्तन की शताब्दी' या विषयावर आपले विचार व्यक्त करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आधीच्या काळामध्ये तयार केल्या जाणा-या 'कॅबिनेट नोट'चे उदाहरण दिले. त्यांनी सांगितले की, 'कॅबिनेट नोट' तयार करण्यासाठी पूर्वीच्या सरकारच्या काळात अनेक आठवडे किंवा महिन्यांचा कालावधी जात होता. त्यामुळे विकास कामांची गती मंदावत

## भाषणातील काही मुख्य मुद्दे

- भारताची आर्थिक शक्ती जसजशी वाढली, त्याचबरोबर सरकारने राज्यांनाही सशक्त बनवले आहे. 2004 ते 2014 पर्यंत राज्यांना कर हस्तांतरणातून जवळपास 18 लाख कोटी रूपये मिळाले. तर वर्ष 2014 ते 2015 या काळामध्ये राज्यांना 84 लाख कोटी रूपये मिळाले आहे. या वर्षीच्या अंदाज पत्रकामध्ये करण्यात आलेल्या तरतुदींचा यामध्ये समावेश केला तर राज्यांना एकूण कर हस्तांतरणाप्रीत्यर्थ जवळपास 100 लाख कोटी रूपयांपर्यंत निधी मिळाला आहे.
- 21व्या शतकातील या चालू दशकामध्ये भारत 'सुधारणा एक्सप्रेस' मधील प्रवासी आहे. 'सुधारणा एक्सप्रेस' काही सक्तीची नाही तर विश्वासाची, खात्रीलायक असून ती सुधारणांविषयी वचनबद्धता बाळगून विकासाच्या गाडीला वेग देत आहे.
- अर्थसंकल्प हा केवळ 'व्यय-केंद्रीत' बनवला नाही तर 'परिणाम-केंद्रीत'ही बनवला आहे. 2014च्या आधी 'ऑफ बजेट बॉरोइंग' म्हणजेच अर्थसंकल्पा- व्यतिरिक्त उधारी यावर खूप मोठ्या प्रमाणावर चर्चा होत असे. परंतु आता 'ऑफ बजेट रिफॉर्म्स' म्हणजेच अर्थसंकल्पा-व्यतिरिक्त सुधारणा यावर चर्चा होते.
- अर्थसंकल्पाच्याही आधी 'नेक्स्ट जनरेशन' जीएसटी अर्थात आधुनिक काळाशी सुसंगत वस्तू आणि सेवा कर सुधारणा केल्या गेल्या. नियोजन आयोगाच्या स्थानी नीती आयोग बनविण्यात आला. कलम 370 चा अडथळा काढून टाकण्यात आला. तीन तलाक प्रथेच्या विरोधात कायदा तयार करण्यात आला, नारी शक्ती वंदन अधिनियम करण्यात आले, अर्थसंकल्पामध्ये घोषणा केली असेल अथवा अर्थसंकल्पाव्यतिरिक्त सरकारने काही गोष्टी जाहीर केल्या असतील. सरकारची सुधारणा एक्सप्रेस सातत्याने वेगाने पुढे जात आहे.
- गेल्या दशकामध्ये आम्ही तंत्रज्ञान आणि नवसंकल्पना या दोन्ही गोष्टी विकासाच्या गाभ्यातील चालक शक्ती मानल्या आहेत. हाच विचार पुढे नेऊन, देशामध्ये स्टार्टअप संस्कृती, हॅकेथॉन संस्कृती यांना प्रोत्साहन देण्यात आले.



*ज्यावेळी राष्ट्रसर्वोपरि असते, त्यावेळी प्रत्येक निर्णय आणि नीती यामध्ये देश हिताची कृती केलेली असते. सरकारचा दृष्टिकोन अतिशय स्वच्छ, स्पष्ट आहे. भारताला विकसित बनविण्याच्या दिशेने सातत्याने काम करायचे आहे. मग आजची पिढी 2047 पर्यंत असेल अथवा नसेलही, राष्ट्र आणि देशाच्या आगामी पिढ्या तरी राहणारच आहेत. म्हणूनच सध्याच्या पिढीचे हे कर्तव्य आहे की, भविष्य सुरक्षित आणि उज्ज्वल बनविण्यासाठी त्यांनी स्वतः समर्पित झाले पाहिजे.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

असे. आमच्या सरकारने कोणतेही निर्णय घेण्याची प्रक्रिया ही कालबद्ध असावी आणि तांत्रिक आधार त्या निर्णयांना असावा, याचा आग्रह धरला. यामुळे कामाच्या फायली अनिश्चित काळासाठी प्रलंबित राहणार नाहीत, याकडे लक्ष दिले गेले. आणि त्याचा परिणाम आज अगदी स्पष्ट स्वरूपात दिसून येत आहे.

वैश्विक स्तरावर 21व्या शतकाच्या मागच्या दशकामध्ये अनेक प्रकारच्या व्यत्ययांची, अडथळ्यांची मालिकाच सर्वांनी अनुभवली. त्यामध्ये कोरोना महामारी, विविध क्षेत्रांमध्ये निर्माण झालेली तणावाची स्थिती आणि युद्ध, संघर्ष यामुळे पुरवठा साखळीमध्ये पडलेला खंड अशा गोष्टींचा समावेश आहे. या आव्हानांमुळे संपूर्ण जगाला हादरवून सोडले गेले. अशा अनेक संकटांशी सामना करीत असताना देशाने या दशकामध्ये अतिशय उल्लेखनीय विकास साधला आहे. अनेक क्षेत्रामध्ये उत्कृष्ट प्रदर्शन केले. आणि देशात लोकशाहीचे सुदृढीकरणही झाले. यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अभिमान व्यक्त केला आणि त्याचबरोबर ते पुढे म्हणाले, कोणत्याही देशामध्ये वास्तविक किती प्रचंड क्षमता आहे, शक्ती आहे, ही गोष्ट त्या देशावर आलेल्या संकटाच्या काळामध्येच सर्वांच्या समोर येते. याआधीच्या दशकामध्ये भारत सर्वात मोठी 11वी अर्थव्यवस्था होती. परंतु आज भारत सर्वात वेगाने विश्वातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने मार्गक्रमण करीत आहे. वर्तमानात भारत वैश्विक विकासामध्ये 16 टक्क्यांपेक्षा जास्त योगदान देत आहे. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विश्वास व्यक्त केला की, या योगदानामध्ये दरवर्षी वाढ होत राहील.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यावेळी म्हणाले की, भारताच्या मुक्त व्यापार करारांची संपूर्ण वैश्विक स्तरावर खूप व्यापक चर्चा आणि विश्लेषण होत आहे. परंतु 2014च्या आधी अशा प्रकारचा सामंजस्य करार होणे अशक्य होते. आता देश तोच आहे, युवा शक्ती तीच आहे, सरकारी कार्यप्रणाली तशीच आहे, मग बदल नेमके काय झाले आहेत? परिवर्तन! सरकारच्या दृष्टिकोनामध्ये परिवर्तन झाले आहे. नीती आणि नियत यामध्ये बदल झाला आहे. भारताला आता सामर्थ्य प्राप्त झाले आहे. गेल्या एका दशकामध्ये भारताने विविध क्षेत्रांमध्ये 38 देशांबरोबर व्यापार सामंजस्य करार केले आहे. आजचा भारत आत्मविश्वासाने भरलेला आहे. वैश्विक स्तरावर प्रतिस्पर्धा करण्यासाठी भारत सज्ज आहे. गेल्या 11 वर्षांमध्ये भारतामध्ये एक मजबूत उत्पादन प्रणाली विकसित करण्यात आली आहे. हेच तर भारताच्या व्यापार धोरणामध्ये महत्वपूर्ण परिवर्तन घडवून आणण्यात आले आहे. हा बदल भारताच्या विकास यात्रेतील एक महत्वाचा अनिवार्य स्तंभ बनला आहे. आज देश समर्थ आहे, सशक्त आहे आणि म्हणून संपूर्ण जग भारताविषयी विश्वास व्यक्त करीत आहे. ■

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी बाजूचा क्यू आर कोड स्कॅन करावा.

पंतप्रधान मोदी यांचा आसाम दौरा

# सुरक्षा आणि विकासाचा नवीन अध्याय

*ईशान्य भारत म्हणजे केंद्र सरकारसाठी अष्टलक्ष्मी आहे. याच कारणामुळे केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये ईशान्येकडील राज्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी विशेष लक्ष देण्यात आले आहे. यावर्षी आसामला करामधील हिस्सा म्हणून जवळपास 50 हजार कोटी रूपये मिळणार आहेत. या मालिकेमध्ये सुरक्षा आणि विकास यांना अधिक वेग देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 14 फेब्रुवारी रोजी आसामचा दौरा केला आणि राज्याला अनेक महत्वाच्या विकास प्रकल्पांची दिली भेट...*

देश आपल्या सेनादलांना मजबूत करीत आहे. भारत आपल्या सरहद्दीवरील भागांमध्ये उत्कृष्ट महामार्ग, अनेक बोगदे, उंच-उंच पूल, आधुनिक हवाईतळ बनवून देशाच्या सुरक्षेमध्ये वाढ करीत आहे. आसाम दौ-यामध्ये आपत्तीच्यावेळी 'लॅंडिंग' सुविधेचा (ईएलएफ) उपयोग केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, आज देशाला फक्त आणखी एक आपत्तीकालीन लॅंडिंग सुविधा मिळाली नाही, तर या गोष्टीवरून सिद्ध होते की, हा नवीन भारत, आपल्या सुरक्षेसाठी सर्वतोपरि सज्ज होत आहे. भारत आता केवळ आपल्या सीमाच सशक्त करीत आहे असे नाही, तर देशाच्या शत्रूच्या घरामध्ये घुसून त्याला सडेतोड उत्तरही देत




## कुमार भास्कर वर्मा सेतूचे उद्‌घाटन

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ब्रह्मपुत्र नदीवर जवळपास 3,030 कोटी रूपये खर्चून निर्माण करण्यात आलेल्या कुमार भास्कर वर्मा सेतूचे उद्घाटन केले.
- गुवाहाटीला उत्तर गुवाहाटीने जोडणारा हा सहा मार्गिका असलेला 'एक्स्ट्राडोज्ड प्रेस्ट्रस्ड कॉंक्रीट' (पीएससी) सेतू, ईशान्य भारतातील पहिला 'एक्स्ट्राडोज्ड' सेतू आहे.
- यामुळे गुवाहाटी आणि उत्तर गुवाहाटी यांच्या दरम्यान प्रवासासाठी लागणारा वेळ कमी होऊन फक्त सात मिनिटे असणार आहे.
- या क्षेत्रातील उच्च भूकंपीय संवेदनशीलता लक्षात घेवून सेतूमध्ये 'फ्रिक्शन पेंडुलम बेअरिंग्स'चा उपयोग करण्यात आला असून त्याच्या पायासाठी 'आयसोलेशन' तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे.
- पुलाच्या मजबुतीसाठी आणि तो प्रदीर्घ काळ टिकून रहावा यासाठी संरचनात्मक व्यवस्था कायम राखण्यासाठी उच्च गुणवत्तेच्या 'स्टे केबल्स' चा वापर करण्यात आला आहे.
- याशिवाय 'रियल-टाइम कंडीशन मॉनिटरिंग' म्हणजेच वास्तविक वेळेला पुलाच्या स्थितीची देखरेख केली जाणे, काही नुकसान झाल्यास त्याची त्वरीत माहिती समजावी आणि अधिक सुरक्षा सुनिश्चित करणे शक्य व्हावे यासाठी, 'पुलाच्या आरोग्याच्या देखरेख प्रणाली'चाही यामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहिण्यासाठी बाजूचा क्यू आर कोड स्कॅन करावा.




*हा अत्यंत अभिमानाचा विषय आहे की, ईशान्येला आपत्तीकालीन लँडिंग सुविधा मिळाली. व्यूहरचनात्मक दृष्टीने आणि नैसर्गिक संकटाच्यावेळी, अशी सुविधा असणे खूप महत्वाचे असते.*

**– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

## ईशान्य भारतामध्ये वैशिष्ट्यपूर्ण आपत्तीकालीन लँडिंग सुविधा

आपत्तीकालीन लँडिंग सुविधा (ईएलएफ) ही ईशान्य भारतामधील वैशिष्ट्यपूर्ण पहिली सुविधा आहे. ही सुविधा भारतीय हवाईदलाच्या समन्वयाने उपलब्ध केली गेली आहे. या सुविधेमुळे विशेष स्वरूपामध्ये आपत्ती निर्माण झाल्यास सैन्य आणि नागरिकांना विमानाने नेणे, तसेच उतरवणे शक्य होईल, अशी विशिष्ट रचना तयार करण्यात आली आहे. ही सुविधा म्हणजे आपद्‌काळामध्ये त्वरित प्रतिसाद देण्यासाठी एक महत्वपूर्ण साधन म्हणून कार्य करू शकणार आहे. यामुळे ईशान्येकडील राज्यांमध्ये येणा-या नैसर्गिक संकटांना तोंड देण्यासाठी या व्यूहरचनात्मक कार्यासाठी आवश्यकतेनुसार बचाव आणि मदत कार्य वेगाने करणे शक्य होणार आहे. दोन्ही बाजूंनी उपयुक्त अशी पायाभूत सुविधा तयार करण्यात आली असून या ईएलएफच्या मदतीने 40 टनापर्यंत लढावू विमाने आणि 74 टनांपर्यंत कमाल 'टेक-ऑफ' वजनाचे परिवहन विमानांचे संचालन करण्याइतकी ही सुविधा सक्षम आहे.

## ईशान्य क्षेत्रासाठी राष्ट्रीय डेटा केंद्राचे उद्‌घाटन

- आसामच्या कामरूप जिल्ह्यातील अमिंगांव इथे ईशान्य क्षेत्रासाठी केले राष्ट्रीय डेटा केंद्राचे उद्‌घाटन.
- हे अत्याधुनिक डेटा केंद्र, त्याची एकूण स्वीकृत क्षमता 8.5 एमडब्ल्यू आणि प्रति रॅक सरासरी क्षमता 10 केडब्ल्यू आहे. हे केंद्र विविध सरकारी विभागांच्या महत्वपूर्ण मिशन-क्रिटिकल ॲप्लिकेशन' यांच्यासाठी कार्यरत असणार आहे.
- हे इतर राष्ट्रीय डेटा केंद्रांसाठी 'डिझास्टर रिकव्हरी' केंद्र या स्वरूपामध्येही कार्य करेल.
- यामुळे ईशान्येकडील राज्यांच्या सरकारांना आवश्यक नागरिक - केंद्रीत सेवांना डिजिटल वितरण सुनिश्चित करण्यास मदत होईल.
- या राष्ट्रीय डेटा केंद्राला विभागातील आयसीटी पायाभूत सुविधा मजबूत करणे आणि एक सुदृढ-सुरक्षित आणि सातत्याने उपलब्ध असणारी डिजिटल पायाभूत सुविधा सुनिश्चित करण्यासाठी नियोजित करण्यात आले आहे.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आयआयएम गुवाहाटीचेही उद्‌घाटन केले. त्यामुळे ईशान्येकडील क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण आणि व्यवसाय व्यवस्थापनाच्या शिक्षणाला नवीन उंची प्रदान करेल.

## पंतप्रधान मोदी यांनी इलेक्ट्रिक बस गाड्यांना हिरवा झेंडा दाखवून केले रवाना

- पीएम ई-बस सेवा योजनेअंतर्गत गुवाहाटी (100), नागपूर (50), भावनगर (50), आणि चंदिगड (25), अशा एकूण 225 इलेक्ट्रिक बसगाड्यांना हिरवा झेंडा दाखवून रवाना केले.
- या चार शहरांमध्ये पीएम ई-बस सेवेच्या संचालनाला झालेल्या प्रारंभामुळे 50 लाखांपेक्षा जास्त नागरिकांना स्वच्छ, स्वस्त आणि विश्वसनीय सार्वजनिक परिवहन सेवेचा लाभ मिळेल.
- या पहिल्या नागरी परिवहन व्यवस्थेमुळे सुधारणा आणि राहणीमानाची गुणवत्ता सुधारण्यामध्ये महत्वपूर्ण योगदान देतील.

आहे. यावर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये ईशान्य भागामध्ये संपर्क यंत्रणा अधिक मजबूत करण्याचे काम केले गेले आहे. संपर्क व्यवस्था मजबूत झाली तर रोजगाराच्या संधीही मिळतात. म्हणूनच आसाममध्ये महामार्ग आणि इतर मार्ग प्रकल्पांसाठी हजारो कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून देणे, निश्चित केले आहे. अर्थसंकल्पामध्ये ज्या घोषणा झाल्या आहेत, त्यामध्ये आसाममध्ये पर्यटनाचाही विस्तार केला जाईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, वर्ष 2014च्या नंतर, ईशान्येकडील 125 पेक्षा जास्त महान व्यक्तींना पद्म पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. यावरून आसाम आणि ईशान्येकडील राज्यांचे किती मोठे सामर्थ्य आहे, हे दिसून येते. ईशान्येकडील राज्यांचे हेच सामर्थ्य आता विकसित भारताचा खूप मोठा आधार आहेत. ■




"इंडिया एआय इम्पॅक्ट समिट - एक्सपो 2026"

# नवीन विचार, नवोपक्रम आणि दृढ संकल्प यांचा सशक्त संगम

*भारत वेगाने एआय म्हणजे कृत्रिम प्रज्ञा क्षेत्रामध्ये वैश्विक नेतृत्व करण्याच्या दिशेने पुढे जात आहे. याच दिशेने आयोजित "इंडिया एआय इम्पॅक्ट समिट - एक्सपो 2026" मध्ये देशामध्ये असलेली तंत्रज्ञानाची क्षमता, नवोपक्रम आणि डिजिटल परिवर्तन यांच्याविषयीची कटिबद्धता दिसून येते. या शिखर परिषदेअंतर्गत 16 ते 20 फेब्रुवारी, या कालावधीमध्ये नवी दिल्ली येथील भारत मंडपममध्ये कार्यक्रमांचे आयोजन केले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, आपण सर्वजण मिळून असे उपाय शोधून काढू की, त्याचा उपयोग फक्त भारतालाच नाही तर संपूर्ण जगाला होईल....*

ग्लोबल साउथमध्ये आयोजित होणारी ही पहिलीच वैश्विक एआय शिखर परिषद आहे. यामध्ये अभूतपूर्व भागीदारी दिसून आली. ''इंडिया एआय इम्पॅक्ट समिट - एक्सपो 2026'' यावरून असे दिसून आले की, कृत्रिम प्रज्ञेचा उपयोग कशा पद्धतीने आरोग्य, कृषी, शिक्षण, उत्पादन, वेगवेगळे खेळ तयार करणे आणि सुशासन यासारख्या क्षेत्रांमध्ये वास्तविक परिवर्तन घडवून आणू शकतात. विकसित भारताच्या संकल्पाबरोबरच या परिषदेमुळे अशा विचार पुढे आला की, ज्यामध्ये तंत्रज्ञानाचा वापर सर्वसमावेशक विकास, पारदर्शकता आणि नागरिकांना सशक्त बनविण्यासाठी केला जात आहे. हे केवळ एक प्रदर्शन नव्हते; तर एआय चे व्यावहारिक उपयोग दर्शविणारा मंच होता. याच परिषदेमध्ये नीती-धोरणे प्रत्यक्षात आणण्याचे काम केले जाते, नवोपक्रमांचा अवलंब



AI IMPACT SUMMIT
भारत 2026 INDIA

# एआय प्रदर्शन आणि शिखर परिषदेची झलक ...

**20** पेक्षा जास्त राष्ट्राध्यक्ष **60** मंत्री आणि 500 कृत्रिम प्रज्ञा क्षेत्रातील धूरिणांची उपस्थिती

- भारत कृत्रिम प्रज्ञा प्रभाव शिखर परिषद तीन मूलभूत स्तंभांवर, अर्थात 'सूत्रां'वर आधारित - लोक, ग्रह आणि प्रगती.
- 70,000 वर्ग मीटरपेक्षाही जास्त क्षेत्रामध्ये विस्तारलेल्या 10 परिसरामध्ये आयोजित या शिखर परिषदेमध्ये तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्या, स्टार्टअप, शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ आणि संशोधन संस्था, केंद्रीय मंत्रालये, राज्य सरकारे आणि आंतरराष्ट्रीय भागीदारांना एकत्रित आणण्यात आले.
- यामध्ये आयोजित केलेल्या प्रदर्शनामध्ये एआय तंत्रामध्ये आंतरराष्ट्रीय सहकार्याविषयक प्रदर्शन करणा-या 13 देशांचे कक्ष होते. यामध्ये ऑस्ट्रेलिया, जपान, रशिया, यू.के., फ्रान्स, जर्मन, इटली, नेदरलँड, स्वित्झर्लंड, सर्बिया, ऑस्टोनिया, ताजिकिस्तान आणि अफ्रिका यांच्या कक्षांचा समावेश होता.
- प्रदर्शनामध्ये 300 पेक्षा जास्त निवडक प्रदर्शन दालने होती आणि उत्पादनांचे प्रत्यक्ष सादरीकरण झाले.
- प्रदर्शनामध्ये 600 पेक्षा अधिक उच्च क्षमतेचे स्टार्टअप सहभागी झाले. त्यामध्ये अनेक स्टार्टअप्स जागतिक स्तरावर प्रासंगिक आणि संप्रेक्षणविषयक व्यापक उपाय योजना करीत आहेत. जगामध्ये त्यांच्या साधनांचा याआधीपासून वास्तविक स्वरूपामध्ये वापर केला जातो, अशा उपायांचा विस्तार करण्यास हे स्टार्टअप्स सक्षम आहेत.
- कृत्रिम प्रज्ञा प्रभाव शिखर परिषद-26 मध्ये आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींसहित 2.5 लाख पेक्षा अधिक प्रतिनिधी सहभागी झाले होते, असा अंदाज आहे.
- या आयोजनाचा उद्देश्य वैश्विक कृत्रिम प्रज्ञा तंत्रज्ञानाअंतर्गत नवीन भागीदारी, सहकार्याला प्रोत्साहन देणे आणि व्यावसायिक संधी निर्माण करणे होता.
- या शिखर परिषदेच्या कालावधीमध्ये 500 पेक्षा अधिक सत्रांचे आयोजन झाले. त्यामध्ये 3,250 पेक्षा जास्त वक्ते आणि पॅनल सदस्यांचा समावेश आहे.

*"भारत आपल्या 140 कोटी जनतेच्या सहकार्याने कृत्रिम प्रज्ञा क्षेत्रामध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी आघाडीची भूमिका निभावत आहे. डिजिटल सार्वजनिक निराकरणापासून ते जीवंत स्टार्टअप परिसंस्था आणि अत्याधुनिक संशोधनापर्यंत कृत्रिम प्रज्ञेमध्ये आम्ही केलेल्या प्रगतीमध्ये महत्वाकांक्षा आणि जबाबदारी या दोन्हींचे प्रतिबिंब दिसून येते.*

**- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी बाजूचा क्यू आर कोड स्कॅन करावा

मोठ्या प्रमाणावर केला जात आहे आणि तंत्रज्ञानाचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचणे शक्य होत आहे. शिखर परिषदेमध्ये नरेंद्र मोदी म्हणाले की, हे प्रदर्शन कृत्रिम प्रज्ञा, भारतीय प्रतिभा आणि नवोपक्रम यांची ताकद दाखवून देतो. त्यांनी सांगितले की, एआय क्षेत्रामध्ये भारताची प्रगती देशासाठी नवीन आणि परिवर्तनकारी उत्तर शोधून देईल. त्याचबरोबर वैश्विक विकासामध्येही महत्वपूर्ण योगदान देईल. पंतप्रधान मोदी यांनी सांगितले की, आयोजनामुळे जगासमोर पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे की, भारतीय प्रतिभा- एआयच्या भविष्याला दिशा देण्यास उपयोगी ठरेल, जबाबदारीने आणि समावेशक पद्धतीने, मानवाच्या कल्याणासाठी मोठ्या प्रमाणावर कार्य करण्यास कटिबद्ध आहे. ▪




# ...जेणेकरून अर्धी लोकसंख्या विकासाची प्रेरक शक्ती बनेल आणि नेतृत्व करेल

*भारत सरकार आज महिलांची सुरक्षा आणि सक्षमीकरणाला प्राधान्य देत आहे. सरकारच्या प्रत्येक योजनेत महिलांच्या सन्मानासोबत त्यांच्या आर्थिक, राजकीय आणि सामाजिक सक्षमीकरणाचा समावेश केला जात आहे. कारण देशाच्या वेगवान आणि निरंतर विकासप्रक्रियेत अर्ध्या लोकसंख्येची समान भागीदारी आवश्यक आहे अशी सरकारची विचारधारा आहे. ज्या देशातील अधिकाधिक महिला कार्यबळाचा भाग असतात, ती अर्थव्यवस्था तितकीच मजबूत असते...*

महिलांचा समान सहभाग आणि त्यांचे हक्क सुनिश्चित करण्यासाठी जग 8 मार्च रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करत आहे. **'सर्व महिला आणि मुलींसाठी - हक्क, न्याय आणि कृती'** ही 2026 च्या आंतरराष्ट्रीय महिला दिनाची संकल्पना आहे. लिंगभेदाच्या पलीकडे, प्रत्येकाला हक्क आणि न्याय मिळाला पाहिजे. यात कोणीही मागे पडता कामा नये. याच दृष्टिकोनातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार महिला आणि मुलींच्या हक्कांचा विस्तार करत नाही तर त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रत्येक स्तरावर कारवाई करत आहे. त्यांचा आर्थिक आणि सामाजिक सहभाग वाढविण्यासाठी गेल्या दशकभरात असंख्य नवीन योजना आणि उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. वर्ष 2047 पर्यंत 'विकसित भारत' साध्य करण्याच्या देशाच्या ध्येयासाठी महिलांचा सहभाग महत्त्वाचा आहे. या ध्येयाला पाठिंबा देण्यासाठी अर्थसंकल्पातही वाढ करण्यात आली आहे.

देशातील आयटीआयमध्ये 30 टक्के जागा मुलींसाठी राखीव ठेवण्यात आल्या, सैनिकी शाळांचे दरवाजे मुलींसाठी उघडण्यात आले आणि मुलींना एनडीए अर्थात राष्ट्रीय संरक्षण अकादमीमध्ये प्रवेश देण्यात आला. याव्यतिरिक्त, विकसित भारत-रोजगार आणि उपजीविका हमी अभियान (ग्रामीण) (व्हीबी-जी राम जी) कायदा, 2025 मध्ये महिलांना किमान एक तृतीयांश रोजगार देण्याची तरतूद असल्यामुळे रोजगाराच्या संधी वाढत आहेत. महिलांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी नारी शक्ती वंदन कायदा, 2023 ची अधिसूचना आणि प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत महिलांच्या नावावर घरांचे वाटप, अशा विविध तरतुदी महिलांचे हक्क बळकट करत आहेत. सरकारच्या अथक प्रयत्नांमुळेच आज महिला भारताच्या सामाजिक आर्थिक परिदृश्याला आकार देण्यासह शिक्षण, आरोग्य, डिजिटल समावेश आणि नेतृत्त्व यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत.

## सरकारच्या या प्रयत्नांमुळे वाढले महिलांचे अधिकार

- **राजकारणात वाढेल सहभागः** नारी शक्ती वंदन कायदा, 2023 (संविधानाची 106 वी सुधारणा) अधिसूचित करण्यात आला आहे. या कायद्याअंतर्गत, लोकसभा आणि दिल्लीच्या राष्ट्रीय राजधानी प्रदेशासह सर्व राज्य विधानसभेतील 33 % जागा महिलांसाठी राखीव असतील.
- **रोजगारात दुर्लक्ष होणार नाहीः** विकसित भारत - रोजगार आणि उपजीविका हमी अभियान (ग्रामीण) (**VB-G** राम जी) कायदा, 2025 योजनेअंतर्गत निर्माण होणाऱ्या रोजगारांपैकी किमान एक तृतीयांश रोजगार महिलांना देणे अनिवार्य आहे.
- **महिला होत आहेत गृहस्वामिनीः** प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण महिलांना घरांची मालकी हक्क प्रदान करण्यावर लक्ष केंद्रित करते. काही अपवाद वगळता, घर महिलेच्या नावावर किंवा पती-पत्नी दोघांच्या संयुक्त नावावर वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
- **उच्च पदांवर जाण्याचा मार्गः** कंपन्या (संचालकांची नियुक्ती आणि पात्रता) नियम, 2014 मध्ये अशी तरतूद आहे की 100 कोटी रुपयांपेक्षा जास्त भांडवल असलेल्या किंवा एकूण 300 कोटी रुपयांपेक्षा जास्त उलाढाल असलेल्या प्रत्येक सूचीबद्ध कंपनीने किमान एक महिला संचालक नियुक्त करणे आवश्यक आहे.
- **स्थानिक सरकारमध्ये वाढलेला सहभागः** प्रत्येक पंचायतीमध्ये थेट निवडणुका आणि अध्यक्षपदाद्वारे भरलेल्या जागांपैकी किमान एक तृतीयांश (33%) जागा महिलांसाठी राखीव ठेवणे अनिवार्य आहे. शिवाय, 21 राज्ये आणि दोन केंद्रशासित प्रदेशांनी महिलांसाठी 50% जागा राखीव ठेवल्या आहेत. सध्या, पंचायतींमध्ये निवडून आलेल्या 24, 41,741 प्रतिनिधींपैकी 12, 14,885 (49.75%) महिला आहेत.

## महिला सक्षमीकरण आणि न्यायासाठी कृती

- **न्यायिक संहिताः** भारतीय न्यायिक संहिता, 2023 मध्ये महिला आणि मुलांवरील गुन्ह्यांचे एकत्रीकरण करण्यात आले आहे. महिला आणि मुलांवरील गुन्ह्यांसाठी शिक्षा अधिक कठोर करण्यात आल्या आहेत.
- **कामाच्या ठिकाणी अनुकूल वातावरणः** महिला कामगारांसाठी कामाच्या ठिकाणी अनुकूल वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने, वेतन संहिता, औद्योगिक कामगार संहिता, व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामकाजाची अट संहिता आणि सामाजिक सुरक्षा संहितेत अनेक सहाय्यक तरतुदी करण्यात आल्या आहेत.
- **आरोग्याकडे अधिक लक्ष देता यावे म्हणूनः** 2017 मध्ये पगारी प्रसूती रजा 26 आठवड्यांपर्यंत वाढवण्यात आली, पूर्वी ती 12 आठवड्यांची होती.
- **कामाच्या ठिकाणी राहण्याची समस्या सोडवलीः** देशभरात 560 सखी निवास म्हणजेच काम करणाऱ्या महिलांसाठीची वसतिगृहे कार्यरत आहेत.
- **संकटात पुनर्वसनः** देशभरात 413 शक्ती सदन कार्यरत आहेत. शक्ती सदन म्हणजे संकटात सापडलेल्या महिलांसाठी एकात्मिक मदत आणि पुनर्वसन केंद्रे असून 13 हजार महिला त्यांचा लाभ घेत आहेत.
- **बालकांची देखभालः** देशभरात 14,599 अंगणवाडी सह पाळणाघर केंद्रांना मान्यता, 2,820 केंद्रे कार्यरत आहेत.
- **ग्रामीण उपजीविकाः** दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान अंतर्गत 10.29 कोटी महिला महिला बचत गटांशी जोडल्या गेल्या आहेत, ज्यामुळे देशाच्या ग्रामीण सामाजिक-आर्थिक परिदृश्यात बदल होत आहे.
- **कठोर परिश्रम आणि काळजीचे ओझे कमी व्हावे :** स्वच्छ भारत अभियानांतर्गत 12 कोटींहून अधिक शौचालयांचे बांधकाम, उज्ज्वला योजनेअंतर्गत 10.49 कोटींहून अधिक महिलांना गॅस जोडणी, जल जीवन अभियानांतर्गत 15.79 हून अधिक ग्रामीण कुटुंबांना नळ जोडणी प्रदान केल्याने महिलांचे जीवन बदलण्यास मदत झाली आहे.
- **मुली मोठ्या होतील आणि अभ्यास करतील यासाठीः** बेटी बचाओ बेटी पढाओ (**BBBP**) योजना 22 जानेवारी 2015 रोजी सुरू करण्यात आली. लिंग-आधारित जन्म नियंत्रण रोखणे, मुलींचे अस्तित्व आणि संरक्षण सुनिश्चित करणे आणि त्यांचे शिक्षण आणि सहभाग सुनिश्चित करणे आहे हा या योजनेचा उद्देश आहे. लिंग गुणोत्तर 2014-15 मध्ये 918 वरून 2024-25 मध्ये 929 पर्यंत वाढेल. शाळांमध्ये मुलींच्या एकूण नोंदणीचे प्रमाण 2014-15 मधील 75.51% वरून 2024-25 मध्ये 80.2% पर्यंत वाढले.
- **भविष्य सुरक्षित व्हावेः** सुकन्या समृद्धी खाती 22 जानेवारी 2015 रोजी सुरू करण्यात आली, या योजनेअंतर्गत मुलींना वयाच्या 21 व्या वर्षी खात्यातील निधी मिळू शकतो. जानेवारी 2026 पर्यंत, 45.3 दशलक्ष खाती उघडण्यात आली असून यात 3.33 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त ठेवी जमा आहेत.
- **पोषण आणि शिक्षणः** 10 मे 2023 रोजी सुरू झालेल्या या कार्यक्रमात बालपणात योग्य शिक्षण आणि पोषण सुनिश्चित करण्यासाठी 10 लाखांहून अधिक अंगणवाडी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. देशभरातील सरकारी शाळांमध्ये 2.9 लाख अंगणवाडी केंद्रे स्थापन करण्यात आली.
- **भारत बालविवाहाच्या प्रथेपासून मुक्त होवोः** भारत सरकारने 27 नोव्हेंबर 2024 रोजी बाल विवाह मुक्त अभियानाचा आरंभ केला. याअंतर्गत आयोजित कार्यक्रमात सहा कोटी नागरिकांना जागरूक करण्यात आले. बाल विवाह मुक्त भारत पोर्टल वर 28 लाखांहून अधिक जणांनी तशी शपथ घेतली आहे.

## महिला सक्षमीकरणासाठी केलेल्या उपाययोजना

- वर्ष 2022-23 पासून 'मिशन शक्ती' योजना राबवण्यात येत आहे. महिलांच्या सुरक्षिततेसाठी आणि सक्षमीकरणासाठी प्रयत्नांना बळकटी देणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.
- संबल' उपयोजना महिलांच्या सुरक्षिततेसाठी आहे. त्यात वन स्टॉप सेंटर, महिला हेल्पलाइन, बेटी बचाओ, बेटी पढाओ आणि नारी अदालत यांचा समावेश आहे.
- महिला सक्षमीकरणासाठी "सामर्थ्य" उप-योजना राबवली जातआहे. यामध्ये प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, शक्ती सदन, सखी निवास, पालना आणि संकल्प – महिला सक्षमीकरण केंद्र यांचा समावेश आहे.

## ...जेणेकरून मुली आणि महिला, कौशल्यसमृद्ध होतील

- स्किल इंडिया मोहिमेअंतर्गत, देशभरात कौशल्य विकास कार्यक्रम राबवले जात आहेत आणि महिला देखील प्रशिक्षणासाठी त्यात सक्रियपणे सहभागी होत आहेत. गेल्या दशकात प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना, जन शिक्षण संस्थान, राष्ट्रीय शिकाऊ उमेदवार प्रोत्साहन योजना आणि आयटीआय द्वारे कारागीर प्रशिक्षण योजनेअंतर्गत 1.27 कोटींहून अधिक महिलांना प्रशिक्षण मिळाले आहे.
- प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेअंतर्गत प्रशिक्षित होत असलेल्या एकूण प्रशिक्षणार्थींमध्ये महिलांचा सहभाग 45 टक्क्यांहून अधिक आहे, तर जन शिक्षण संस्थेच्या प्रशिक्षणात महिलांचा सहभाग 83 टक्के आहे.

**3,327** सक्रिय महिला वैमानिकांची संख्या 31 डिसेंबर 2025 पर्यंत.

2021 (243) पेक्षाच्या तुलनेत 2025 (461) मध्ये जवळपास 90% जास्त परवाने देण्यात आले.

## येथे दिसून येतो महिलांचा आर्थिक समावेश



**56%** प्रधानमंत्री जन धन योजनेअंतर्गत (पीएमजेडीवाय) खाती.

**54%** प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेअंतर्गत (पीएमजेजेबीवाय) विमा.

**51%** विमा, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना.

**82%** स्टँड अप इंडियाअंतर्गत कर्ज उपलब्ध.

**67%** कर्ज, प्रधानमंत्री मुद्रा योजना.

- सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या आकडेवारीनुसार, गेल्या पाच वर्षांत किरकोळ क्षेत्रात महिला कर्जदारांचा वाटा 2.14 पटीने आणि एमएसएमई क्षेत्रात 2.62 पटीने वाढला आहे.



**2.94 कोटी** महिलांच्या नेतृत्वाखालील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) देशभरात नोंदणीकृत आहेत.



## 3 पटीने वाढ झाली गेल्या 6 वर्षात लिंगभावाधारित अर्थसंकल्पीय तरतुदीत

सध्याचे केंद्र सरकार लिंगभाव-प्रतिसादात्मक प्रशासन आणि अर्थसंकल्पाला प्रोत्साहन देऊन महिलांच्या नेतृत्वाखालील विकासाला गती देत आहे. या संदर्भात, 2026-27 च्या अर्थसंकल्पात महिला आणि मुलींच्या कल्याणासाठी 5 लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.




टीप: आकडे लाख कोटी रुपयांमध्ये आहेत.

## 2026-27 च्या अर्थसंकल्पात महिलांसाठी खास

- 2026-27 च्या अर्थसंकल्पात 1.5 लाख बहु-कुशल काळजीवाहकांना प्रशिक्षण देण्याचा प्रस्ताव आहे. यामुळे वृद्ध, बालक आणि संबंधित काळजी सेवांमध्ये सुधारणा होईल.
- स्वयं-सहाय्य उद्योजकता (**SHE**) समूह स्थापन केले जातील. हे समुदायाच्या मालकीचे संसाधन असून महिलांच्या नेतृत्वाखालील स्वयं-सहायता गटांच्या उत्पादनांसाठी पद्धतशीर आणि शाश्वत बाजारपेठ उपलब्ध करून देतील.
- उच्च शिक्षणात समानता आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील **STEM** संस्थांमध्ये मुलींसाठी वसतिगृहांची तरतूद. यामुळे उदयोन्मुख आणि तंत्रज्ञान-आधारित क्षेत्रात तरुणींचा सहभाग वाढेल.



## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 8 मार्च 2025 रोजी आपली समाजमाध्यम खाती महिलांच्या हाती सुपूर्द केली होती

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतातील महिलांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी 8 मार्च 2025 रोजी महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या महिलांच्या हाती आपली समाजमाध्यम खाती सुपूर्द केली होती. या महिला भारताच्या विविध भागांमधून आल्या आहेत आणि त्यांनी विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केली आहे, परंतु त्या सर्वांमध्ये भारताच्या महिला शक्तीची ताकद आहे. त्यांचा दृढनिश्चय आणि यश आपल्याला महिलांच्या अमर्याद क्षमतेची आठवण करून देते. आज आणि दररोज, आम्ही विकसित भारताला घडवण्यात त्यांच्या योगदानाचा सन्मान करतो.





भारत - मलेशिया

# मैत्रीपासून धोरणात्मक भागीदारीपर्यंत

*भारत आणि मलेशिया यांच्यात 1957 मध्ये राजनैतिक संबंधांना सुरुवात झाली. तेव्हापासून दोन्ही देशांमध्ये परस्पर आदर आणि सहकार्यावर आधारित नातेसंबंध कायम आहेत आणि या संबंधांना ऑगस्ट 2024 मध्ये व्यापक धोरणात्मक भागीदारीचे स्वरुप प्रदान करण्यात आले. हे संबंध अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 7 आणि 8 फेब्रुवारी रोजी मलेशियाचा दौरा केला. यावेळी दोन्ही देशांमध्ये अनेक महत्त्वपूर्ण करार झाले.*

*मलेशियातील भारतीय कामगारांच्या संरक्षणासाठी सामाजिक सुरक्षा करार, पर्यटनासाठी मोफत ई-व्हिसा, तसेच यूपीआय या डिजिटल पेमेंट प्रणालीची मलेशियात अंमलबजावणी, ही पावले दोन्ही देशांच्या नागरिकांचे जीवन अधिक सोपे करतील. कारण कोणतीही भागीदारी तेव्हाच खऱ्या अर्थाने यशस्वी ठरते, जेव्हा तिचा लाभ थेट लोकांपर्यंत पोहोचतो.*

**- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यू आर कोड स्कॅन करा.

भारत आणि मलेशियामधील ऐतिहासिक संबंधांमध्ये अलीकडच्या काळात सातत्याने वाढ झाली आहे, ज्यामध्ये मलेशियामध्ये राहणाऱ्या सुमारे तीस लाख भारतीय समुदायाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. मलेशियाचे पंतप्रधान दातो' सेरी अन्वर इब्राहिम यांच्या निमंत्रणावरून 2015 नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मलेशियाचा हा तिसरा अधिकृत दौरा होता. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या या दोन दिवसांच्या दौऱ्यादरम्यान, दोन्ही देशांमधील व्यापक धोरणात्मक भागीदारी मजबूत करण्यासाठी सविस्तर चर्चा झाली, ज्यामध्ये राजकीय सहभाग, संरक्षण, सुरक्षा सहकार्य, सागरी सहकार्य, व्यापार आणि गुंतवणूक, डिजिटल अर्थव्यवस्था, विज्ञान आणि तंत्रज्ञान, ऊर्जा, शेती, आरोग्य, शिक्षण, संस्कृती, पर्यटन, युवा आदानप्रदान कार्यक्रम, आर्थिक आणि नवोपक्रम, तसेच काही नवीन क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवणे यांचा समावेश आहे. याशिवाय परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवरही चर्चा झाली. ही भेट भारत-मलेशिया संबंध मजबूत करण्यासाठी भारताच्या दृढ वचनबद्धतेचे प्रतीक आहे, हा देशाच्या ॲक्ट ईस्ट धोरणाचा, हिंद-प्रशांत दृष्टिकोनाचा आणि व्हिजन सागर (प्रदेशातील सर्वांसाठी सुरक्षा आणि विकास) या संकल्पनेचा प्रमुख आधारस्तंभ आहे.

पंतप्रधानांच्या या दौऱ्यात दोन्ही नेत्यांनी भारत आणि मलेशिया यांच्यातील प्राचीन संबंध आणि या भागीदारीचा आधारस्तंभ असलेल्या नागरिकांमधील मजबूत संपर्कांची आठवण करून दिली. सेमीकंडक्टर आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढविण्यावरही चर्चा झाली. पंतप्रधान मोदी यांनी संसदीय आणि विद्यापीठीय देवाणघेवाणीद्वारे तरुणांमधील परस्पर संबंध अधिक दृढ करण्याचे आवाहन केले. मलेशियामधील भारताच्या पहिल्या वाणिज्य दूतावासाच्या उद्घाटनामुळे व्यापारी आणि लोकसंपर्क संबंधांना आणखी बळकटी मिळेल. 10 व्या भारत–मलेशिया सीईओ



# भारतीय वंशाचे लोक दोन्ही देशांना जोडणारे सेतू

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी क्वालालंपूर येथे एका जाहीर कार्यक्रमाला संबोधित केले. त्यांच्या स्वागताप्रित्यर्थ 800 पेक्षा अधिक नर्तकांनी लय आणि ताल यांच्या साथीने एक विक्रमी सांस्कृतिक सादरीकरण केले. पंतप्रधान म्हणाले की वर्ष 2026 मधील हा त्यांचा पहिलाच परदेश दौरा आहे. उत्सवाच्या काळात आपण इथल्या समुदायासोबत असल्याबद्दल आनंद वाटत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. भारत आणि मलेशिया यांच्यातील लोकांना मनाला जोडणाऱ्या खूप गोष्टी आहेत. दोन्ही देशांमधील साधर्म्य असलेल्या गोष्टींचा उल्लेख करताना पंतप्रधान म्हणाले की मलेशिया मधील रोटी कॅनाई आणि भारतातील मलबार परोटा यांच्यात साम्य आहे. तसेच नारळ, मसाले आणि तेह तारिक - हे क्वालालंपूर आणि कोची दोन्हीकडे अगदी ओळखीचे वाटतात. दोन्ही देशांचे लोक एकमेकांना चांगल्या प्रकारे समजून घेतात, कदाचित त्यांच्या भाषांमध्ये आणि मलाय भाषेत असलेल्या खूप समान शब्दांमुळे असे घडत असेल, मलेशियात भारतीय चित्रपट आणि संगीत लोकप्रिय आहेत, असेही त्यांनी सांगितले.

मलेशियातील भारतीय वंशाच्या लोकांनी शतकानुशतके आपली परंपरा टिकवून ठेवली आहे. 'मन की बात'कार्यक्रमात आपण या समुदायाचा उल्लेख केला होता, असे सांगून ते म्हणाले की मलेशियात 500 पेक्षा जास्त शाळांमध्ये मुलांना भारतीय भाषांमध्ये शिक्षण दिले जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की 'तमिळ' ही भारताने जगाला दिलेली देणगी आहे. तमिळ साहित्य अजरामर आहे, तमिळ संस्कृती जागतिक आहे. तमिळ लोकांनी आपल्या कौशल्यांनी मानवतेची सेवा केली आहे.

मलेशियामध्ये 100 पेक्षा जास्त भारतीय आयटी कंपन्या कार्यरत आहेत, ज्यामुळे हजारो रोजगारांची निर्मिती होत आहे, आणि मलेशिया-भारत डिजिटल परिषद डिजिटल सहकार्यासाठी नवीन मार्ग प्रशस्त करत आहे, असे पंतप्रधान म्हणाले. भारताची यूपीआय प्रणाली लवकरच मलेशियामध्ये सुरू होईल, अशी घोषणा त्यांनी केली. पंतप्रधानांनी सांगितले की भारत आपल्या अनिवासी भारतीयांना नेहमीच खुल्या मनाने स्वीकारेल. त्यांनी एका ऐतिहासिक निर्णयाचा उल्लेख करुन सांगितले की भारतीय वंशाच्या सहाव्या पिढीपर्यंतच्या मलेशियन नागरिक आता ओसीआय (ओवरसीज सिटीजन ऑफ इंडिया) कार्डासाठी पात्र असतील. मलेशियामध्ये लवकरच भारताचे नवीन वाणिज्य दूतावास स्थापन केले जाणार असल्याचा उल्लेख करुन ते म्हणाले की त्यामुळे दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ होतील.

## भारत-मलेशिया यांच्यातील महत्त्वपूर्ण करार...

- दृक्-श्राव्य सह-निर्मितीसंदर्भातील करार
- भ्रष्टाचाराचा मुकाबला आणि प्रतिबंधाकरता सहकार्य
- संयुक्त राष्ट्रांच्या शांतता सहकार्यासंबंधी करार
- आपत्ती व्यवस्थापन
- सेमीकंडक्टर क्षेत्र
- आंतरराष्ट्रीय बिग कॅट अलायन्स (आयबीसीए)
- व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण
- भारताचे राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालय आणि मलेशियाची राष्ट्रीय सुरक्षा परिषद, यांच्यातील सुरक्षा सहकार्य
- आरोग्य आणि औषध क्षेत्रातील सहकार्य

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रमुख उद्योगपतींशी चर्चा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मलेशियातील चार प्रमुख उद्योगपतींशी चर्चा केली. यावेळी त्यांनी मलेशियातील व्यावसायिकांना भारतात विशेषतः पायाभूत सुविधा, नवीकरणीय ऊर्जा, डिजिटल तंत्रज्ञान, सेमीकंडक्टर, एआय म्हणजेच कृत्रिम प्रज्ञा आणि आरोग्यसेवा यासारख्या क्षेत्रात उपलब्ध असलेल्या संधींचा लाभ घेण्याचे आवाहन केले. भारत सरकारने विकसित भारत निर्माण करण्यासाठी केलेल्या सुधारणांचे उद्योग क्षेत्रातील अग्रणींनी कौतुक केले तसेच भारताच्या आर्थिक विकासाच्या वाटचालीवर दृढ विश्वास व्यक्त केला.

फोरमच्या निष्कर्ष दस्तऐवजालाही दोन्ही बाजूंनी मान्यता देण्यात आली.

दोन्ही देशांमधील संबंधांची खरी ताकद म्हणजे जनतेतील संबंध, असे पंतप्रधान म्हणाले. भारतीय वंशाचे 30 लाख मलेशियन नागरिक हे दोन्ही देशांमधील जिवंत दुवा आहेत. दोन्ही देशांच्या दहशतवादाविरुद्धच्या लढाईत मित्र राष्ट्रांची साथ असणे याला फार मोठे महत्त्व आहे. जागतिक अनिश्चिततेच्या या काळात भारत आणि त्याचा सागरी शेजारी असलेल्या मलेशियाला आपल्यातील परस्पर संबंधांचा पूर्ण क्षमतेने उपयोग करणे आवश्यक आहे. भारत मलेशियासोबतचे आपले संबंध नवीन उंचीवर नेण्यास उत्सुक आहे हा या दौऱ्याचा प्रमुख संदेश अतिशय स्पष्ट आहे, असे ते म्हणाले. ▪



आर्थिक शक्तीचा संगम

# भारत-अमेरिका व्यापार करारामुळे नवीन संधी होणार उपलब्ध

*भारताने गेल्या काही वर्षांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली जागतिक व्यापार परिदृश्यात एक सक्रिय आणि आत्मविश्वासपूर्ण अस्तित्त्व दाखवून दिले आहे. याच मालिकेत भारत-अमेरिका व्यापार करार हा एक महत्त्वपूर्ण मैलाचा दगड म्हणून उदयाला आला आहे. जगातील दोन सर्वात मोठ्या लोकशाही आणि आर्थिक सत्तांच्या दरम्यान झालेला हा करार, व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान आणि पुरवठा साखळी या क्षेत्रांना नवीन दिशा देण्यासोबतच विकसित आणि आत्मनिर्भर भारताच्या संकल्पाला देखील दृढ करेल...*

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या फेब्रुवारी 2025 मधील अमेरिका भेटीपासून दोन्ही देश नियमितपणे संतुलित आणि परस्परांना लाभदायक द्विपक्षीय व्यापार कराराला अंतिम स्वरूप देण्यासाठी चर्चा करत आहेत. गेल्या वर्षभरात, दोन्ही देशांनी विविध पातळ्यांवर सखोल वाटाघाटी केल्या आहेत, त्यामुळे दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्थेतील महत्त्वाच्या आणि संवेदनशील क्षेत्रांचे संरक्षण करताना एका ऐतिहासिक व्यापार कराराला मूर्त स्वरुप प्राप्त झाले आहे. परिणामी, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 2 फेब्रुवारी रोजी द्विपक्षीय आणि आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या अनेक मुद्यांवर चर्चा केली. त्यानंतर, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी भारतातून अमेरिकेत निर्यात होणाऱ्या वस्तूंवरील शुल्क 18 % पर्यंत कमी करण्याची घोषणा केली. भारतीय वस्तूंवर लादलेले शुल्क अमेरिकेने इतर अनेक स्पर्धक देशांवर लादलेल्या शुल्कांपेक्षा खूपच कमी आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत आणि अमेरिका यांच्यात अंतरिम व्यापार कराराच्या चौकटीवर झालेल्या कराराचे स्वागत केले. हा करार दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ करण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची वैयक्तिक बांधिलकी दर्शवतो. त्याचबरोबर ही

## अमेरिका-भारत संयुक्त निवेदन

**अमेरिका आणि भारत यांच्यातील हा अंतरिम व्यापार करार परस्पर हितसंबंधांवर आणि ठोस परिणामांवर आधारित आहे. तो संतुलित व्यापारासाठी सामायिक वचनबद्धता देखील प्रतिबिंबित करतो. अमेरिका-भारत अंतरिम व्यापार कराराच्या प्रमुख अटी...**

- सर्व अमेरिकन औद्योगिक वस्तू आणि अमेरिकन अन्न आणि कृषी उत्पादनांच्या विस्तृत श्रेणीवरील शुल्क भारत काढून टाकेल किंवा कमी करेल, यामध्ये वाळवलेली डिस्टिलर धान्ये (**DDGs**), पशुखाद्य म्हणून वापरली जाणारी लाल ज्वारी, सुकामेवा, ताजी आणि प्रक्रिया केलेली फळे, सोयाबीन तेल, वाइन आणि स्पिरिट्स, आणि इतर उत्पादने यांचा समावेश आहे.
- अमेरिका 2 एप्रिल 2025 च्या कार्यकारी आदेशात सुधारणा करेल, त्यानुसार भारतातील मूळ वस्तूंवर 18 टक्के आयात शुल्क दर लागू केला जाईल यामध्ये कापड आणि वस्त्रे, चामडे आणि पादत्राणे, प्लास्टिक आणि रबर, सेंद्रिय रसायने, गृहसजावट वस्तू, कारागीर-हस्तकला उत्पादने आणि काही यंत्रसामग्री यांचा समावेश आहे.
- अमेरिका भारताकडून आयात केल्या जाणाऱ्या काही विमानांवर आणि विमानांच्या सुट्या भागांवर लादलेले शुल्क काढून टाकेल.
- या कराराचे फायदे प्रामुख्याने दोन्ही देशांना मिळावेत यासाठी अमेरिका आणि भारत काही नियम निश्चित करतील.
- अमेरिका आणि भारत द्विपक्षीय व्यापारावर परिणाम करणारे नॉन-टॅरिफ अडथळे दूर करतील.
- लागू असलेल्या तांत्रिक नियमांचे पालन सुलभ करण्यासाठी, दोन्ही देशांनी मान्य केलेल्या क्षेत्रांसाठी त्यांच्या संबंधित मानके आणि अनुरूपता मूल्यांकन प्रक्रियांवर अमेरिका आणि भारत चर्चा करतील.
- कोणत्याही देशाच्या मान्य केलेल्या शुल्कांमध्ये कोणतेही बदल झाल्यास, अमेरिका आणि भारत सहमत आहेत की दुसरा देश त्यांच्या वचनबद्धतेत बदल करू शकतो.
- द्विपक्षीय व्यापार कराराच्या वाटाघाटींच्या माध्यमातून , भारतीय वस्तूंवरील शुल्क कमी करण्याचा अमेरिकेने विचार करावा ही भारताची विनंती विचारात घेण्याचा त्यांचा मानस आहे, असे अमेरिकेने म्हटले आहे.
- पुरवठा साखळी लवचिकता आणि नवोपक्रम वाढविण्यासाठी अमेरिका-भारत आर्थिक सुरक्षा संरेखन मजबूत करण्यावर दोन्ही देश सहमत आहेत. यासाठी, इतर पक्षांच्या बाजारपेठ संबंधित नसलेल्या धोरणांना संबोधित करण्यासाठी पूरक कारवाई केली जाईल.
- भारत पुढील 5 वर्षांत 500 अब्ज डॉलर्सची अमेरिकन ऊर्जा उत्पादने, विमाने आणि विमानांचे सुटे भाग, मौल्यवान धातू, तंत्रज्ञान उत्पादने आणि कोकिंग कोळसा खरेदी करेल.



चौकट भारत-अमेरिका भागीदारीतील वाढती सखोलता, परस्पर विश्वास आणि गतिमानता प्रतिबिंबित करते. यासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की या करारामुळे शेतकरी, उद्योजक, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग, स्टार्ट-अप क्षेत्रातील नवोन्मेषक तसेच मच्छीमार यांच्यासाठी नव्या संधी उपलब्ध होतील आणि महिला व युवकांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होईल. यामुळे 'मेक इन इंडिया' उपक्रम अधिक बळकट होईल, गुंतवणूक आणि तंत्रज्ञान भागीदारी अधिक दृढ होईल, सुलभ आणि विश्वासार्ह पुरवठा साखळी अधिक

## भारत अमेरिका व्यापार करारातील ठळक मुद्दे

**30** ट्रिलियन अमेरिकी डॉलर्सच्या अमेरिकन बाजारपेठेत भारताला प्राधान्य भागीदार म्हणून प्रवेश मिळाला.

- कापड आणि वस्त्रांवरील कर 50% वरून 18% पर्यंत कमी केले, ज्यामुळे रेशीमावर 0% आयात शुल्कावर 113 अब्ज अमेरिकी डॉलर्सची मोठी आयात बाजारपेठ भारतासाठी खुली
- यंत्रसामग्रीवरील शुल्क 18% पर्यंत कमी करण्यात आले, ज्यामुळे 477 अब्ज डॉलर्सच्या अमेरिकन बाजारपेठेत संधी निर्माण झाली.
- 1.36 अब्ज अमेरिकन डॉलर्स किमतीच्या भारतीय कृषी निर्यातीवर अमेरिकेला कोणताही अतिरिक्त कर लागणार नाही.
- मसाले, चहा, कॉफी, फळे, काजू आणि प्रक्रिया केलेले अन्न यासारख्या प्रमुख उत्पादनांना शून्य कर श्रेणीत ठेवण्यात आले आहे.
- दुग्धव्यवसाय, मांस, कुक्कुटपालन आणि धान्ये यासारखी अत्यंत संवेदनशील क्षेत्रं पूर्णपणे सुरक्षित राहतील.

“

*प्रिय मित्र राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्याशी बोलून खूप आनंद झाला. 'मेड इन इंडिया' उत्पादनांवरील शुल्क आता कमी होऊन 18% होणार आहे, याचा मला आनंद आहे. जेव्हा दोन मोठ्या अर्थव्यवस्था आणि जगातील सर्वात मोठे लोकशाही देश एकत्र काम करतात, तेव्हा त्याचा आपल्या लोकांना फायदा होतो आणि परस्पर फायदेशीर सहकार्यासाठी प्रचंड संधी उपलब्ध होतात.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

### अनेक प्रतिस्पर्धी देशांवरील अमेरिकेचे कर

भारत-अमेरिका अंतरिम व्यापार करारांतर्गत इतर स्पर्धक देशांपेक्षा कमी दर आकारले आहेत. चीन (35%), व्हिएतनाम (20%), बांगलादेश (20%), मलेशिया (19%), इंडोनेशिया (19%), फिलीपिन्स (19%), कंबोडिया (19%) आणि थायलंड (19%) यासह अनेक प्रतिस्पर्धी निर्यातदार देशांना अजूनही अमेरिकन बाजारपेठेत उच्च दरांचा सामना करावा लागत आहे.

### अमेरिकेत या भारतीय वस्तूंवरील कर कमी केले

चामडे आणि पादत्राणे, रत्ने आणि दागिने, गृहसजावट, खेळणी, यंत्रसामग्री आणि सुटे भाग (विमानाचे सुटे भाग वगळता).

### कृषी निर्यातीसाठी शून्य शुल्क प्रवेश

अमेरिका 1.36 अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या भारतीय निर्यातीवर कोणतेही अतिरिक्त शुल्क लादणार नाही. यामध्ये मसाले, चहा आणि कॉफी आणि त्यांचे अर्क, खोबरं आणि नारळ तेल, वनस्पती मेण, सुपारी, ब्राझील नट्स, काजू आणि चेस्टनट सारखे काजू, ॲव्होकॅडो, केळी, पेरू, आंबा, किवी, पपई, अननस, शिताके आणि मशरूमसह फळे आणि भाज्या, बार्ली आणि कॅनरी बियांसारखी धान्ये, बेकरी उत्पादने, कोको आणि कोकोपासून बनवलेली उत्पादने, तीळ आणि खसखस, तसेच फळांचा गर, रस आणि जॅम यांसारखी प्रक्रिया केलेली उत्पादने यांचा समावेश आहे.

### गेल्या काही वर्षांत भारताने या देशांसोबत केले व्यापार करार

युरोपियन संघासोबत चर्चा सुरू असताना, भारत सरकारने 2014 पासून मॉरिशस, संयुक्त अरब अमिरात, युनायटेड किंगडम, ओमान आणि ऑस्ट्रेलिया यांच्यासोबत व्यापार करारांवर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. तसेच न्यूझीलंड सोबत व्यापार कराराची घोषणा करण्यात आली आहे. 2025 मध्ये भारताने ओमान आणि इंग्लंडसोबत व्यापार करारावर स्वाक्षरी केली.

मजबूत होईल आणि जागतिक विकासालाही चालना मिळेल.

वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी संसदेत सांगितले की भारत-अमेरिका दरम्यान झालेल्या व्यापार करारामुळे भारतीय निर्यातदारांना, विशेषतः श्रमप्रधान आणि उत्पादन क्षेत्रांना, मोठा लाभ होईल. या करारामध्ये अन्न व कृषी क्षेत्रातील भारताच्या महत्त्वाच्या संवेदनशीलतेचा योग्य विचार करण्यात आला आहे. तसेच, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग, उद्योजक, कुशल कामगार आणि उद्योग क्षेत्रासाठी नवीन संधी उपलब्ध होतील. यामुळे भारताच्या 'मेक इन इंडिया फॉर द वर्ल्ड, 'डिजाइन इन इंडिया फॉर द वर्ल्ड' आणि 'इनोव्हेट इन इंडिया फॉर द वर्ल्ड' या दृष्टीकोनांना साकार करण्यास मदत होईल.

भारताच्या ऊर्जेच्या गरजांसाठी सुरक्षितता सुनिश्चित करणे ही सरकारची सर्वोच्च प्राधान्यक्रमाची बाब आहे. त्यामुळे पर्यायी बाजारपेठा शोधणे आणि बदलत्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीनुसार ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण करणे आवश्यक आहे. वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी संसदेत स्पष्ट केले की दोन्ही बाजू व्यापार करारासंबंधित आवश्यक तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आणि कागदपत्रांच्या पूर्ततेला अंतिम स्वरुप देण्यासाठी एकत्रितपणे काम करतील. ■

**जागतिक ग्राहक दिन 15 मार्च**

# सुरक्षित उत्पादन, ग्राहकांची खात्री

*सुरक्षित उत्पादन, ग्राहकांची खात्री ही जागतिक ग्राहक दिन 2026 ची संकल्पना आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बऱ्याच काळापासून उत्पादन आणि सेवा पुरवठादारांना भारतीय उत्पादने विश्वासार्ह करण्याचे आवाहन केले आहे. या व्यतिरिक्त, केंद्र सरकार ग्राहकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत आहे आणि यात दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींवर कारवाईसह ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी अनेक डिजिटल उपक्रम राबवले जात आहेत...*

- ग्राहक हक्क संरक्षण चौकटीचे आधुनिकीकरण करण्यासाठी जुन्या कायद्याऐवजी ग्राहक संरक्षण कायदा, 2019 लागू करण्यात आला.
- 1 जानेवारी 2025 पासून **https://e-jagriti.gov.in/** पोर्टल लाँच करण्यात आले. हे पोर्टल कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, फेसलेस ऑनबोर्डिंग सारख्या वैशिष्ट्यांद्वारे ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करते.
- खटल्यापूर्वीच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी, 1915 या टोल-फ्री क्रमांकावर तक्रार नोंदवा. तक्रार निवारणासाठी 45 दिवस मुदत आहे. गेल्या तीन वर्षांपासून, येथे दरमहा सरासरी 1 लाख पेक्षा जास्त तक्रारी प्राप्त होत आहेत.






*"आपल्या अर्थव्यवस्थेची प्रगती ज्यांच्या क्रयशक्तीवर अवलंबून आहे, अशा ग्राहकांना जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त, शुभेच्छा. भारत सरकार केवळ ग्राहक संरक्षणावरच नव्हे तर ग्राहकांच्या समृद्धीवरही लक्ष केंद्रित करत आहे.* **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**


न्यू इंडिया समाचार पाक्षिक

आर.एन.आय, DELHIN/2020/78812, 1-15 मार्च, 2026

आरएनआय DELHIN/2020/78812 (प्रकाशन तिथि- 19 फरवरी 2026, कुल पृष्ठ-60)

मुख्य संपादक
धीरेन्द्र ओझा, प्रधान महासंचालक
पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

प्रकाशक आणि मुद्रक
कंचन प्रसाद
महासंचालक, केंद्रीय संचार ब्यूरो

कक्ष क्रमांक 278, केंद्रीय संचार ब्यूरो, सूचना भवन,
दुसरा मजला, नवी दिल्ली - 110003
येथून प्रकाशित